दिवाळीचा मोठा अंक

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ३० ऑक्टोबर, १९४० अंक ४४

वाढता विश्वास. वाढतें सामर्थ्य.

## महाराष्ट्राची पहिली शेड्युल्ड बँक.

धंद्यांत सर्व बाजूंनीं झपाट्यानें वाढ.

# धि न्यू सिटीझन बँक ऑफ इंडिआ लि.

हेड ऑफिस : फोर्ट, मुंबई.

डिपॉझिटर्सना बोर्ड ऑफ डिरेक्टर्सवर प्रतिनिधित्व देणारी

## पहिली हिंदी बँक.

अध्यक्षः—श्री. जमनादास एम. मेहता, एम. ए., एलएल. बी., मुंबई सरकारचे माजी अर्थमंत्रि, व माजी मेयॉर ऑफ बॉम्बे.

ठेवीदारांतर्फे डायरेक्टर व उपाध्यक्षः—श्री. ल. ब. भोपटकर. एम. ए., एलएल. बी., ट्रस्टी केसरी व मराठा.

बोलक्या आंकड्यांची कामगिरी

## अवघ्या अडीच वर्षांतील प्रगति.

| तारीख | रोख गोळा झालेलें शेअर भांडवल | ठेवी | वाढ |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | |
| २३-१२-१९३८ | २,६१,१२५ | ६,८५,८२५ | भांडवलांत ९०% |
| ३१-१२-१९३९ | ५,०६,४१२ | १०,५७००० | ठेवीमध्यें ५५% |
| अगदीं अलिकडे १६-१०-१९४० | जवळ जवळ ५,०७,००० | १२,१५,००० | ठेवीमध्यें १५% |

युद्धकालांतही सतत होणारी प्रगति.

करंट, सेव्हिंग बँक, खातीं उघडलीं जातात.

मुदतबंद ठेवीः—१ ते ५ वर्षांच्या मुदतीच्या स्वीकारल्या जातात. व्याजाच्या दराची चौकशी समक्ष अगर पत्रद्वारें.

बँकेचे विशेषः—सरकारी रोखे, हुंड्या, शेअर्स, सोन्याचांदीचे पाट यांची खरेदीविक्री अत्यंत माफक कमिशन आकारून केली जाते. अनुभव घेऊन पहा.

ह्या महाराष्ट्रीय बँकेकडे काम देऊन

## महाराष्ट्रीयांचे कर्तबगारीस वाव द्या.

शाखाः—स्थानिक : १ गिरगांव, मुंबई नं. ४. २ झव्हेरी बझार, मुंबई नं. २. ३ नासिक. ४ सोलापूर. ५ कोल्हापूर. ६ सब्-ऑफिस—सांगली. ७ पे-ऑफिस—अकलूज.

विशेष माहितीसाठीं कोणाही शाखाधिकाऱ्याकडे अगर हेड ऑफिसकडे लिहा.

द. दा. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई इलाख्यांतील चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉंबे प्रॉव्हिन्शिअल् को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

[ सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली ]

स्थापना : १९११

मुख्य कचेरी :

९, बेक हाउस लेन, मुंबई.

शाखा :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ बारामती | ( जि. पुणें ) | ११ शेवगांव | (जि.अहमदनगर) | २१ शहादें | ( जि.प.खानदेश) |
| २ सातारा | ( जि.सातारा) | १२ कोपरगांव | ( „ „ ) | २२ नंदुरबार | ( „ „ ) |
| ३ इस्लामपूर | ( „ „ ) | १३ वाई | ( जि. सातारा ) | २३ साक्री | ( „ „ ) |
| ४ कऱ्हाड | ( „ „ ) | १४ पालघर | ( जि. ठाणें ) | २४ शिंदखेडें | ( „ „ ) |
| ५ तासगांव | ( „ „ ) | १५ कल्याण | ( „ „ ) | २५ तळोदें | ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी | ( „ „ ) | १६ अकलूज | ( जि. सोलापूर ) | २६ मालेगांव | ( जि. नाशिक ) |
| ७ शिराळें | ( „ „ ) | १७ विरमगांव | (जि.अहमदाबाद) | २७ सटाणा | ( „ „ ) |
| ८ कोरेगांव | ( „ „ ) | १८ धुळें | (जि.प.खानदेश) | २८ कळवण | ( „ „ ) |
| ९ भिवंडी | ( „ „ ) | १९ दोंडाईचें | ( „ „ ) | २९ दोहद | ( जि. पंचमहाल) |
| १० अहमदनगर | (जि.अहमदनगर) | २० शिरपूर | ( „ „ ) | ३० कालोल | ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २,००,००,००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.


> या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प
> उत्पन्नाचे लोक यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


## आतां माल कसा मिळेल?

महायुद्धामुळें परदेशांतून येणारीं निरनिराळीं यंत्रें बाजारांत पूर्वीप्रमाणें मिळेनाशीं झालीं आहेत. त्यामुळें इकडील कित्येक कारखानदारांना मोठीच अडचण उत्पन्न झाली आहे. तथापि तुम्हांला स्वतःच्या कारखान्याकरितां ८, १६, ३२ हॉ. पॉ.ची ऑईल एंजिन्स, पॉवरलूम, डॉबीज, अथवा पंप लागत असल्यास ही काळजी वाटावयाला नको. कारण



किर्लोस्कर ऑइल एंजिन

हा माल पुरविण्यास—.



किर्लोस्कर पॉवर लूम

किर्लोस्कर कारखाना सज्ज आहे.

याखेरीज किर्लोस्कर लोखंडी नांगर, चरक, रहाट, शेंगायंत्रें इत्यादि शेतीस लागणारी यंत्रसामुग्री व घरोघर वापरण्यांत येणारें—

"किर्लोस्कर" फर्निचर

यांचा मोठा साठा हंगामासाठी तयार आहे.

मागण्या लौकर नोंदवा.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी.

# ओगले ग्लास वर्क्स, लि.

- कांचेच्या चिमण्या व ग्लोब्स,
- बंगल्यावर घालणेचीं कांचेचीं कौलें,
- हेअर ऑइल्स अगर शाईकरितां लागणाऱ्या बाटल्या,
- प्रभाकर हरीकेन लँटर्न्स,
- एनामल्ड ॲडव्हर्टायजिंग साईन्स,
- सूप, मीट व राईस प्लेट्स, इत्यादि एनामल वेअर,
- रेल्वेकडे लागणारीं हरतऱ्हेचीं एनामल कमोड्स,
- वॉश बेसीन्स, एनामल्ड इलेक्ट्रिक शेड्स वगैरे.

## सर्व तऱ्हेचा माल अस्सल दर्जाचा होतो.

—: जास्त माहितीकरितां लिहा :—

एस. पी. ओगले आणि कंपनी,

मॅनेजिंग एजंटस्.

पोस्टः—ओगलेवाडी (सं. औंध), जिल्हाः—सातारा.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

## पुणें शहर.

[ टेलिफोन नं. ४८१ ]

या बँकेनें केलेल्या नवीन सोईचा म्हणजे

**सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा जरूर फायदा घ्या.**

**फक्त एक रुपयांत**

**आपल्या मौल्यवान जिनसा वगैरे भक्कम कप्प्यांत**

## सुरक्षित ठेवा.

बँकेंत येऊन समक्ष पहा व खात्री करून घ्या. सुट्टीखेरीज केव्हांही उघडतां येतें.

जास्त माहिती

मॅनेजिंग डायरेक्टरकडे, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# दि मिरज स्टेट बँक लिमिटेड

[ स्थापना : १०-५-१९२९ ]

## मुख्य कचेरी : बँक बिल्डिंग, मिरज

शाखा : १ लक्ष्मेश्वर, (जि. धारवाड) २ मोडनिंब, (जि. सोलापूर)

पे. ऑफिसेस : १ करकंब, (जि. सोलापूर) २ कुर्डुवाडी, (जि. सोलापूर)

मुख्य कचेरी व शाखांमार्फत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

| | |
|---|---|
| खेळतें भांडवल | रु. १६,००,००० वर |
| निरनिराळे फंड व रिझर्व फंड मिळून एकूण फंड | रु. १,००,००० |

- कायम, सेव्हिंग बँक व चालू ठेवी स्वीकारल्या जातात.
- बँकेचे नियम व व्याजाचे दर याबद्दल चौकशी करावी.
- याशिवाय सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, चांदी, यांचे तारणावर; माल गहाणाचे तारणावर; व स्थावर मिळकतीचे तारणावर कर्ज अगर कॅशक्रेडिट दिलें जातें. शेअर्स व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री योग्य कमिशन घेऊन केली जाते. याबाबत समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

ल. ग. मराठे,
मॅनेजर.

## —अनुक्रमणिका—


पृष्ठ

१ विविध माहिती ... ५२२
२ हिंदुस्थान आणि युद्धाचे आर्थिक परिणाम ... ५२३
३ हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार ... ... ५२५
४ हिंदी रेल्वेजचा संसार ५२५
५ टाटांच्या घराण्याचा उद्योगधंद्यांतील व्याप ५२५
६ शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति... ... ५२६
७ हिंदी चलनी नोटांची परिस्थिति... ... ५२६
८ हिंदी कपास ... ५२६
९ स्फुट विचार ... ५२७
दिवाळीचा सण आनंदांत जावो—टारिफ बोर्डाची चौकशी तहकूब—युद्धसामुग्री विषयींची दिल्ली येथील परिषद्—दिल्ली परिषदेंत व्हाइसरॉयांचें भाषण
१० व्यक्ति एक, पण समासदत्वें अनेक (ले. एक सहकारी) ... ५२८
११ हिंदी लोकसंख्येची वाढ ... ... ५३१
१२ एशियाच्या आर्थिक पुढारीपणाची जपानची भूमिका ... ... ५३३
१३ शास्त्रीय संशोधनांत कोणतें राष्ट्र पुढें आहे ? ५३४
१४ नवीन मोटार कायदा व प्रवासी (ले. श्री. वि. गाडगीळ, एम. ए., एलएल. बी.) ... ५३५
१५ संग्रहालयें व शिक्षण (ले. भा. वि. घारपुरे, रे इं. म्यूझियम, पुणें) ५३७
१६ नवीन विमा कायदा (ले. गो. बा. राजगुरु, अकौंटंट, "कॉमनवेल्थ" पुणें) ... ... ५४०
१७ ग्रंथालयाची उपयुक्तता (ले. र. श. पारसी, असि. लायब्रेरिअन, वाडिया लायब्ररी, पुणें) ... ५४०
१८ हिंदी रेल्वेज ... ५४१
१९ कंपन्या आणि मॅनेजिंग एजंट्स ... ५४२
२० हिंदुस्थानांत रेल्वे इंजनांच्या उत्पादनास प्रारंभ ... ५४३
२१ शंभर रुपयांच्या आंतील पगाराची जप्ती ... ५४५
२२ हवाई हल्ल्यापासून बचाव ... ... ५४७
२३ विमाविषयक वाङ्मय (ले. ह. बा. कीर्तने, ऑफिस सुपरिंटेंडेंट, "कॉमनवेल्थ" पुणें) ५४९
२४ बँकेतून चेक वटविण्याबाबत कांहीं विचार (ले. म. वि. गोसले, मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र) ५५१
२५ समाजांत शिक्षकाचें स्थान (ले. कृ. भा. बाबर) ... ... ५५३
२६ ग्रेट सोशल वि. कं. लि. ५५५
२७ न्यू सिटिझन बँक लि. ५५५
२८ सारस्वत को. बँक लि. ५५५
२९ विजय टेक्स्टाइल्स लि. ५५५
३० युद्धाच्या धोक्याचा विमा ... ... ५५७
३१ ओगले काचकारखाना ५५९
३२ जाहिरातदारांची अनुक्रमणिका ... ५६०



# श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(स्थापना १९२६)

[ फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली ]

संचालक मंडळ अध्यक्ष—श्री. मा. ल. लिखिते, एम्. ए., एलएल बी., अर्थमंत्री, फलटण दरबार.
उपाध्यक्ष—श्री. हि. वा. तेली, वकील.
श्री. शि. वि. अंबिये, श्री. वि. रा. तायवडकर, श्री. दा. वि. बरसावडे, श्री. म. स. फणसे.

| | | | |
|---|---|---|---|
| भांडवल | — भागांचें अधिकृत भांडवल | रु. १,००,००० | |
| | — भागांचें वसूल भांडवल | रु. ६१,००० | वर |
| फंड | — रिझर्व व इतर फंड | रु. ८६,००० | वर |
| ठेवी | — चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी | रु. ३,५०,००० | वर |
| खेळतें भांडवल | — बँकेचें खेळतें भांडवल | रु. ५,००,००० | वर |

ठेवीः—चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. ठेवींच्या शर्तींची माहिती समक्ष अगर पत्रद्वारें मिळूं शकेल. फलटण दरबार व सर्व स्थानिक संस्था यांच्या ठेवी या बँकेकडे आहेत.

कर्जः—या बँकेकडून बँकेस जोडलेल्या सोसायट्यांना व बँकेच्या भागीदारांना सर्व प्रकारच्या तारणांवर कर्जे मिळण्याची सोय झाली आहे. स्थावर मालमत्ता, सोनें, चांदी, सरकारी कर्जरोखे, शेतीच्या व औद्योगिक मालाच्या तारणांवर कर्ज मिळूं शकतें. तसेंच खातेदारांना ओव्हरड्राफ्ट मिळण्याची सोय करण्यांत आली आहे. दर व शर्ती यासंबंधीं माहिती समक्ष अगर पत्रद्वारें मिळूं शकेल.

इतर व्यवहारः—हुंड्यांची खरेदीविक्री, चेक, हुंड्या, ड्राफ्ट, रशीदी, डिव्हिडंड—वॉरंटें, पेन्शनबिलें वगैरेंची वसुली व इतर सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमध्यें केले जातात.

विमा हप्तेः—वेस्टर्न इंडिया ला. इं. कं. लि., नेपच्यून ॲ. कं. लि., कॉमनवेल्थ ॲ. कं. लि., व एशियन ॲ. कं. लि. या कंपन्यांच्या विम्याच्या हप्त्यांच्या रकमा स्वीकारण्यांत येतात.

★ दिवाळी व नूतन वर्ष बँकेच्या सर्व भागीदारांना व हितचिंतकांना आनंदाचें व भाग्याचें जावो ★

फलटण, दि. ३०।१०।४०. श्री. ह. तळवलकर, व्यवस्थापक.

## "अर्था"चा पुढील अंक

"अर्था"चा ता. ६ नोव्हेंबरचा अंक दिवाळीनिमित्त बंद राहील आणि त्यापुढील अंक ता. १३ रोजीं प्रसिद्ध होईल.

# विविध माहिती

### बँकांस सुटी

ता. २९, ३० व ३१ ऑक्टोबर रोजीं दिवाळीनिमित्त बँका बंद आहेत.

### डॉक्टरी कॉलेजें

ब्रिटिशांचे बरोबर हिंदुस्थानांत त्यांचे सर्जन व डॉक्टर ब्रिटिश सैनिकांच्या इस्पितळांचे प्रमुख म्हणून आले. त्यांस कमी पगारावर काम करणाऱ्या हिंदी मदतनीस डॉक्टरांची वाण भासूं लागली. हिंदुस्थानांतील वैद्यकीय शाळा-कॉलेजांचा उगम त्यांतच आहे. डॉक्टरी शिक्षणाची पहिली शाळा कलकत्ता येथें १८२४ सालीं निघाली. त्यानंतर १८२४ सालीं कलकत्ता व मद्रास येथें डॉक्टरी कॉलेजांची स्थापना झाली, तीं कॉलेजें विश्वविद्यालयांस अनुक्रमें १८५६ व १८६३ मध्यें जोडण्यांत आलीं. सध्या हिंदुस्थानांत विश्वविद्यालयीन दहा डॉक्टरी कॉलेजें आहेत व त्यांपैकी एक फक्त स्त्रियांसाठी आहे.

### ॲपेंडिसायटिस

ॲपेंडिसायटिसचें प्रमाण गरिबांपेक्षा श्रीमंतांत निदान २½ पटीपेक्षां तरी अधिक सापडतें, विवाहित स्त्रियांपेक्षा अविवाहित स्त्रिया ॲपेंडिसायटिसला अधिक बळी पडतात. खाण्यांत अतिरेक व रेचकें घेणें ह्यांपासून ॲपेंडिसायटिसचा उद्भव होऊं शकतो.

### अमेरिका खंडांतील जपान्यांची शिरगणति

अमेरिका, हवाई, कॅनडा, अर्जेंटिना, ब्रॅझील, चिली व पेरू ह्यांतील जपान्यांची शिरगणति जपानी सरकार करीत आहे, ती २० नोव्हेंबरपूर्वी पुरी होईल.

### इजिप्तमधील कपाशीचें पीक

इजिप्तमध्यें जेवढी जमीन लागवडीखालीं आहे, तिच्यापैकी एक तृतीयांशांत कपास पेरली जाते. सुमारें २० लक्ष एकर जमिनींत कपास लावण्यांत येते. इजिप्तमधून गेल्या वर्षी सुमारें ५० कोटि रुपयांच्या कपाशीची निर्गत झाली. ग्रेटब्रिटननें इजिप्तचें १९४० चें कपाशीचें सर्व पीक विकत घेतलें आहे. त्यांतील कांहीं कपाशीचें युद्धसाहित्य बनविण्यांत येईल व कांहींचें कापड तयार करण्यांत येऊन तें निर्गत केलें जाईल.

### प्रास्तविक बोलणीं संपल्यावर बिनसरकारी सल्लागार

हिंदुस्थान व सीलोन आणि हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांचे सरकारांच्या प्रतिनिधींमध्यें येत्या महिन्यांत प्रास्तविक स्वरूपाचीं बोलणीं होणार आहेत, त्यांस मूर्तस्वरूप येईल त्या वेळीं हिंदी बिनसरकारी सल्लागार नेमण्याचा विचार करण्यांत येईल.

### ऊंसाची लागवड

गेल्या वर्षी हिंदुस्थानांत एकूण ३७ लक्ष, ३१ हजार एकरांत ऊंस लावलेला होता, चालू सालीं ४९ लक्ष, ४५ हजार एकर जमीन ऊंसाखालीं आहे, असा सरकारी अंदाज आहे.

### फ्रेंचांस उद्देशून मि. चर्चिल ह्यांचें भाषण

"आम्हांस तुम्ही मदत करूं शकत नसलां, तर निदान आम्हांस अडचण तरी करूं नका" अशी विनंति मि. चर्चिल ह्यांनीं फ्रेंच लोकांस उद्देशून रेडिओवर भाषण केलें त्यांत केली.

### ट्रेझरी बिलांवर १० आ. २ पै व्याज

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ३ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. २ पै पडला.

### ब्रह्मदेशांत साखरेच्या आयातीवर निर्बंध

इंपोर्ट ट्रेड कंट्रोलरच्या परवान्यांशिवाय ब्रह्मदेशांत कोणतीहि साखर बाहेरून येऊं दिली जाणार नाहीं.

### अल्पसंख्याकांस नोकऱ्या

हिंदुस्थान सरकारच्या देखरेखीखालील रेल्वेजवरील नोकऱ्यांत अल्पसंख्याकांचे वांट्यास ठरल्याप्रमाणें पुरेशा जागा येतात किंवा नाहीं, हें पहाण्यासाठी सरकारनें एका अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. अल्पसंख्याकांचे हितसंबंध सुरक्षित आहेत, असा अभिप्राय त्यानें व्यक्त केला आहे.

### टेक्नॉलॉजिकल लॅबोरेटरी

माटुंगा येथील टेक्नॉलॉजिकल लॅबोरेटरींत स्पिनिंग इत्यादींचें शिक्षण देण्यासाठी चार विद्यार्थी घेण्यांत यावयाचे आहेत.

### हिंदी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न

| १ एप्रिल ते १० ऑक्टोबर | रुपये |
|---|---|
| १९३९ | ४८ कोटि, २० लक्ष |
| १९४० | ५४ कोटि, ३७ लक्ष |

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हौसमध्यें १८ ऑक्टोबर अखेर संपलेल्या आठवड्यांत १४ कोटि, २२½ लक्ष रुपयांच्या १,२४,२५१ चेक्सची देवघेव झाली.

### जादा नफ्यावरील कराचा कायदा

जादा नफ्यावरील कराचे कायद्यांत दुरुस्ती करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. हिंदी कायदा तत्सम ब्रिटिश कायद्याप्रमाणें केलेला आहे. ब्रिटिश कायद्यांतील दुरुस्त्यांस अनुसरून हिंदी कायद्यांत आतां दुरुस्ती करण्यांत येत आहे.

### इंपीरिअल वॉर कॅबिनेट

ब्रिटिश साम्राज्याचें इंपिरिअल वॉर कॅबिनेट बनविण्यांत येण्यासंबंधीं ग्रेटब्रिटनमध्यें बोलणें ऐकूं येतें.

### ४ कोटि, ७० लक्ष चर्चिल

"४ कोटि, ७० लक्ष इंग्रज हे ४ कोटि, ७० लक्ष चर्चिल आहेत. ते सर्व आपल्या साम्राज्याच्या रक्षणार्थ मरण्यास तयार आहेत, परंतु ते शरण येणार नाहींत." असें एका इटालियन पत्राचा बर्लिनचा बातमीदार लिहितो.

### १० लक्ष रुपयांची नुकसान भरपाई

मुंबईचे आसपासच्या किनाऱ्यावर नुकतेंच तुफान वादळ झालें, त्यांत सापडलेल्या बोटींच्या, मचव्यांच्या व त्यांतील मालाच्या नुकसानीची भरपाई त्यांचा विमा उतरणाऱ्या विमा-कंपन्यांस करावी लागेल. त्यांस सुमारें १० लक्ष रुपये द्यावे लागतील. हे विमे बहुतेक सर्व हिंदी कंपन्यांनींच उतरलेले आहेत व नुकसानभरपाई करण्यास ह्या कंपन्या समर्थ आहेत.

### पूर्व साम्राज्य परिषद

वरील परिषदेसाठी हिंदुस्थान, ब्रह्मदेश, हाँगकाँग, पॅलेस्टाइन, दक्षिण आफ्रिका, पूर्व आफ्रिका, दक्षिण ऱ्होडेशिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, व ग्रेटब्रिटन ह्यांचे प्रतिनिधी दिल्ली येथें उपस्थित झाले आहेत. सर महमद झाफरुल्लाखान, सर जरमी रेसमन (फडनवीस), सर ए. रामस्वामी मुदलियार (व्यापारमंत्री), जनरल सर हेमेड आर्मिटेज (मास्टर जनरल ऑफ ऑर्डिनन्स) व मि. डौ (इंडियन वॉर सप्लाय बोर्डाचे उपाध्यक्ष) हे हिंदुस्थानाचे प्रतिनिधी असून सर महमद झाफरुल्लाखान हे त्यांचे पुढारी आहेत.

वर्ष ६ वें | **अर्थ** | अंक ४४ वा
बुधवार, ता. ३० ऑक्टोबर, १९४०

# हिंदुस्थान आणि युद्धाचे आर्थिक परिणाम

### युद्धाचें वाढतें क्षेत्र

प्रथम सर्व पश्चिम युरोप पादाक्रांत करून क्रमाक्रमानें आपली सत्ता इतरत्र प्रस्थापित करण्याच्या उद्देशानें हिटलरनें चालू केलेल्या युद्धाच्या ज्वाला सर्व जगभर पसरणें अपरिहार्य होतें. स्वतःच्या व इतर राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या ग्रेट-ब्रिटनशी जर्मनीचा सामना येऊन पडल्यामुळें प्रस्तुत युद्ध दीर्घकालीन होणेंहि सहाजिक आहे. त्वरित जय मिळवून युद्ध आटोपण्याचा हिटलरचा डाव होता, तो हाणून पाडण्यास इंग्लंड व अमेरिका ह्या स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांस जर्मनीचा पुरा पराजय होईपर्यंत लढत रहाणें अगत्याचेंच आहे. प्रतिस्पर्ध्याच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करण्याच्या हेतूनें हिटलरला युद्धाचें क्षेत्र विस्तृत करून त्यांत अनेक लहान-मोठ्या राष्ट्रांस गोवणें आवश्यक झालें आहे. ह्या डावपेचांस तोंड द्यावयाचें म्हणजे दीर्घकालीन युद्धाची तयारी करणें आणि त्याकरितां मनुष्यबळाची व शस्त्रास्त्रांची भरपूर सिद्धता करणें होय. ह्या रीतीनें जगभर युद्धाच्या ज्वाला पसरून त्याचे दुष्परिणाम सर्व राष्ट्रांस भोगावे लागणें अपरिहार्य आहे.

### व्यापार व सरकारी उत्पन्न

प्रस्तुत युद्धाचें वरील प्रकारचें स्वरूप ध्यानांत बाळगलें म्हणजे त्याचे आर्थिक परिणाम हिंदुस्थानावर कसे होत आहेत ह्याची कल्पना येण्यास सहाय होईल. युद्धामध्यें इतर राष्ट्रांबरोबर हा देश गुंतल्यामुळें त्याच्या व्यापारावर व उद्योगधंद्यांवर प्रतिकूल परिणाम होणार हें उघड आहे. युद्धक्षेत्र जसजसें वाढत गेलें आहे तसतसें हिंदी मालाचें बाहेरील गिऱ्हाईक मर्यादित होत आलें आहे. शांततेच्या काळीं युरोपांतील देश हिंदी माल घेत होते, त्या बाजारपेठा आतां बंद झाल्या असून त्यांची जागा भरून काढण्यास साधन नाहीं. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांत पूर्वीच्या मानानें अधिक उठाव झाला तरी शेतीच्या मालाचे बाजारभाव चढण्यास त्या योगानें पुरेसें सहाय होत नाहीं. व्यापारी जहाजांचा उपयोग युद्धसामुग्रीच्या वहातुकीकडे तातडीनें करावा लागल्यानें परराष्ट्रीय व्यापाराचीं साधनें मर्यादित होतात, सुएझ कॅनॉल सारखे वहातुकीचे मार्ग सुरक्षित रहात नाहींत आणि म्हणून ती आडवाटेची व महाग होते. परराष्ट्रीय व्यापारांत झालेल्या घटीमुळें सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न कमी होतें. त्याबरोबरच लष्करी तयारीचा सरकारी खर्च वाढतो. देशाच्या संरक्षणाची कार्यक्षम व्यवस्था केली जावी आणि फौजेच्या निरनिराळ्या अंगांत वाढ करण्यांत यावी अशी लोकांची मागणी आहे. ती पुरी करावयाची म्हणजे सरकारचा खर्च वाढला. ह्याप्रमाणें उत्पन्न-खर्चांत येणारी तफावत भरून काढणें जरूर होतें. ती सबंद करांमध्यें वाढ करून भरून काढतां येत नाहीं म्हणून कर्जाच्या स्वरूपांत बाकीची रकम उभी करावी लागते.

### खर्च, कर आणि कर्ज

कर आणि सरकारी कर्ज ह्यांची वाढ युद्धाच्या विस्ताराबरोबर होत रहाते. चालू वर्षाच्या बजेटांत सुमारें सात कोटि रुपयांची तूट होती, ती भरून काढण्याकरितां जादा नफ्यावर नवा कर बसवण्यांत आला असून साखर व पेट्रोल ह्यांवरील पट्टी वाढवण्यांत आली आहे. युद्धाचा खर्च योग्य अंशांत पुढील पिढ्यांवर वांटला जाणें न्याय्य असल्यानें वाढता खर्च भागवण्यासाठी सरकारनें निरनिराळ्या स्वरूपांत कर्जे उभारलीं आहेत. डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स व डिफेन्स बाँड्सची योजना अशी केलेली आहे कीं, तिचा फायदा सामान्य स्थितींतल्या लोकांस घेतां यावा व युद्धप्रयत्नास सहाय देतां यावें. हीं कर्जे खुलीं असल्यानें त्यांची रकम हळुहळु वाढत आहे.

### व्याजाचे दर आणि सरकारी रोखे

युद्धपरिस्थितींत पैशाला मागणी बेसुमार येऊन व्याजाचे दर कडकतात असा नेहमीचा अनुभव आहे. तथापि, प्रस्तुत युद्धाचा हा विशेष आहे कीं, इंग्लंडमध्यें व हिंदुस्थानांत सरकार व मध्यवर्ती बँक ह्यांनीं अशी व्यवस्था ठेवली आहे कीं, तिचे योगानें दोन्ही ठिकाणचे व्याजाचे दर तीन टक्क्यांवर गेलेले नाहींत. रिझर्व्ह बँकेचा रेट तीन टक्के कायम राहिला आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. दुसरी एक गोष्ट नजरेंत भरण्यासारखी आहे ती कर्जरोख्यांच्या बाजारभावाचे विषयींची आहे. युद्धकालांत व्याजाचा दर चढतो, तेव्हां हे भाव उतरतात आणि सरकारी रोखे धारण करणाऱ्या लक्षावधि लोकांचें नुकसान होतें व पैशाच्या बाजाराचें वातावरण अनिश्चित होतें. सरकारास काढाव्या लागणाऱ्या युद्धकर्जांच्या दृष्टीनें ही गोष्ट अनिष्ट असते. चालू युद्धांत ह्या बाबतींतली परिस्थिति समाधानकारक आहे. ह्या संबंधांत साडेतीन टक्क्यांची प्रॉमिसरी नोट हें उत्कृष्ट गमक आहे. १९३९ सालाच्या प्रारंभीं ह्या रोख्याचा भाव चांगला चढलेला म्हणजे ९८ रुपयांचे वर होता. जर्मनीची युरोपांत चढाई चालू झाली तेव्हां तो ८९ रुपयांवर आला आणि युद्धाच्या प्रारंभीं ८० रुपयांवर घसरला. १९४० च्या आरंभास भाव पुन्हां ८७ चे वर गेला. पण फ्रान्स जर्मनीनें व्यापला तेव्हां तो ८४ रुपयांवर घसरला आणि तो आणखी घसरगुंडीस लागण्याची भीति उत्पन्न झाली. पुन्हां एकदां हा दर सावरला आणि रणांगणांत कांहीं कमीअधिक झालें तरी तो फारसा खालीं न जातां ९१ रुपयांचे आसपास सामान्यतः स्थिरावला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हीच वस्तुस्थिति कमीअधिक प्रमाणांत व्यापारी व औद्योगिक मंडळ्यांच्या भागांची आहे.

### नवीन स्वदेशी धंद्यांस उत्तेजन

अडचण आली कीं युक्ती सुचते, ह्या म्हणीची सत्यता युद्धपरिस्थितीचा परिणाम व्यापार व धंदे ह्यांवर होतो, त्यांत प्रत्ययास येते. शांततेच्या काळांत परदेशांतून येणारा माल युद्धामुळें आयात होण्याचें बंद झालें असतां त्याची जागा स्वदेशी कारखान्यांत त्या प्रकारचा माल काढून भरून काढण्यास उत्तेजन मिळतें. हिंदुस्थानचा कच्चा माल युद्धाच्या उपयोगासाठी इंग्लंड व साम्राज्याचे इतर भाग ह्यांकडे जात आहे आणि तो अमेरिकेंत खपण्याचीहि व्यवस्था सरकार करीत आहे. लढाऊ सामुग्रीचें उत्पादन शक्य तितकें हिंदुस्थानांत बनवण्याची खटपट सरकार करीत आहे, आणि दारूगोळा व शस्त्रास्त्रें ह्यांच्या बनावटीस त्यामुळें चांगलें उत्तेजन मिळालें आहे. आजपर्यंत हिंदुस्थानांत तयार न होणारा मालहि येथें बनवला जाण्याचा यत्न चालू आहे आणि त्यासाठी शास्त्रीय संशोधन व्हावें म्हणून तज्ञांच्या समित्या नेमण्यांत आल्या आहेत. कारखान्यांत काम करणाऱ्या कुशल कामगारांचा तुटवडा पडूं नये एवढ्याकरितां हस्तव्यवसाय शिक्षणाच्या संस्थांची पहाणी आणि तें देण्याची तरतूद होत आहे.

### हिंदुस्थान युद्धसामुग्रीच्या पुरवठ्याचें केंद्र

युद्धक्षेत्राच्या विस्तृत होणाऱ्या व्यापामुळें हिंदुस्थानाचें मध्यवर्ती स्थान विशेष महत्त्व पावलें आहे. युद्धाची सामुग्री येथून पुरवणें अधिक सोयीचें होणार असल्यानें साम्राज्यामधील पौरस्त्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींची चर्चा दिल्ली येथें होत आहे. ग्रेट-ब्रिटनचे प्रतिनिधीहि ह्या देशांत आलें असून हिंदी कच्चा माल व कारखाने ह्यांचा युद्धाकडे अधिकांत अधिक उपयोग कसा करून घेतां येईल ह्याची चौकशी करीत आहेत. ह्या सर्व घडामोडींचा परिणाम हिंदुस्थानच्या कारखानदारीस जोराची चालना मिळण्यांत होणार आहे. युद्धामुळें व्यापाराच्या ओघास नवीन वळण लागतें आणि त्या बरोबरच औद्योगिक घटनेंत महत्त्वाचे बदल होतात, ह्याचें प्रस्तुत उत्कृष्ट उदाहरण आहे. अमूक नवीन माल हिंदुस्थानांत नवीन निघूं लागला, अमूक कारखाना ह्या देशांत प्रथमच प्रस्थापित झाला, विमानें व आगबोटी स्वदेशी कारखान्यांत बनण्याची भाषा बोलली जाऊं लागली हीं बदलणाऱ्या औद्योगिक मनूचीं चिन्हें आहेत. ह्या बाबतींत ऑस्ट्रेलिया, पूर्व आफ्रिका इत्यादि देशांचें सहकार्य होत आहे, हें विशेष आहे. ह्या परिस्थितीचा पूर्ण फायदा हिंदुस्थान सरकारनें घेऊन युद्ध यशस्वी करण्यास सहाय देणें आणि ह्या देशाच्या औद्योगिक उन्नतीचा पाया दृढ व विस्तृत करणें ही दुहेरी कामगिरी बजावली पाहिजे. ह्या कामीं हिंदी जनतेचा त्यांस पूर्ण पाठिंबा मिळेल हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

### चलन आणि हुंडणावळ

देशाच्या चलनांत व हुंडणावळीच्या व्यवस्थेंत युद्ध–परिस्थितीमुळें गोंधळ माजण्याची भीति असते. कागदाच्या चलनास तारण म्हणून सोन्याचा निधि मध्यवर्ती बँक व सरकार ह्यांचे जवळ मामुली परिस्थितींत असतो, तो युद्धाच्या सांपत्तिक अडचणीच्या वेळीं पुरा पडत नाहीं. बिनतारणी कागदाचें चलन व्यवहारांत खेळवून त्याचा उपयोग स्वतःची प्राप्ती वाढविण्याकडे करण्याचा मोह सरकारास आवरत नाहीं. बिनतारणी कागदी चलन प्रमाणाबाहेर देशांत खेळूं लागलें म्हणजे बाजारभाव बेसुमार चढतात आणि ह्या कृत्रिम महागाईमुळें आणखी कागदी नोटा काढाव्या लागतात. हिंदुस्थानांत चलनाचा असा घोटाळा होण्याची पराकोटीची भीति नाहीं. येथें प्रचलित असलेल्या सुमारें अडीचशें कोटि रुपये किंमतीच्या नोटांस भरपूर तारण आहे आणि कायद्यानें चालून दिलेल्या मर्यादेपेक्षाहि तें किती तरी अधिक आहे. ह्या निधींत रिझर्व्ह बँकेच्या संग्रहीं ४४ कोटी रुपयांचें सोनें आहे. त्याशिवाय स्टर्लिंग मधले व हिंदी सरकारचे रोखे आहेत. मध्यंतरीं कांहीं आपमतलबी लोकांनीं उठवलेल्या अफवांच्या योगानें आणि भोळसर जनतेच्या अज्ञानामुळें नोटांच्या मोबदल्यांत रुपये मागण्याची व तें संग्रहीं ठेवण्याची प्रवृत्ति कांहीं काळ पसरली होती; परंतु ती लवकरच बंद पडली, हें समाधानकारक आहे. कारण, भरभक्कम अशी चलन व्यवस्था देशांत असतां नाण्यांचा फाजील उपयोग करूं पहाणें व्यक्तीस फायदेशीर नसून राष्ट्रास हानिकारक आहे. जादा चलनाची गरज भागवण्यासाठी एक रुपया किंमतीच्या नोटा प्रचलित करण्यांत आल्या असल्यानें रुपयाच्या नाण्यावर ताण पडण्याचें कारण उरलेलें नाहीं. चलनाची अंतर्गत परिस्थिति ह्याप्रमाणें समाधानकारक आहे आणि परराष्ट्रीय व्यापारांत आयात-निर्गतीची वजावाट देशास अनुकूल अशा स्वरूपाची आहे. ह्या कारणानें हुंडणावळीचा दर स्थिर राहिला आहे आणि त्यांत कोणतीहि अडचण उपस्थित झालेली नाहीं.

### बाजारभाव आणि शेती

विशिष्ट प्रकारचा परदेशी माल येणें बंद झाल्यानें तो दुर्मिळ झाला आहे आणि त्याच्या किंमती चढल्या आहेत. त्यांच्या जागीं दुसरे आणि देशी बनावटीचे जिन्नस तयार करण्याचा यत्न चालला असल्याचें वर सांगितलेंच आहे. तेथें हेंहि दर्शवलें आहे कीं देशी कच्च्या मालाच्या परराष्ट्रीय बाजारपेठा मर्यादित झाल्याकारणानें त्यांच्या किंमती पडल्या आहेत. ह्यामुळें आर्थिक मंदींतून शेतकरी वर्गाची मुक्तता होण्यास मदत झालेली नाहीं. युद्धपरिस्थितींत ह्या मालाच्या किंमती चढतील अशी एक वेळ अपेक्षा होती, ती खरी ठरलेली नाहीं. युद्धास प्रारंभ झाल्यावर दोन-तीन महिने बाजारभावांची प्रवृत्ति चढण्याकडे होती, पण लवकरच ती बंद पडून किंमती खालीं आल्या. कपास, ताग, गळिताचीं धान्यें, कातडीं, साखर, चहा इत्यादी सर्व जातींच्या मालाची ही स्थिति आहे. अमेरिकेमध्यें आमच्या मालास मागणी वाढवतां येण्याची शक्यता किती आहे हें पहाण्यासाठी सरकारनें आपले प्रतिनिधी नुकतेच पाठवले होते.

### परिस्थितीस धैर्यानें तोंड देण्याची आवश्यकता

युद्धाचें क्षेत्र व स्वरूप अशा प्रकारचें आहे कीं इतर देशांतील लोकांप्रमाणें हिंदी जनतेस आलेल्या आर्थिक प्रसंगास निश्चयानें व धैर्यानें तोंड देणें प्राप्त आहे. युरोपांतील राष्ट्रांच्या व इंग्लंडच्या मानानें हिंदुस्थान देश अजून सुरक्षित स्थितींत आहे आणि हिंदी जनतेस त्यांच्याप्रमाणें युद्धाचे परिणाम प्रत्यक्ष भोगावे लागलेले नाहींत. हिटलरनें जगावर आपत्ति आणली आहे, ती दूर करण्यास जगांतील सर्व स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रांनीं पडेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार झालें पाहिजे हें उघड आहे. आर्थिक स्थिति आहे त्यापेक्षा बिघडू नाहीं ह्यांत आपण समाधान मानून व्यापार, उद्योगधंदे, बाजारभाव, सरकारी खर्च, कर व कर्ज ह्यांची घडी व व्यवस्था अधिकांत अधिक चांगल्या रीतीनें बसवण्याचा प्रयत्न एकजुटीनें जनता व सरकार ह्यांनीं करणें अगत्याचें आहे. जनतेचा स्वार्थत्याग ही राष्ट्राचें स्वातंत्र्य आणि माणुसकी ह्यांच्या रक्षणासाठी द्यावी लागणारी किंमतच आहे.

# हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार

## महत्त्वाच्या कांहीं देशाबाबत आंकडे

### निर्गत १९३८-३९

| ब्रिटिश साम्राज्य | | रु. |
|---|---|---|
| ग्रेटब्रिटन | ... | ५४,९३,२०,७८९ |
| सिलोन | ... | ५,०९,३८,१२२ |
| ब्रह्मदेश | ... | १०,०२,९८,३८६ |
| स्ट्रेटस सेटलमेंट्स | ... | २,०३,५१,३६१ |
| द. आफ्रिका | ... | १,४९,२१,७७९ |
| कॅनडा | ... | २,०८,३७,६३८ |
| ऑस्ट्रेलिया | ... | २,९७,३१,७७७ |
| एकूण ब्रि. साम्राज्य ( रु. )... | | ८४,७१,८७,२५३ |
| **इतर देश** | | **रु.** |
| जर्मनी | ... | ७,५८,४८,०८३ |
| नेदरलंडस | ... | ३,४१,७४,५४९ |
| बेल्जम | ... | ४,०५,१७,९९५ |
| फ्रान्स | ... | ६,१५,४८,८५५ |
| इटली | ... | २,६०,२२,२०२ |
| झेकोस्लोव्हाकिया | ... | १,३१,५७,३४१ |
| अरबस्तान | ... | १,०२,६२,९०५ |
| चीन | ... | २,४६,८९,९०८ |
| जपान | ... | १४,५७,८५,९९१ |
| इजिप्त | ... | १,२२,३०,२८५ |
| अमेरिका | ... | १३,८५,८७,१७२ |
| द. अमेरिका | ... | ३,९१,१४,६३० |
| एकूण इतर देश | ... | ७४,५९,९३,७०७ |
| इतर | ... | ३,४५,५५,९२३ |
| एकूण | ... | १६२,७७,३६,८८३ |

### आयात १९३८-३९

| ब्रिटिश साम्राज्य | | रु. |
|---|---|---|
| ग्रेटब्रिटन | ... | ४६,७२,८३,०४८ |
| सीलोन | ... | १,१७,५१,५९२ |
| ब्रह्मदेश | ... | २४,१७,२८,१४१ |
| स्ट्रेटस सेटलमेंटस | ... | ४,११,०९,९४२ |
| केनिया | ... | ४,८८,७३,३८० |
| कॅनडा | ... | ९०,८६,३४४ |
| ऑस्ट्रेलिया | ... | २,३५,१९,१८७ |
| एकूण ब्रि. साम्राज्य | ... | ८८,५४,०१,३२३ |
| **इतर देश** | | |
| स्वीडन | ... | १,३३,८७,४१० |
| जर्मनी | ... | १२,९३,६१,८२३ |
| नेदरलंडस | ... | १,४२,८१,९९६ |
| बेल्जम | ... | २,९१,६३,८९२ |
| फ्रान्स | ... | १,३९,४१,४०२ |
| स्वित्सरलंड | ... | १,५९,३९,६२१ |
| इटली | ... | २,६८,७५,२५४ |
| झेकोस्लोव्हाकिया | ... | १,०९,२५,०६४ |
| इराण | ... | ३,४८,८८,८७८ |
| चीन | ... | १,७३,४७,७६३ |
| जपान | ... | १५,४२,६९,१६० |
| इजिप्त | ... | २,१७,८३,०५८ |
| अमेरिका | ... | ९,७७,३२,५५४ |
| एकूण इतर देश | ... | ६३,७९,६९,५३६ |
| एकूण | ... | १५२,३३,७०,८५९ |

---

## हिंदी रेल्वेजचा संसार

### १९३८-३९ चे आकडे

| | | |
|---|---|---|
| एकूण मैल रूळ | | ४१,१३४ |
| कायम नोकर | | ७,००,६६६ |
| वार्षिक पगार खर्च | (रु.) | ३५,४९,४०,१७९ |
| एकूण उत्पन्न | " | १०७,००,००,००० |
| व्यवस्थेचा खर्च | " | ७१,००,००,००० |
| खर्चाचें उत्पन्नाशीं प्रमाण | " | ६६·४४% |
| एकूण उतारू | | ५३,०६,२०,००० |
| उतारूंपासून उत्पन्न | (रु.) | ३०,००,००,००० |
| एकूण मालवहातुक | (टन) | ८,८४,००,००० |
| मालवहातुकीचें उत्पन्न | (रु.) | ६३,००,००,००० |
| आगगाड्यांचा एकूण प्रवास | (मैल) | १९,७०,४०,००० |
| दर मैलीं नफा | (रु.) | १-१३-० |
| प्रत्येक मैल रेल्वेरस्त्यावर नफा | ( रु. ) | ८,६१९-०-० |

## टाटांच्या घराण्याचा उद्योगधंद्यांतील व्याप

टाटांच्या घराण्यानें हिंदी उद्योगधंद्यांस अतिशय मोठा हातभार लावलेला आहे. मि. जमशेटजी नसरवानजी टाटा हे हिंदी उद्योगधंद्यांचे जनकच समजले पाहिजेत. टाटा घराण्याचें औद्योगिक क्षेत्रांतील जाळें खालील तक्ता दर्शवितो.:—

| | कोटि रु. |
|---|---|
| टाटा घराण्यांच्या नेतृत्वाखालील कंपन्यांत गुंतलेलें भांडवल | ६२ |
| त्यांत ८५ हजार लोकांस काम मिळतें, त्यांचें वार्षिक वेतन | ४ |
| गेल्या वीस वर्षांत वेतनावर झालेला खर्च | ६० |
| सरकार, म्युनिसिपॅलिट्या, रेल्वेज, इत्यादींस कर, भाडें, वगैरे | ४ |
| मालविक्रीचें उत्पन्न | २० |
| पहिल्या कंपनीच्या स्थापनेपासून आजवर दिलेलें डिव्हिडंड | ३८ |

## शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

हिंदी शेड्यूल्ड बँकांची ठेवी आणि कर्जें ह्यांचे संबंधानें परिस्थिति कशी होती हें खालीं दिलेल्या ताज्या आकड्यांवरून दिसून येईल:—

| | रुपये कोटि | लक्ष |
|---|---|---|
| बिन मुद्रत ठेवी | | |
| (अ) हिंदुस्थान | १६० | ३१ |
| (ब) ब्रह्मदेश | ८ | १२ |
| मुदत बंद ठेवी | | |
| (अ) हिंदुस्थान | ९७ | ०८ |
| (ब) ब्रह्मदेश | ३ | ६२ |
| रोकड | | |
| (१) चलनी नोटा | | |
| (अ) हिंदुस्थान | ६ | ४० |
| (ब) ब्रह्मदेश | | १ |
| (२) ब्रह्मी नोटा | | |
| (अ) हिंदुस्थान | | ·५ |
| (ब) ब्रह्मदेश | | ४४ |
| (३) रुपयाचें नाणें | | |
| (अ) हिंदुस्थान | १ | ३० |
| (ब) ब्रह्मदेश | | २ |
| (४) किरकोळ नाणें | | |
| (अ) हिंदुस्थान | ० | ३८ |
| (ब) ब्रह्मदेश | | ·५ |
| रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक | ४५ | ३१ |
| दिलेलीं कर्जें | | |
| (अ) हिंदुस्थानांत | १०६ | २४ |
| (ब) ब्रह्मदेशांत | ३ | ६६ |
| डिस्कौंट केलेलीं बिलें | | |
| (अ) हिंदुस्थान | १ | ५२ |
| (ब) ब्रह्मदेश | | १० |

## हिंदी चलनी नोटांची परिस्थिति

चलनी नोटांच्या दिशेची परिस्थिति कशा प्रकारची आहे हें स्पष्ट डोळ्यांत भरावें म्हणून त्याचा रिझर्व्ह बँकेनें अगदीं अलीकडे प्रसिद्ध केलेला तक्ता आम्ही खालीं देत आहों.

### नोटांचा विभाग

**देणें** — रु.

नोटा (अ) बँकिंग विभागांतील
२६,२०,०६,०००

(ब) व्यवहारांत खेळत्या; हिंदुस्थानांत आणि ब्रह्मदेशांत मिळून
२,३०,७६,११,०००

एकूण देणें २,५६,९६,१७,०००

**येणें** — रु.

(अ) सोनें, नाणीं व पाटले
हिंदुस्थानांत
४४,४१,४३,००० रु.
हिंदुस्थानाबाहेर
............
पौंडांतले (स्टर्लिंग रोखे)
१,३१,५०,११,००० रु.

(अ) ची बेरीज १७५,९१,५४,०००

(ब) रुपये ३१,४२,७९,०००
हिंदुस्थान सरकारचे रोखे ४९,६१,८४,०००
हिंदुस्थानांतल्या हुंड्या व इतर पत-पत्रिका ...............

एकूण येणें २,५६,९६,१७,०००

### शुद्ध कर्जरोखे
(१९ ऑक्टोबर अखेर)

| | रु. |
|---|---|
| ३ % डिफेन्स बॉंड्स : | २६,४४,१०,००० |
| बिनव्याजाचे रोखे : | २,१४,००,००० |

### बँक रेट
(२८ नोव्हेंबर, १९३५ पासून)

रिझर्व्ह बँक रेट : ३ %

## हिंदी कपास

| | एकर लागवड | उत्पादन (गाठी) | गिरण्यांत उठाव (गाठी) (१ गाठ=४०० पौंड) | निर्गत (गाठी) |
|---|---|---|---|---|
| १९३४–३५ | २,३५,१५,००० | ४७,९७,००० | २६,१२,१३२ | ३१,१५,००० |
| १९३५–३६ | २,५४,४४,००० | ५८,९७,००० | २९,७७,९८८ | ३७,०९,००० |
| १९३६–३७ | २,४७,५९,००० | ६२,३४,००० | २६,३१,९९६ | ४२,६७,००० |
| १९३७–३८ | २,५७,४६,००० | ५७,२२,००० | २९,१४,१२८ | २१,००,००० |
| १९३८–३९ | २,३४,८२,००० | ५०,७६,००० | ३१,२१,०८७ | ३२,७४,००० |
| १९३९–४० | २,१३,५९,००० | ४९,४२,००० | ३०,००,००० | २३,२५,००० |

★ FORD CARS ★

—FOR—

BEAUTY ★ COMFORT ★ QUIET ★ EASE ★ CONVENIENCE ★ STYLE
SILENCE ★ SAFETY ★ ECONOMY

THE SILVER JUBILEE MOTORS LTD.

12 ARSENAL ROAD ★ POONA 1

# स्फुट विचार

## दिवाळीचा सण आनंदाचा जावो

प्रस्तुत युद्धास प्रारंभ झाल्यानंतरची ही दुसरी दिवाळी आहे. ह्या अवधींत जर्मनीनें अनेक राष्ट्रांचें स्वातंत्र्य हिरावून घेऊन जगांतील कोट्यवधि लोकांवर भयंकर संकट आणलें आहे. संपत्ति व मनुष्यप्राण ह्यांचा संहार जर्मनीच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळें वाढत्या प्रमाणावर होत आहे. ह्या आपत्तीच्या क्षेत्राचा विस्तार कसा करतां येईल ह्याच्या चर्चेंत हिटलर सध्यां गुंतला आहे. मानवी जीवित व संस्कृति ह्यांवर त्यानें चालवलेल्या हल्ल्याचा धैर्यानें प्रतिकार करून जगांत स्वातंत्र्य, शांतता, न्याय व समता ह्यांची स्थापना होण्यास सहाय्य करणें सर्व राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचें आज कर्तव्य आहे. तें करीत असतां सावधगिरीनें वागून कालोचित व प्रसंगोचित, नित्य व वैयक्तिक व्यवहार जनतेनें चालू ठेवले पाहिजेत. दिवाळीच्या आनंदोत्सवांत लक्ष्मीपूजनास महत्त्व आहे त्याचें रहस्य ध्यानांत बाळगून परिस्थितीस अनुरूप अशा रीतीनें हा वार्षिक सण साजरा करावयाचा आहे. युद्धाच्या धामधुमीच्या काळांत हिंदी व्यापार व उद्योगधंदे आणि जनतेच्या पोटापाण्याचे इतर व्यवहार ह्यांविषयीं घडामोड कशी होत आहे ह्याची माहिती आमच्या ह्या दिवाळीअंकांत वाचकांस मिळेल. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचें व संवर्धनाचे प्रतिबिंब त्यांत सर्वत्र उमटलेलें दिसून येईल आणि अनेक दिशांनीं चाललेल्या धंद्यांच्या प्रयत्नांशीं त्यांचा परिचय होईल. दिवाळीचा सण आमच्या वाचकांस आनंदाचा जावो आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचें पाऊल सावधगिरीनें, धैर्यानें व एकजुटीनें पुढें टाकलें जावो असें आम्हीं इच्छितों.

---

## टारिफ बोर्डांची चौकशी तहकूब

ज्या कांहीं स्वदेशी धंद्यांस जकातीचें संरक्षण देण्यांत आलेलें आहे त्यांपैकी कित्येकांची चौकशी पूर्वी ठरल्याप्रमाणें ह्यावेळीं टारिफ बोर्डाच्या मार्फत चालू व्हावयास पाहिजे होती. साखर, कांहीं जातींचें पोलाद व जरतार ह्यांचे संवर्धांतल्या संरक्षक जकातींचा दर कमी करणें योग्य आहे किंवा नाहीं ह्याचा विचार मामुली परिस्थितींत सरकारनें आतांच करणें आवश्यक होतें. ह्या बाबतींतल्या सरकारी धोरणास टारिफ बोर्डाच्या शिफारसींचा आधार असतो. परंतु सध्या युद्धामुळें व्यापाराची घडी अशी विस्कटली आहे कीं, टारिफ बोर्डानें विवक्षित धंद्यांविषयीं माहिती कशी मिळवावी आणि आपलीं अनुमानें कशीं काढावीं हा प्रश्नच आहे. साखरेचा धंदा तूर्त अनिश्चित स्थितींत आहे आणि पोलाद व जरतार ह्यांच्या आयातीस युद्धामुळें व्यत्यय आला आहे. म्हणून सदरहु धंद्यांच्या चौकशीकरितां टारिफ बोर्डाची नेमणूक करण्याचें हिंदुस्थान सरकारनें तूर्त तहकूब केलें आहे. युद्धाचें वातावरण निवळलें म्हणजे सध्या स्थगित करण्यांत आलेली चौकशी हातीं घेणें सोयीचें होईल. औद्योगिक संरक्षणाविषयींच्या सरकारच्या ह्या धोरणांत औचित्य आहे ह्यांत शंका नाहीं. ज्या चौकशीचा व्यावहारिक उपयोग होण्याचा संभव नाहीं तिचा उपक्रम करणें व्यर्थ झालें असतें.

---

## युद्धसामुग्रीविषयींची दिल्ली येथील परिषद

गेल्या २१ तारखेस दिल्लीं येथें व्हाइसरॉयांचे हस्तें चालू झालेल्या परिषदेचें वैशिष्ट्य ध्यानांत येणें अगत्याचें आहे. युद्धक्षेत्राच्या मर्यादा पश्चिमेकडून पूर्वेकडे हळूहळू विस्तार पावत आहेत. ह्या बाजूस रणमैदानावर लढाईचीं साधनें व सामुग्री पुरवणें इंग्लंडला सोयीचें होणार नाहीं, हें उघड आहे. सुएझ कालव्याच्या पूर्वेकडील देशांमधून हा पुरवठा व्हावा लागेल. ब्रिटिश साम्राज्यांतील ह्या बाजूच्या देशांनीं आपला कच्चा माल, यंत्रसामुग्री व उत्पादन सामर्थ्य ह्यांचा साकल्यानें विचार करून लढाऊ सामानाच्या पुरवठ्याची संघटनात्मक योजना आखणें आवश्यक आहे. हे देश आपापल्या परीनें शक्य तो माल पुरवीत आहेत, पण त्यांच्या शक्तीचा मेळ बसवला गेला आणि त्यांच्यामध्यें उत्पादनाची व पुरवठ्याची वांटणी करून देण्यांत आली तर ती व्यवस्था कार्यक्षम होऊं शकेल. ह्या प्रकरणीं हिंदुस्थानचें मध्यवर्ती स्थान विचारविनिमय व योजनात्मक धोरणाची अंमलबजावणी ह्यांस अत्यंत सोयीचें असें आहे. युद्धसामुग्री पुरवण्यांत ह्या देशानें अगोदरच उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे आणि येथील कच्चा माल व कारखाने ह्यांचा अधिक विस्तृत व उत्पादक उपयोग करतां येण्याजोगा आहे. ह्या सर्व गोष्टींस अनुलक्षूनच दिल्लीची परिषद भरवण्यांत आली आहे. हिंदुस्थानच्या वतीनें तिच्या चर्चेंत सभासद भाग घेतील त्यांमध्यें लोकांच्या सूचनेप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांच्या बरोबरीनें १७ बिनसरकारी गृहस्थांचा समावेश करण्यांत आला आहे. सर महमंद झाफरुल्लाखान हे हिंदी सभासद मंडळाचे प्रमुख आहेत.

---

## दिल्ली परिषदेंत व्हाइसरॉयांचें भाषण

ब्रिटिश साम्राज्यांतील सुएझच्या पूर्वेकडील देशांच्या प्रतिनिधींची परिषद दिल्ली येथें भरली आहे. तिचें उद्घाटन लॉर्ड लिनलिथगो ह्यांनीं गेल्या शुक्रवारीं केलें. त्या वेळच्या आपल्या भाषणांत त्यांनीं ह्या परिषदेच्या वैशिष्ट्याचें विवेचन केलें व ते म्हणाले ग्रेट ब्रिटनमधून जर्मनीच्या हल्ल्यांशीं धैर्यानें व निकरानें स्वातंत्र्याच्या तत्त्वासाठी झगडत असतां इतर रणक्षेत्रांत विशेषतः पूर्वेकडील युद्धभूमीवर शत्रूशीं लढण्याची जबाबदारी सुएझच्या अलीकडील राष्ट्रांनीं उचलली पाहिजे. ब्रिटिश राष्ट्रसंघांतील एका गटानें युद्धसामुग्रीविषयींची तयारी स्वतंत्र रीतीनें करण्याचें ठरवलें आहे ही गोष्ट अपूर्व आहे. ह्या तयारीच्या कार्यांत हिंदी राष्ट्र शक्य तेवढें सहाय देत आहे आणि देईल. कांहीं राष्ट्रांत कच्चा माल विपुल आहे तर कित्येकांत कारखान्यांची उत्पादक शक्ति मोठी आहे. परिषदेनें युद्धसामुग्रीची पैदास व तिचा पुरवठा ह्यांची कार्यक्षम वांटणी ह्या राष्ट्रांत केली पाहिजे आणि प्रत्येकाचा सहकार्याचा भाग निश्चित केला पाहिजे. ब्रिटिश राष्ट्रसंघाचें आर्थिक सामर्थ्य किती मोठें आहे ह्याची जाणीव जर्मनीस लवकरच होणार आहे. स्वातंत्र्य, संस्कृति व माणुसकी ह्यांची चाड असणाऱ्या राष्ट्रांनीं आपली शक्ति एकवटून हिटलरशाही कायमची नाहींशी करणें अगत्याचें आहे. परिषदेंत सामील झालेल्या लहानमोठ्या स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रांनीं उत्पादनाची एकत्र योजना आखावी व तिची अंमलबजावणी होण्यासाठीं एक कार्यकारी समिति नेमण्यांत यावी. ब्रिटिश मुख्य प्रधान मि. चर्चिल ह्यांनीं परिषदेस पाठवलेला संदेश व्हाइसरॉयनीं आपल्या भाषणाचे शेवटीं वाचून दाखविला.

---

# व्यक्ति एक पण सभासदत्वें अनेक !

अनुभवानें शहाणें होत जाणें हें एक जिवंत माणसाचें तसेंच जिवंत संस्थांचें लक्षण आहे. अनुभवानें मिळणाऱ्या शहाणपणाचा फायदा घेण्यास जी व्यक्ति किंवा जी संस्था तत्पर असते तिची प्रगति निर्वेध होत असते. या दृष्टीनें सहकारी चळवळीकडे अगर त्या चळवळीस आधारभूत असलेल्या कायद्याकडे नजर टाकल्यास असें आढळून येतें कीं, प्रत्यक्ष व्यवहार करितांना ज्या ज्या म्हणून अडचणी उपस्थित होतात त्या दूर करण्यास, नवीन प्रथा पाडण्यास किंवा कायद्यांत अगर त्या खालील नियमांत दुरुस्त्या करण्यास व जरूरी प्रमाणें नवीन नियम दाखल करण्यास सहकारी खातें अत्यंत जागरूक आहे. आतां अशा रीतीनें नवीन येणाऱ्या प्रथा, कायद्यांतील दुरुस्त्या किंवा नियमावलींतील होणारे बदल हे नेहमीच निर्दोष असतात असें जरी म्हणतां येत नसलें तरी सहकारी चळवळ दिवसेंदिवस खंबीर पायावर अधिष्ठित व्हावी या धोरणानेंच सहकारी कायद्यांत व त्या खालील नियमावलींत फेरफार होत असतात असें सर्वसाधारणपणें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

### नियमांत सुधारणा

याच मुळभूत हेतूनें गेल्या मे महिन्यांत मुंबई सरकारी गॅझेटमध्यें मुंबई सरकारनें सहकारी कायद्याखाली असलेल्या नियमांत कांहीं शाब्दिक दुरुस्त्या व कांहीं नवीन नियमांचे मसुदे प्रसिद्ध केले होते. त्या दुरुस्त्या व ते नियम आतां कायम झाल्याचें ता. ३।१०।४० च्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे. या सर्व दुरुस्त्यांची किंवा नवीन झालेल्या नियमांची गुणदोष-विवेचक चर्चा करण्याचा आमचा मानस नसून त्यांपैकी फक्त एकाच नवीन नियमाबद्दल या लेखांत थोडासा परामर्श घेण्याचें योजलें आहे. या नव्या नियमानें यापुढें आतां एकाच व्यक्तीस अनेक पतपेढ्यांमध्यें सभासद होता येणार नाहीं व जे कोणी असे अनेक संस्थांमध्यें सभासद झालेले असतील त्यांना कोणच्या तरी एकाच संस्थेचे सभासद राहण्याबद्दल व इतर संस्थांमधून कमी होण्याबद्दल भाग पाडण्याचा अधिकार या नव्या नियमानें रजिस्ट्रारसाहेब यांना मिळाला आहे.

### महत्त्वाकांक्षेचा परिणाम

कोणत्याहि सहकारी संस्थेंत सभासद होण्यासंबंधानें जे काय निर्बंध आहेत त्यांत एकाहून अनेक सहकारी संस्थांचें सभासदत्व असणें यांस आजवर हरकत नव्हती. फक्त एका अनियमित जबाबदारीच्या संस्थेच्या सभासदानें इतर अनियमित जबाबदारीच्या संस्थांमध्यें सभासद असतां कामा नये एवढाच निर्बंध होता. पण नियमित जबाबदारीच्या अनेक संस्थांमधून एकाच व्यक्तीला सभासद होतां येत असे. चळवळीच्या आरंभीच्या काळांत चळवळीमध्यें पुढारीपण पत्करणाऱ्यांना, कित्येकदा, नवीन संस्था सुव्यवस्थित चालावी या पवित्र हेतूनें स्वतःच वेगवेगळ्या संस्थांत सभासद व्हावें लागे, तर कित्येकदां तज्ज्ञ व जनतेला पसंत असणाऱ्या गृहस्थांनीं आपल्या संस्थेचें सभासदत्व घ्यावें म्हणून संस्थांकडूनच त्यांना आग्रह करण्यांत येई. व्यक्तीमुळें संस्थांना मोठेपणा व मानमान्यता मिळण्याचे आरंभीचे ते दिवस होते. पुढें मनुष्य-स्वभाव-सुलभ महत्त्वाकांक्षेनें कांहीं कांहीं व्यक्तींना, आपण सर्वच संस्थांमध्यें सभासद असलें पाहिजे; आपल्या शिवाय किंवा आपल्याच गटांतील कांहीं विवक्षित मंडळींशिवाय त्या संस्थेचें पानहि हालतां कामा नये अशा प्रकारचा अभिनिवेश निर्माण झाला. पुण्यांत तरी असा एक काळ होता कीं, तेथील बहुतेक सर्व प्रमुख सहकारी संस्थांचे कार्यकारी मंडळावर कांहीं विशिष्ट गटांतील इसम कोणत्या ना कोणत्या मार्गानें जागा पटकावून बसलेले आढळत.

### कर्जें उचलण्याची सोय

अनेक संस्थांमध्यें सभासद होऊन त्यांच्या कार्यकारी मंडळावर निवडून येणें ही बाब निदान निरुपद्रवी तरी आहे. पण अनेक संस्थांत सभासदत्व मिळवून त्या प्रत्येक संस्थेमधून पोटनियमांच्या आधारावर जास्तींत जास्त कर्ज उचलण्याची सोय सहजगत्या उपलब्ध होत राहिल्यानें व्यक्तिगत सभासदांचे एकूण कर्जाचे बोजे काळजी करण्याइतके प्रचंड फुगले. एका संस्थेंतून स्वतः घेतलेलें कर्ज व इतरांची पत्करलेली जामिनकी यांची माहिती दुसऱ्या संस्थांस सहजी उपलब्ध होण्यासारखी नसल्यानें तो इसम अनेक संस्थांमधून कर्जें काढूं लागला व भरमसाट जामिनकीचे बोजे पत्करूं लागला. आपला व्यवहार वाढतो आहे, दोन जामीन दिले आहेत मग कमी कां करा अशा धोरणानें सहकारी संस्थांनींहि मागेंपुढें न पहातां किंवा विशेष चौकशी न करितां सभासदांना (अनेक संस्थांचे) कर्जें मंजूर केलीं व त्यांनीं जामिनकीहि पत्करली ! कोणी इसम अनेक संस्थांचा सभासद झाला तरी त्याचेजवळ असलेलें तारण अनेक संस्थांबरोबर थोडेंच वाढणार ? सारांश, एकाच स्वरूपाच्या विशिष्ट तारणाकडे बोट दाखवून त्या इसमानें कर्जें घेतलीं व जामिनक्याहि भराभर स्वीकारल्या !

### घातुकपणा पटला, परंतु अंमलबजावणी होईना

हा चळवळींतील अनिष्ट भाग लेख्यापाढ्यांतील पतपेढ्यांपेक्षा नागरी सहकारी संस्थांमधून जास्त उघडपणानें दिसूं लागला व त्यास आळा घालण्याची तरतूद मात्र कोणाहि संस्थेनें आपण होऊन केली नाहीं. या सैलपणाचा अनिष्ट परिणाम लौकरच सहकारी चळवळीला भोगावा लागणार असें चिन्ह दिसूं लागतांच कांहीं वर्षांपासून रजिस्ट्रारसाहेबांनीं अनेक संस्थांचें सभासदत्व चालू ठेवणें कसें घातुक आहे तें दर्शविणारीं सर्क्युलरें काढलीं. वेगवेगळ्या सहकारी परिषदांमधून ठरावहि पास झाले. या पद्धतीचा घातुकपणा सर्वांना पटला. त्यांनीं मान्यहि केला. पण अंमलबजावणी मात्र कोणीच करण्यास पुढें येईना. संस्थांच्या चालकवर्गापैकी कोणी सहकारी कायद्याची, पोटनियमांची, बँकांच्या व्यवहारीपणाची वगैरे सबबी सांगून त्याआड दडूं लागले तर कोणी आपल्या व्यवहारावर परिणाम होईल म्हणून तर कोणी चार संस्थांचीं सूत्रें हलविण्याचा आपला सूत्रधारी हक्क बुडणार या भीतीनें ही हितावह सुधारणा अमलांत आणण्यास कचरूं लागले.

शेवटीं सर्व उपाय निकामी ठरलेले पाहून रजिस्ट्रारसाहेबांनीं मुंबई सरकारामार्फत सहकारी कायद्याखालील नियम नं. ४५मध्यें जरूर तो बदल करून एक नवीनच नियम दाखल करून घेतला आहे. या नव्या नियमान्वयें सहकारी मध्यवर्ती बँक, सेंट्रल बँक व खरेदी-विक्री करणाऱ्या संस्था वगळून बाकीच्या कर्ज देणाऱ्या कोणत्याहि दोन संस्थांचें सभासदत्व एकाच व्यक्तीस स्वीकारण्यास यापुढें मनाई करण्यांत आली आहे. कांहीं अपवादात्मक बाबतींत मात्र रजिस्ट्रारसाहेब यांच्या खास परवानगीनें

असें एकाहून अधिक संस्थांचें सभासदत्व स्वीकारतां येण्याची सोय नियमित ठेवली आहे. तसेंच, यापूर्वी जे इसम अनेक संस्थांचे सभासद झालेले असतील त्यांना रजिस्ट्रारसाहेबांकडून लेखी हुकूम येतांच त्या त्या संस्थानीं आपल्या संस्थेमधून कमी केलें पाहिजे अशा अर्थाचा आदेश दाखल करण्यांत आलेला आहे.

## सूचना

आज ना उद्यां या नवीन नियमाची अंमलबजावणी सुरू होणारच. तेव्हां आमची रजिस्ट्रारसाहेबांना यासंबंधीं अशी सूचना आहे कीं, त्यांनीं अनेक संस्थांचें सभासदत्व असणाऱ्या व्यक्तींना कोणच्या एका संस्थेंत सभासद म्हणून त्यांनीं राहावें तें ठरविण्याची प्रथम संधि द्यावी, व कांहीं ठरावीक मुदतही देण्यांत यावी. अमुक सभासदास अमक्याच संस्थेंतून कमी करावे असा आग्रह रजिस्ट्रारसाहेब यांनीं धरूं नये व ते तो तसा धरणारहि नाहींत अशी आमची अपेक्षा आहे. शिवाय, या धोरणानें व्यक्तींच्या अगर संस्थांच्या भावना दुखविल्या न जातां सेळीमेळीनें ही सुधारणा सहज घडून येईल. दिलेल्या मुदतींत व्यक्तींनीं अगर संस्थांनीं या नियमाची अंमलबजावणी न केल्यास मात्र रजिस्ट्रारसाहेब यांनीं त्या व्यक्तीनें कोणच्या एका संस्थेचें सभासद असावें तें आपल्या मर्जीप्रमाणें ठरवावें.

दुसरी एक बाब याचवेळीं आम्हांस रजिस्ट्रारसाहेब यांचे नजरेस आणावयाची आहे. ती अशी कीं, एका व्यक्तीस त्याची सर्व गरज भागविण्याइतकें कर्ज देण्याची सोय एकाच संस्थेच्या पोटनियमान्वयें होण्यासारखी नसल्यामुळें त्या व्यक्तीला दुसऱ्या संस्थेमधून कर्ज घेण्यास व आपली गरज भागविण्यास आजवर सभासद व्हावें लागत असे. ही अडचण विचार करण्यासारखी आहे. स्वतःची पत आहे, तारण पुरेसें आहे, परत फेडीचीं साधनेंहि निश्चित आहेत, पण संस्थेच्या नियमांतच कर्जाची मर्यादा अपुरी असेल तर त्या सभासदाची कुचंबणा होईल. तशी ती न व्हावी म्हणून त्याच्या गरजा पूर्णपणें भागविल्या जातील अशी कर्जाची मर्यादा तावडतोब वाढवून देण्याची सोय मात्र रजिस्ट्रारसाहेब यांनीं केली पाहिजे. नाहींतर सभासद असणाऱ्या संस्थेंत पुरी सोय नाहीं व इतर संस्थांतून मज्जाव! साहजिकच ती व्यक्ति सहकारी क्षेत्राच्या बाहेर जाण्याची इच्छा धरील. तसें मात्र होतां कामा नये. कर्जाची मर्यादा वाढवितांना सभासदाची पत, त्यानें देऊं केलेलें तारण व त्याची परतफेडीची ऐपत आणि शाश्वति लक्षांत घेऊनच सर्वसाधारण अगर विशिष्ट मर्यादा वाढविणेंत आल्या पाहिजेत.

## सल्लागार-मंडळ

सरतेशेवटीं तिसरी एक बाब नमूद करून हा लेख आम्हीं पुरा करणार आहों. अनेक संस्थांमधून सभासदत्व स्वीकारण्याचा आग्रह यापूर्वी केला गेला त्याचें कारण कांहीं विशिष्ट व्यक्तींचा अनुभव, त्यांचें ज्ञान, त्यांची सचोटी, इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन त्यांच्या ज्ञानाचा फायदा आपल्या संस्थेस मिळावा अशी इच्छा असे. ही बाबहि विचारार्ह नाहीं असें कोण म्हणेल? तरी सहकारी संस्थांना ' सल्लागार-मंडळ ' नेमण्याची तरतूद पोटनियमांत करणेंबद्दल व अशा सल्लागार मंडळांत कांहीं सभासद नसलेले तज्ज्ञ म्हणून नेमून घेण्याबद्दल सोय करून देण्याची रजिस्ट्रारसाहेब यांनीं व्यवस्था करावी. म्हणजे सदर नवीन नियमावर कोणाचाहि व कसल्याहि प्रकारचा आक्षेप शिल्लक उरणार नाहीं, असें आमचें मत आहे.


# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

अधिकृत भांडवल रु. १०,००,००० | विक्रीकरितां भांडवल रु. ५,००,०००

खपलेलें भांडवल रु. २,३९,२०० | वसूल भांडवल रु. ५६,३७०

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

रा. रा. न. अभ्यंकर, चेअरमन
रा. एस्. एम्. जोशी
रा. एस् के. भावे
रा. जी. यू. चितळे
रा. ग. रा. साठे, व्हाइस चेअरमन
रा. डी. जी. बापट
रा. एल्. आर. धडफळे
रा. डब्ल्यू. पी. वैद्य
रा. चिं. त्रिं. चितळे

**बँकेची प्रगति दाखविणारा तक्ता**

| | वर्ष १९३७ | वर्ष १९३८ | वर्ष १९३९ | सप्टेंबर १९४० (अखेर) |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल ... | रु. १,१८,१०० | १,६५,६०० | २,०४,९०० | २,३९,२०० |
| वसूल भांडवल ... | रु. २७,९९५ | ३८,३८० | ४८,९१५ | ५६,३७० |
| खेळतें भांडवल ... | रु. १,४३,९६७ | १,०३,१८४ | ३,९७,९८६ | ४,०५,८६३ |
| नफा ... | रु. (तोटा) १५० | ३,०२९ | ५,५५४ | ५,२०० |
| खातेदार ... | ४२५ | ७२५ | १,२५० | १,५०० |

सर्व तऱ्हेचे बँकेचे व्यवहार केले जातात.

गो. धों. जोगळेकर,
बी. ए. (ऑनर्स), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिं. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर

# *Greetings of the Season!*


We wish our Patrons

A Very Happy Diwali

&

A Prosperous New Year

★★★



रजिस्टर्ड ट्रेड मार्क



# DAMODARDAS BHAGWANDAS

*Telephone:* 9/907 ★ 761, RAVIWAR, POONA ★ *Telegram:* AGARBATTY

**The Well-known House**

**FOR**

**All kinds of Perfumes.**

*Specialists in Agarbattis*

**( ESTABLISHED 1872 )**

# हिंदी लोकसंख्येची वाढ

१८५१ ते १९३१ ह्या पन्नास वर्षांच्या मुदतींत हिंदुस्थानची लोकसंख्या २५ कोटि, ३९ लक्षांची ३५ कोटि, २८½ लक्ष झाली. एकूण वाढ ९ कोटि, ८९ लक्षांची झाली. ह्या मुदतींत शिरगणतीच्या क्षेत्रांतहि ४,२६,०५५ चौरस मैलांची भर पडली, ती लक्षांत घेतली नाहीं तर पन्नास वर्षांत हिंदी लोकसंख्या ३९% वाढली, असा हिशेब होतो. ह्याच मुदतींत इतर देशांच्या लोकसंख्येंत कशी वाढ झाली, हें पुढील तक्त्यावरून समजून येईलः—

| देश | लोकसंख्येंत वाढ% |
|---|---|
| अमेरिका | ८६ |
| जपान | ७४ |
| ग्रेटब्रिटन | ५४ |
| इटली | ४७ |
| स्वित्झरलंड | ४४ |
| जर्मनी | ४२ |
| हिंदुस्थान | ३९ |
| स्पेन | ३७ |
| फ्रान्स | ११ |

### मंद गतीनें वाढ

सुमारें १५९० च्या सुमारास हिंदुस्थानाची लोकसंख्या १० कोटि होती असें माजी हिंदी सनदी नोकर मि. डब्ल्यू. एच. मोरलंड ह्यांनीं आपल्या एका ग्रंथांत म्हटलें आहे. हा अंदाज गृहीत धरल्यास, हिंदी लोकसंख्या ३४१ वर्षांत ३½ पट झाली, असा अर्थ होतो. ब्रिटिश लोकसंख्या १८०१ ते १९३७ ह्या मुदतींत ८८ लक्ष ९३ हजारांची ४ कोटि, १० हजार झाली, म्हणजे १३६ वर्षांत ती ४½ पटीपेक्षा अधिक वाढली. सबंद जगाच्या लोकसंख्येचा विचार केला, तर ती तीनशें वर्षांत चौपट झाली, परंतु त्याच मुदतींत युरोपची वस्ती पांचपट झाली, असें दिसतें; म्हणजे, हिंदुस्थानांतील लोकसंख्येची वाढ जरा मंदगतीनेंच झालेली आढळते.

१८७२ ते १९३१ ह्या ६० वर्षांत हिंदी लोकसंख्येची वाढ कशी होत गेली, हें खालील आकड्यांवरून दिसून येईलः—

| दशवर्ष | दर हजारी दरसाल वाढ |
|---|---|
| १८७२–१८८१ | १·५ |
| १८८१–१८९१ | ९·६ |
| १८९१–१९०१ | १·४ |
| १९०१–१९११ | ६·५ |
| १९११–१९२१ | १·२ |
| १९२१–१९३१ | १०·६ |

१९४१ मध्यें हिंदी लोकसंख्या ४० कोटींची मजल गाठण्याचा संभव दिसतो. तसें झाल्यास, १९३१–१९४१ ह्या दहा वर्षांत ती १३·४% वाढली असें होईल.

### जननाचें उतरतें प्रमाण

जननाचें प्रमाण कमी होण्याची प्रवृत्ति जागतिक आहे व त्यास हिंदुस्थान अपवाद नाहीं; तथापि त्यास हिंदी आकडेशास्त्रज्ञ पुरेसें महत्त्व देत नाहींत, अशी प्रो. विनय कुमार सरकार ह्यांची तक्रार आहे. वरील माहिती त्यांच्याच एका लेखाचे आधारानें दिलेली आहे. १९०१ ते १९३२ ह्या मुदतींत हिंदी जननाचें प्रमाण कसें घटलें आहेत, हें खालील आकड्यांवरून कळून येईलः—

| मुदत | जननांचें प्रमाण |
|---|---|
| १९०१–१९१० | ३८ |
| १९११–१९२० | ३७ |
| १९२१–१९३० | ३५ |
| १९३१ | ३५ |
| १९३२ | ३४ |
| १९३३ | ३४ |

हिंदुस्थानांतील प्रजावाढीच्या प्रश्नास गांभीर्य यावें व संततिनियमनाच्या प्रसारास मदत व्हावी ह्या हेतूनें तर जननाच्या उतरत्या प्रमाणांकडे दुर्लक्ष केलें जात नसेलना? असा प्रो. सरकार ह्यांचा सवाल आहे.

जन्माचे वेळीं सर्वसाधारण हिंदी मनुष्याची अपेक्षित आयुर्मर्यादा किती असते, हें खालील तक्ता दर्शवितोः—

| वर्ष | पुरुष | स्त्री |
|---|---|---|
| १९११ | २२·५९ | २३·३१ |
| १९३१ | २६·९६ | २६·५६ |

न्यूझीलंडमधील अपेक्षित आयुर्मर्यादा सर्व देशांत अधिक म्हणजे ६५ वर्षे आहे. आयुर्मर्यादेचाच फक्त विचार केला आणि यंत्रसामुग्रीची वाढ, भांडवल, इत्यादि बाबी सोडल्या, तरी इतर देशांपेक्षा हिंदी लोकसंख्या कितीतरी कमी प्रभावी ठरते. उदाहरणार्थ, जपानमधील अपेक्षित आयुर्मर्यादा ५० वर्षे आहे; म्हणजे जपानी मोजमापानें हिंदी प्रभावी लोकसंख्या ४० कोटींऐवजीं २४ कोटीच आहे, असा अर्थ होतो. जोपर्यंत हिंदी लोकांची अपेक्षित आयुर्मर्यादा इतकी अल्प आहे, तोंवर संततिनियमनानें लोकसंख्या कमी करण्यांत अर्थ नाहीं व केवळ जननांची संख्या उतरवून आयुर्मर्यादा वाढणार नाहीं, रहाणीचें मानहि सुधारणार नाहीं, असा प्रो. सरकार ह्यांचा निष्कर्ष आहे.

### दर माणशी वार्षिक उत्पन्न

उद्योगधंद्यांचे बाबतींत हिंदुस्थान किती मागसलेला आहे, हिंदी लोकांचें शेतीवर अवलंबन किती मोठ्या प्रमाणावर आहे व त्या कारणानें हिंदी लोकांचें वार्षिक उत्पन्न इतर देशांतील लोकांचे उत्पन्नापेक्षा किती अल्प आहे ह्याची तुलनात्मक माहिती खालीं दिली आहे. आकडे वार्षिक दरमाणशी उत्पन्नाचे आहेतः—

| देश | उद्योगधंद्यांपासून उत्पन्न रु. | शेतीपासून उत्पन्न रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|
| अमेरिका | ८३० | २१९ | १,०४० |
| कॅनडा | ५४४ | ३०७ | ८५१ |
| ग्रेटब्रिटन | ४६३ | ६८ | ५३१ |
| जर्मनी | २८९ | १११ | ४०० |
| स्वीडन | ३८४ | १२९ | ५१३ |
| जपान | १६७ | ६७ | २३४ |
| हिंदुस्थान | १२ | ५९ | ७१ |

# दि सदर्न निटिंग वर्क्स

## लिमिटेड, पुणें २

### यांनीं तयार केलेली

# "पूना होजिअरी"

**★ "POONA HOSIERY" ★**

★

ह्या कारखान्यांत हल्लीं वूलन माल हर तऱ्हेच्या डिझाइन्समध्यें तयार होऊं लागला आहे. हीं डिझाइन्स आपणांस खास पसंत पडतील. त्याचप्रमाणें लव्हली, इंटरलॉक शर्ट, उन्हाळ्यासाठीं निरनिराळ्या प्रकारच्या जातीचा माल पुरुषांचे व स्त्रियांचे उपयोगाचा सुबक, सुंदर, टिकाऊ असा तयार होतो.

**आपल्या व्यापाऱ्याकडे अवश्य पहा.**

★

डायरेक्टर बोर्ड

शेठ द्वारकादास हरिदास वस्सारिया, ( अध्यक्ष )

श्री. रघुनाथ चिंतामण सोहोनी
श्री. गणेश सदाशिव मराठे, (ॲक्चुअरी)
श्रीमंत गजानन विश्वनाथ साळवेकर
श्री. रामकृष्ण गोविंद कुळकर्णी (एक्स-ऑफिशिओ)

प्रो. वामन गोविंद काळे
दि. ब. व्यंकटेश गोपाळ शेटे
श्री. रामचंद्र गणेश कुबेर
श्री. श्रीधर विठ्ठल सुपनेकर (एक्स-ऑफिशिओ)

★

ठेवीचे नियम, अर्जाचे नमुने व माहितीपत्रक मागवा.

२६४, शनिवार पेठ ★ पुणे २

# ★ एशियाच्या आर्थिक पुढारीपणाची जपानची भूमिका ★

पस्तीस वर्षांमागें रशियासारख्या प्रबळ युरोपिअन राष्ट्राशीं सामना देऊन त्यावर विजय मिळवण्यांत जपाननें जें अपूर्व यश संपादलें त्यासंबंधानें ह्या नवोदित एशियाटिक राष्ट्राचें चोहोंकडे कौतुक करण्यांत आलें. आधुनिक पद्धतीचीं शस्त्रास्त्रें आणि औद्योगिक साधनें ह्यांचा उपयोग कार्यक्षम रीतीनें करून पाश्चात्य राष्ट्रांशीं एशिया खंडांतील लोकांस दोन हात यशस्वी रीतीनें करतां येतात, ही गोष्ट जपाननें सिद्ध केल्यामुळें जपानी लोकांविषयीं हिंदुस्थानांत व इतरत्र अभिमान वाटूं लागला. जपानी राष्ट्रानें स्वतःचें आधुनीकरण झपाट्यानें घडवून आणलें आणि राज्यघटना, उद्योगधंदे, व्यापार, फौज व आरमार ह्या सर्वच बाबतींत पाश्चात्य लोकांचें अनुकरण केलें आणि हळूहळू त्यानें आपल्या गुरूंवरहि ताण केली. जपाननें गेल्या महायुद्धानंतर जगांतील प्रमुख राष्ट्रांमध्यें महत्त्वाचें स्थान पटकावलें आणि क्रमाक्रमानें आपलें आर्थिक बळ वाढवलें. परंतु अलीकडे जपानची राजकीय महत्त्वाकांक्षा वाढून त्यानें आक्रमणात्मक धोरणाचा अंगिकार करून कोरिया, मँच्युकाओ व चीन वगैरे देशांत आपली सत्ता बळजबरीनें स्थापन करण्याचा उपक्रम केल्यानें त्या राष्ट्राविषयींची जगांतील सहानुभूति नष्ट झाली आहे. राष्ट्रसंघाशीं असलेला आपला संबंध जपाननें तोडला आणि जगांतल्या सामान्य लोकमतास न जुमानतां चीनशीं युद्ध चालू ठेवलें. अखेर जर्मनी व इटली ह्यांच्याशीं विशेष स्नेहसंबंध जोडून जपाननें त्रिकुट बनवण्यास त्यांस सहाय केलें आहे. ज्याप्रमाणें जर्मनीनें पश्चिम युरोप खंडाचें पुढारीपण शेजारच्या राष्ट्रांचें स्वातंत्र्यहरण करून स्वतःच्या शिरावर घेतलें आहे आणि युरोपांत "नवीन मनू" चालू करण्याचा चंग बांधला आहे त्याप्रमाणेंच पूर्व एशिया खंडाचें नेतृत्व आपल्याकडे घेण्याचा व तेथें "नवीन युग" निर्माण करण्याचा विडा जपाननें उचलला आहे. चीन व पूर्वेकडील इतर देश ह्यांच्या राजकारणांत अमेरिका किंवा इतर राष्ट्रें ह्यांस पडण्याचें कारण नाहीं असें जपानच्या राज्यकर्त्यांचें म्हणणें आहे. पूर्व एशियांतील देश आपल्या कक्षेंत येतात आणि त्यांचें आर्थिक व राजकीय भवितव्य निश्चित करण्याचा अधिकार आपला आहे ही जपानची भूमिका आहे.

### जपान : आर्थिक क्षेत्रांतील दुवा

"स्टेटिस्ट" ह्या ब्रिटिश साप्ताहिकानें गेल्या ऑगस्ट महिन्यांत जपानच्या व्यापारासंबंधाचा एक खास अंक प्रसिद्ध केला आहे. ह्या व्यापाराच्या निरनिराळ्या अंगांविषयींचे माहितीनें भरलेले लेख त्या अंकांत प्रसिद्ध करण्यांत आले आहेत आणि ते सर्व जपानी तज्ञांनीं व धंदेवाल्यांनीं लिहिलेले आहेत. त्यांत प्रास्ताविक लेख प्रिन्स फ्यूमिमारो कोनो (मुख्य प्रधान) ह्यांचा आहे. पाश्चात्य राष्ट्रांनीं जपानच्या पूर्व एशियांतील स्थानासंबंधानें योग्य विचार करून जपानशीं तिकडील प्रदेशांच्या आर्थिक संवर्धनाचे बाबतींत सहकार्य करणें आवश्यक होतें, तसें झालें नाहीं त्याबद्दल त्यांनीं खेद प्रदर्शित केला आहे. जपाननें एशियांत महत्त्वाची आर्थिक कामगिरी बजावली असून तिचा फायदा पाश्चात्य राष्ट्रांसहि मिळाला आहे आणि त्यांनीं स्वतःच्या व सर्व जगाच्या हितासाठी जपानला पूर्वेकडे आर्थिक संघटन करण्याची मुभा देणें अगत्याचें आहे, ह्या आशयाचा लेखकाचा युक्तिवाद आहे. प्रिन्स कोनो म्हणतात:—"इंग्रजी भाषा बोलणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांकडून आधुनिक यंत्रसामुग्री विकत घेऊन जपाननें आपलें औद्योगिक उत्पादन वाढवलें आणि त्याच राष्ट्रांकडून अधिकाधिक माल घेण्याची पद्धति चालू केली. एशियांतील मागसलेले व दरिद्री लोक आणि पुढारलेले पाश्चात्य धंदेवाले ह्यांस जोडणारा दुवा जपान बनल्यानें सर्वांची रहाणी सुधारून त्यांचा फायदा झालेला आहे. ह्या रीतीनें जपानकडे नेत्याची भूमिका आली आहे. पौरस्त्य जनतेचें आर्थिक संघटन करून पाश्चात्य राष्ट्रांच्या मालास व मांडवलास पूर्व एशियांत क्षेत्र निर्माण करणें हें जपानचें कर्तव्य होऊन बसलें आहे. हें कार्य यशस्वी होण्यास इंग्लंड व जपान ह्यांचें सहकार्य आवश्यक असून चीनमधील सध्याची भानगड दूर झाली असतां एशियामध्यें नवीन युग चालू होईल."

### जपानची प्रगति म्हणजे इतर राष्ट्रांची प्रगति

केंजी कोढामा, जपानच्या परराष्ट्रीय व्यापार संघाचे अध्यक्ष, ह्यांनीं आपल्या लेखांत वरील प्रकारचीच विचारसरणी स्वीकारली आहे. ते म्हणतात:—"१८५४ मध्यें कमोडोर पेरी ह्यांनीं जपानला भेट दिल्यानंतर त्या राष्ट्राचा बाहेरच्या जगाशी संबंध जोडून आला. बादशहा मेजी ह्यांनीं दिलेल्या, "देशाचे दरवाजे खुले करा आणि प्रगतिमान बना" ह्या संदेशास अनुसरून जपानी राष्ट्रानें आपली आर्थिक उन्नति झिमेपणानें करून घेतली आहे. व्यापार आणि धंदे ह्यांच्या पाश्चात्य पद्धतीचा स्वीकार, लोकसंख्येचा विस्तार व सुधारलेली रहाणी ह्या कारणांमुळें जपानचा परराष्ट्रीय व्यापार वाढला. उद्योगधंद्यांस लागणारा कच्चा माल आयात करतां यावा म्हणून जपानला स्वतःचा माल परदेशांत पाठवावा लागला आहे. निर्गतीच्या मालांत, आयात कच्च्या मालापासून बनवलेल्या मालाचा अंतर्भाव होतो. त्यामुळें जपानच्या व्यापाराचा उपयोग जगांतील भिन्नभिन्न राष्ट्रांस झाला आहे व होत आहे; आणि जपानची आर्थिक प्रगति म्हणजे इतर राष्ट्रांची प्रगति अशी वस्तुस्थिति आहे. १९३१ सालानंतरच्या म्हणजे आर्थिक मंदीच्या काळांत जपाननें आपलें हुंडणावळीचें धोरण अशा रीतीनें आखलें कीं, जपानी माल परदेशांत स्वस्त भावानें विकतां यावा, अशा आशयाची टीका करण्यांत आली आहे. पण गरीब राष्ट्रांस नित्याच्या उपयोगाचे जिन्नस स्वस्त किंमतीस पुरवून जपाननें त्यांस आर्थिक सहाय्य दिलें आहे. पूर्व एशियांत नवी घडी बसवण्याचें कार्य जपाननें हातीं घेतलें आहे त्याचा उद्देश तिकडील व्यापार वाढवून सर्व राष्ट्रांच्या आर्थिक प्रगतीस उत्तेजन देणें हाच आहे. चीनचें राष्ट्रीय संघटन जपानला ह्यासाठीच हवें आहे. पूर्व एशियाचा व्यापार वाढल्यास त्यांत पाश्चात्य राष्ट्रांचेंहि हित आहे."

# शास्त्रीय संशोधनांत कोणतें राष्ट्र पुढें आहे ?

शास्त्रीय संशोधनास आतां आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें आहे. संशोधनाची माहिति देणारा निबंध कोणत्याहि देशांत व भाषेंत प्रसिद्ध होतांक्षणींच त्यास सर्व जगभर प्रसिद्धि मिळते. सर्व महत्त्वाच्या निबंधांचा संगतवार सारांश इंग्रजी व जर्मन भाषांत प्रसिद्ध होतो. युद्धपरिस्थितीमुळें त्यांत खंड पडेल, तो अपवादात्मक होय. शास्त्रीय संशोधनास सर्व राष्ट्रांनीं हातभार लावला असला, तरी त्यांतील प्रमुख वाटेकरी कोणते आहेत, हें प्रोफेसर हाल्डेन ह्यांनीं आपल्या एका निबंधांत सांगितलें आहे.

### संशोधनाची संधी पाहिजे

अमक्याच राष्ट्रास शास्त्रीय संशोधनाचा मक्ता आहे, असें म्हणतां येणार नाहीं; परंतु जेथें खुल्या विचारास वाव आहे तेथें संशोधन अधिक होईल, असें त्यांचें मत आहे. विश्वविद्यालयीन पदवीचा शिक्का नाहीं म्हणून केवळ संशोधनाची संधि मिळत नाहीं, अशी वस्तुस्थिति उपयोगी नाहीं. फॅरेडे हा जर आजच्या काळांतील असता तर त्यास, कित्येक देशांत, बुक बाइंडर म्हणूनच रहावें लागलें असतें. खऱ्या बुद्धिमान शास्त्रज्ञास शोधून काढण्याचा हमखास असा मार्ग नाहीं; अशीं रत्नें क्वचितच आढळतात, असें प्रोफेसर हाल्डेन ह्यांचें म्हणणें आहे.

शास्त्रीय संशोधनाचे बाबतींत ज्यू लोकांची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. ज्या संशोधनाचें श्रेय जर्मनीस मिळत आलें, त्याचे संशोधक सर्व ज्यूच होते. जर्मन आणि ऑस्ट्रियन ज्यू लोकांनींच आतांपर्यंत विशेष संशोधन केलें असलें,तरी ग्रेट ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, इत्यादि देशांतहि त्यांनीं आतां तें सुरू केलें आहे. न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया ह्या राष्ट्रांत विशेष संशोधनकार्य झालें नसलें, तरी त्यांनीं आपल्या देशांतून अनेक संशोधक बाहेर पाठविले आहेत. परिमाणूच्या अंतरंगाचा संशोधक ह्याचा जन्म न्यूझीलंडमधलाच आहे. जपानमधील संशोधन अजून प्राथमिक अवस्थेंत असलें, तरी युरोपांतील बहुतेक देशांपेक्षा जपानमधील संशोधनकार्य अग्रेसर आहे; पन्नास वर्षांचे अवधींत तें सर्व युरोपाचे पुढें जाईल. चीनमधील संशोधनाची प्रगति अमेरिकन नेतृत्वाखालीं होत आहे.

### हिंदी संशोधक

हिंदी संशोधकांत श्रीनिवास रामानुजन ह्यास पहिल्या प्रतीचा मान आहे. मद्रासमधील एका कचेरींतील ह्या कारकुनानें गणितामधील आपले कांहीं शोध १९१२ मध्यें केंब्रिजला पाठविले, तेव्हां लागलीच त्यास इंग्लंडमध्यें बोलावून घेण्यांत आलें. थोड्याच अवधींत त्यास रॉयल सोसायटीची व केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजची फेलोशिप मिळाली. १०० वर्षांपूर्वी जर रामानुजनचा अवतार झाला असता, तर त्यास जगांतील पहिल्या प्रतीचा गणिती म्हणून मान मिळाला असता. रामानुजनला मृत्यु लवकर आला, तरी विसाव्या शतकांतील गणित्यांमधील त्याचें स्थान अढळ आहे. त्याच्या प्रतीचा दुसरा संशोधक हिंदुस्थानांत अद्याप झाला नाहीं, ह्या प्रो. हाल्डेन ह्यांच्या म्हणण्यास चंद्रशेखर रमण ह्या शास्त्रज्ञानें खोटें ठरविलें आहे. हिंदुस्थानांतील शास्त्रीय संशोधनाची शीघ्रगतीनें प्रगति होत आहे.

### अमेरिका

दक्षिण अमेरिकेंतील फक्त आर्जेंटाईनचें संशोधक राष्ट्रांत नांव आढळतें. अमेरिकेंत म्हणजे युनायटेड स्टेट्समध्यें शास्त्रीय संशोधनाचें काम प्रचंड प्रमाणावर चालू आहे. माहिती गोळा करण्यांत तेथील शास्त्रज्ञ पुढें गेले असले, तरी त्या माहितीपासून निष्कर्ष काढण्याचें काम ब्रिटिश, जर्मन अगर डच संशोधकांकडे येतें. अमेरिकेंत शास्त्रज्ञांना मोठा पगार मिळूं शकतो व संशोधनास वावहि भरपूर मिळतो, ह्या कारणानें युरोपांतील शास्त्रज्ञांचा अमेरिकेकडे ओढा आहे. मोठ्या संशोधनशाळांपेक्षा डोकेबाज संशोधकांचें महत्त्व अधिक आहे. अमेरिकेंतील हुशार लोकांचें लक्ष राष्ट्रीय संवर्धनाकडे अधिक असतें; प्रत्यक्ष प्रयोगांकडे नसतें. अमेरिकेंत उच्च शिक्षणाचा मोठा फैलाव झाला असला, तरी त्या शिक्षणाचा दर्जा उच्च नसतो.

कॅनडानें ऑस्ट्रेलियापेक्षा कमी संशोधक इंग्लंडमध्यें पाठविले असले, तरी अमेरिकेंतील संशोधनाच्या परिचयामुळें कॅनडांत संशोधन बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालू आहे. रशियांतील संशोधनाबद्दल फारशी माहिती मिळूं शकत नाहीं. संशोधनाचें दर माणशीं प्रमाण लक्षांत घेतलें, तर युरोपांत हॉलंड व डेन्मार्क अग्रेसर आहेत. युरोपांतील हीं दोन्हीं राष्ट्रें अत्यंत निरोगी आहेत. ग्रेट ब्रिटन व जर्मनी ह्यांचें संशोधन-क्षेत्रांतील पुढारीपण निर्विवाद आहे. पन्नास वर्षांपूर्वी जर्मनी ग्रेट ब्रिटनचें पुढें होता, परंतु आतां ती स्थिति पालटली आहे. गेल्या अर्धशतकांत फ्रान्स मागें पडला आहे. संशोधकांस पुरेसें वेतन न मिळाल्यामुळें हुशार माणसें डॉक्टरी अगर इंजिनिअरिंग ह्यांकडे वळतात. इटली गणितासाठी प्रसिद्ध आहे. प्रयोगात्मक संशोधन तेथें फारसें चालत नाहीं.

★ सोनें चांदी मोती ★
व
त्यांचा तयार माल मिळण्याचें
ठिकाण
आपटे सराफी दुकान
उंबऱ्या गणपतीनजीक :: पुणें २

..."रम्य वाचनालय"...
म्हणजेच
आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचीं मनें व बुद्धि यांच्या
विकासाचें व रंजनाचें केन्द्र
यांचीं वैशिष्टयें:—(१) सर्व लेटेस्ट स्टॉक. (२) कादंबऱ्या, नाटकें, चरित्रें इत्यादि. (३) इंग्रजी मराठी मासिकें, तशींच वर्तमानपत्रें.
वर्गणी:—(१) स्वतः वाचनालयांतून घरीं नेणारास दर महिना सव्वा व चार आणे. (२) घरीं पोंचविण्यास दोन आणे जास्त. (३) मेंबर न होतां वाचनालयांतच वाचणारास प्रत्येक वेळेस पाव आणा.
शेवक हाऊस, ८ जंगली महाराज रोड, पुणें ४.
व्यवस्थापक, C. R. & Co., रम्य वाचनालय.

# नवीन मोटार-कायदा व प्रवासी

मोटार-वाहतुक-नियंत्रणासाठी हिंदुस्थान सरकारनें गेल्या सालीं नवीन कायदा केला तरी त्याचें अस्तित्व यंदाच्या एप्रिल-मध्यें मुंबई सरकारनें त्या कायद्यासंबंधांत अंमलबजावणीचे नियम करीपर्यंत फारसें भासमान होत नव्हतें. या एप्रिलपासून मात्र या कायद्यानें मोटारीच्या जगांत खळबळ उडून गेली आहे.

भाड्याच्या मोटारींचे मालक तर हतबुद्धच झाले आहेत. कारण या नियमांनीं त्यांच्या रोजच्या व्यवहारांत नवीन नवीन अडथळे उत्पन्न केले आहेत. सुरवातच मुळी नवीन खात्यापासून झाली आहे. धंद्याबाहेरील इतर मोटारवाल्यांच्या दृष्टीनेंहि या नवीन नियमांनीं बराच बदल झाला आहे. पहिला बदल म्हणजे पूर्वी नंबर प्लेट्स ज्या X १७९६ अशा प्रकारें देण्यांत येत असत त्यांचे ऐवजी त्या त्या प्रांतांचीं नांवें घालून आतां निराळ्या पद्धतीनें देण्यांत येत आहेत व पूर्वीच्या सर्व प्लेट्स केव्हां बदलून घ्याव्यात यासंबंधींहि या नवीन खात्यानें जाहिराती लावल्या आहेत.

या नवीन नियमांनीं धंदेवाले व मोटारवाले यांच्या बाबतींतच फक्त नियम केले आहेत असें नाहीं, तर भाड्याच्या मोटारींनीं प्रवास करणाऱ्या उतारूंच्या बाबतहि नियम केले आहेत. त्या नियमांप्रमाणें जर उतारूंनीं वर्तन केलें नाहीं तर ते शिक्षेस पात्र होतात. ते नियम खालीलप्रमाणें आहेतः—

## उतारूंच्या वर्तनाचे नियम

(१) असभ्य वर्तन करील तर किंवा

(२) गाडींतील स्त्री-उतारूला त्रास होईल अशा रीतीनें वागला तर, किंवा

(३) शिवीगाळी करूं लागला तर, किंवा

(४) दुसऱ्या एकाद्या उतारूच्या अंगावर धावून गेला किंवा धक्काबुक्की केली तर किंवा

(५) धूम्रपानाची बंदी केली असतां धूम्रपान केलें तर किंवा गाडीमध्यें पेट्रोल घेतांना धूम्रपान केलें तर किंवा

(६) थुंकला अगर पान खाऊन गाडींत त्यानें पिचकारी मारली तर किंवा

(७) कंडक्टरला त्याच्या कामांत अडथळा केला तर, किंवा

(८) भाड्याचे पैसे देण्याचें नाकारलें किंवा तें देण्यास त्याचेजवळ सामर्थ्य नसलें तर, किंवा

(९) कांहीं कारण नडलें नसतां गाडी चालविण्यास अडथळा केला तर, किंवा

(१०) अधिकृत माणसानें तिकीट मागितलें असतां दाख-विण्याचें नाकारलें तर, किंवा

(११) तिकीट खराब केलें म्हणून नवीन तिकीटासाठी पैसे मागितले असतां दिले नाहींत तर, किंवा

(१२) दुसऱ्या उतारूनें एकदां वापरलेलें तिकीट पुनः वापरलें किंवा दुसऱ्या मार्गावरील तिकीट चालविण्याचा प्रयत्न केला तर, किंवा

(१३) दुसऱ्या उतारूंना त्रास किंवा गैरसोय होईल एवढें मोठें त्याचें बोचकें किंवा गाठोडें असेल तर किंवा

(१४) बरोबर एकादें जनावर, प्राणी, मांस, हत्यार किंवा दुसरा एकादा पदार्थ असा बाळगला कीं, त्यायोगें शेजारच्या प्रवाशास त्रास होईल किंवा त्याच्या भावना दुखावतील तर, किंवा

(१५) बायकांच्या करतां राखून ठेवलेल्या जागेवर कायदे-शीर कारण नसतांना बसला तर, किंवा

(१६) गाणें गाईलें किंवा वाद्य वाजविलें तर, किंवा

(१७) लॉरीच्या एकाद्या भागाची नासाडी किंवा खराबी केली तर, किंवा

(१८) लॉरींतील एकादी घंटा किंवा दार यांचा धोक्याच्या सूचनेच्या कायदेशीर कारणाशिवाय अवलंब केला तर, किंवा

(१९) गुप्त रोगानें किंवा संसर्गजन्य रोगानें पछाडलेला आहे अशी सबळ शंका आल्यास, किंवा

(२०) कायद्यानें सांगितलेला एकादा गुन्हा केल्यास अगर त्यास उत्तेजन दिल्यास भाड्याच्या लॉरींतील उतारू शिक्षेस पात्र होतो.

गाडीच्या ड्रायव्हरनें किंवा कंडक्टरनें अशा इसमास गाडींतून खालीं उतरण्यास सांगावें व तो उतारू जर खालीं उतरला नाहीं तर बेलाशक बळजबरीनें त्याला खालीं उतरवावें व त्यास त्याचें भाडें परत देऊं नये. ड्रायव्हरचें जर अशा उतारूनें ऐकलें नाहीं तर त्यानें गुन्हा केला असें होईल.

* * *

ज्याप्रमाणें वरीलसारखे नियम केले आहेत त्याप्रमाणें टॅक्सीं-तून हिंडणाऱ्यासाठीहि कांहीं नियम केले आहेत. ते नियम येणेंप्रमाणें:—

(१) मोटारकॅबमध्यें बसणाऱ्या कोणत्याहि इसमानें त्या मोटारीची नासधूस करूं नये किंवा नुकसानी करूं नये, किंवा

(२) प्रवास केल्यावर होणारें कायदेशीर भाडें देण्याचें नाकारूं नये किंवा विसरूं नये.

(३) उतारू व टॅक्सी ड्रायव्हर यांचे दरम्यान जर कोण-त्याहि कारणानें कांहीं तक्रार उत्पन्न झाली तर त्यांपैकी कोणा-लाहि दुसऱ्याला पोलिसठाण्यावर घेऊन जातां येईल व त्या ठिकाणीं जर सामोपचारानें तंटा मिटला नाहीं तर त्या दोघां-चींहि नांवें पोलिसअधिकाऱ्याला लिहून घ्यावीं लागतील.

* * *

भाडोत्री लॉऱ्यांमधून जे उतारू नेतात त्यांतील मुलांसंबंधीं नियम खालील प्रमाणें आहेत.

(१) बारा वर्षांहून जास्त वयाचा मुलगा किंवा मुलगी नस-ल्यास त्याचें निम्में तिकीट समजावें.

(२) तीन वर्षांहून जास्त वयाचें मूल नसल्यास त्याचें कांहींच तिकीट घेऊं नये.

* * *

वरील प्रमाणें प्रवाशांना माहिती असावयास पाहिजे असलेले नियम आहेत. त्या नियमांवरून आपण काय करूं नये हें जसें कळून येईल त्याप्रमाणेंच इतरांनीं काय करूं नये व त्यासंबंधींचे आपले हक्क काय आहेत हेंहि कळून येणारें आहे व म्हणूनच ते मुद्दाम निराळे काढून येथें दिले आहेत.

# कॉमनवेल्थ

## ॲशुअरन्स कंपनी लिमिटेड, पुणें २

- युद्धाच्या नौबती झडत असल्यामुळें आज आपणांस भविष्य काळाबद्दल अनिश्चितता वाटत आहे. पण
- आपल्या स्वतःच्या आयुष्याचा रोज झगडा झडत असतांना त्याची आपण दखलगिरी घेतली आहे काय ?
- राष्ट्राचीं उज्ज्वलता व्यक्तींच्या कर्तबगारीवर अवलंबून असते तर व्यक्तीस मनःस्वास्थ्य असल्यास कर्तबगारीस अवसर मिळतो.

मनःस्वास्थ्य मिळविण्यासाठी
**कॉमनवेल्थची विमा-पॉलिसी**
घेणें अत्यंत जरूर आहे.



कॉमनवेल्थची भव्य इमारत

हयातीनंतरच्या विम्यावर रु. ५४ } त्रैवार्षिक
हयातींतील विम्यावर रु. ४५ } बोनस

विम्यासाठी अगर एजन्सीसाठी खालील पत्त्यावर लिहा..

रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.,
मॅनेजिंग एजंट.

कॉमनवेल्थ, लक्ष्मी रोड, :: :: :: पुणें–२

# संग्रहालयें व शिक्षण

संग्रहालयांचें शिक्षणविषयक कार्यक्षेत्र वाढवावें असा ठराव १९३७ साली दिल्ली येथें हिंदुस्थान सरकारनें भरविलेल्या संग्रहालयांच्या परिषदेमध्यें झाला. त्यानंतर हा ठराव डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांचेकडे सरकारमार्फत संग्रहालयांच्या चालकांकडे विचारासाठी व अमलबजावणीसाठी पाठविण्यांत आला. हिंदुस्थानांतील सर्व संग्रहालयें या विषयाचा आपआपल्या परीनें विचार करीत आहेत. संग्रहालयांची उपयुक्तता प्रत्यक्षपणें वाढवावयाची झाल्यास त्यांचा व शिक्षणसंस्थांचा अधिक निकट संबंध यावयास पाहिजे व तो जितका येईल तितकी त्याची उपयुक्तता अधिक वाढेल. वरील संग्रहालयांच्या परिषदेच्या ठरावानुसार मुंबई प्रांतिक शिक्षणखात्यानें हा विषय शिक्षणसंस्थांच्या निदर्शनास आणला आहे व शिक्षणखात्याची योजना अशी आहे कीं, मुंबई प्रांतांतील सर्व श्रेष्ठ शिक्षण-संस्थांतील प्राध्यापकांनीं संग्रहालयांतर्गत विषय व्याख्यनद्वारा शाळांतील शिक्षकांना अवगत करून द्यावे आणि तदनुरोधानें शिक्षकांनीं असे विषय आत्मसात करून घेऊन आपल्या शाळेंतील विद्यार्थ्यांस ते नियतकालिक वर्गपद्धतीनें समजावून सांगावेत. अशा प्रकारची योजना प्रत्यक्षपणें सुरू झाल्यावर संग्रहालयांची उपयुक्तता वाढेल आणि नवीन नवीन उपकरणें व साधनें आणि अभ्यासक्रमांतून असलेले विषय आणि प्रचलित अभ्यासक्रमाच्या कक्षेबाहेरील विषय शिक्षकांना व विद्यार्थ्यांना परिचित होऊं लागतील आणि त्यांच्या सामान्य ज्ञानांत नवीन व उपयुक्त भर पडेल.

### संग्रहालयें व संग्रहालयसदृश संस्था

याकरितां मुंबई प्रांतांत संग्रहालयें व संग्रहालयसदृश इतर संस्था ज्यांचा या योजनेंत अंतर्भाव करतां येईल अशा किती आहेत याची एक सूचि तयार होणें आवश्यक आहे. तसेंच, महाविद्यालयें व त्या दर्जाच्या संस्था यांमधून या योजनेशीं सहकार्य करावयास कोण तयार होतील याचीहि एक सूचि तयार व्हावयास पाहिजे. यानंतर शिक्षक तयार असून त्यांच्या अपेक्षेप्रमाणें जे विषय संग्रहालयांत नाहींत ते नवीन तयार करणें जरूर होईल. यायोगें संग्रहालयांचेंहि कार्यक्षेत्र वाढेल. एकट्या पुणें शहरापुरता विचार केल्यास या शहरांत १६—१७ संग्रहालयें आहेत व ज्यांचा संग्रहालयें म्हणून उपयोग करतां येणें शक्य आहे अशा संस्था १० चे वर आहेत. या संग्रहालयसदृश संस्था आणि महाविद्यालयांतील ज्ञानदानसमर्थ असे अध्यापक यांच्या सहकार्यानें पुष्कळ कार्य करतां येणें शक्य आहे. परंतु सध्या स्थिति अशी आहे कीं, इतक्या उपयुक्त संस्था व त्यांचेजवळ असलेली बहुमोल साधनसंपत्ति यांचा उपयोग प्राध्यापकांस, शिक्षकांस व विद्यार्थ्यांस जेवढ्या प्रमाणांत व्हावा तसा मुळींच होत नाहीं. पुणें शहरांतील संग्रहालयविषयक संस्थांची नामावली खालीं दिली आहे.

(१) लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम.
(२) भारत इतिहास संशोधक मंडळ.
(३) नाट्य—संशोधक मंडळ.
(४) चित्रकार मंडळाचा चित्रसंग्रह.
(५) एम्प्रेस बोटॅनिकल गार्डन्स.
(६) गणेशखिंड बोटॅनिकल गार्डन्स व म्यूझियम.
(७) जिऑलॉजिकल अँड एंजिनिअरिंग म्यूझियम, कॉलेज ऑफ एंजिनिअरिंग.
(८) कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर म्यूझियम.
(९) ऑब्झर्व्हेटरी.
(१०) शनिवारवाडा.
(११) पुना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीचें मॉडेल लाइट हौस.
(१२) प्रभात सिनेटोन स्टुडिओ.
(१३) लॉ. रे. इं. म्यू. या संस्थेचा विक्रीविभाग.
(१४) मिलिटरी डेअरी.
(१५) शीप ब्रीडिंग स्टेशन.

### अभ्यासक्रम

वरील संस्थांचे जवळ इतकी भरपूर व उपयुक्त साधनसामुग्री आहे कीं, तिचा उपयोग शिक्षणसंस्थांतील विद्यार्थ्यांस मुबलक होऊं लागल्यास या संस्थांचीहि उपयुक्तता वाढेल आणि शिक्षणाचीहि कार्यक्षमता दुणावेल याबद्दल यत्किंचितहि संशय नाहीं. या वरील संस्थांचेजवळ असलेल्या संग्रहांचे अनुरोधानें शिक्षण-संस्थांस उपयोगी पडतील व विद्यार्थ्यांना वस्तुपाठपद्धतीनें शिकवितां येतील असे सुलभ अभ्यासक्रम प्रथम तयार करावयास पाहिजेत आणि अशा अभ्यासक्रमांचा अंतर्भाव शाळांच्या नेहमीच्या अभ्यासक्रमांतून शिक्षणखात्यानें योग्य स्थान देऊन केला पाहिजे.

याशिवाय या योजनेच्या यशासाठी प्रांतांतील सरकारी उद्योगधंदे, शेतकी, जंगल, सहकार व ग्रामसुधारणा, आरोग्य, शिक्षण, एंजिनिअरिंग, पुराणवस्तु इत्यादि खात्यांतील तज्ज्ञांनीं त्यांच्या खात्यांतील चालत असलेल्या कामांना अनुलक्षून उपयुक्त असे विषय संग्रहालयांचे द्वारें प्रचलित करावेत. काळे कमिटीच्या अहवालामध्यें प्रांतिक सरकाराच्या संवर्धन खात्यांना आपआपलीं कामें व विषय जनतेपुढें मांडावयास संग्रहालयें हीं मोठीं उपयुक्त व कार्यक्षम साधनें होतील अशी शिफारस केलेली आहे. ही वरील सूचना देखील संग्रहालयें व शिक्षण या विषयांस पोषक आहे.

त्याचप्रमाणें प्रत्यक्ष उद्योगधंद्यांत काम करीत असलेल्या तज्ज्ञांचें या योजनेचे कामीं सहकार्य मिळविणें अत्यावश्यक आहे. ही वरील सर्व योजना प्रचलित झाली म्हणजे चांगल्या व उपयुक्त विषयांचेवर हळूहळु नवीन नवीन पुस्तकेंहि तयार होऊं लागतील.

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियमनें आपल्या संग्रहालयांत असलेल्या साधनसामुग्रीवरून एक सुलभ अभ्यासक्रम तयार केलेला आहे व तो पुणें येथील कांहीं शाळांच्या चालकांनीं आपल्या शाळांतून चालूहि केला आहे. याच विषयास अधिक प्राधान्य यावें यासाठी म्यूझियमनें आपलें शास्त्रीय व औद्योगिक वाचनालयहि अधिक समृद्ध करण्याची खटपट चालविलेली आहे.

संग्रहालयें व तत्सम संस्था यांचा शिक्षणामध्यें आणखी एक महत्त्वाचा उपयोग होण्याजोगा आहे. निरक्षरांना साक्षर करण्याचा जसा एक प्रचंड प्रयत्न चालू आहे त्याचप्रमाणें संग्रहालयांतर्गत वस्तुसंग्रहांचे साधनानें वस्तुपाठपद्धतीनें ज्ञानदानाचें कार्य मोठ्या कार्यक्षमतेनें व सुलभतेनें करतां येईल. अशा प्रकारें संग्रहालयशिक्षणाचे अगदीं सार्वत्रिक यत्न रे म्यूझियम संस्थेनें केले आहेत व ते बरेच यशस्वीहि झाले आहेत.

# नवीन विमाकायदा

विम्याचा धंदा हिंदुस्थानांत सुरू झाल्यानंतर १९१२ पर्यंत विमाकंपन्यांचा असा स्वतंत्र कायदा नव्हता. १९१२ नंतर १९३८ सालचा नवीन विमाकायदा विमा कंपन्या ज्यांचे सहकार्यानें चालतात अशा असंख्य विमेदारांच्या हितांचें संरक्षण करणारा म्हणून पास करण्यांत आला. विमेदारांचे व हिंदी विम्याचे धंद्याचे दृष्टीनें हा कायदा कितपत या कसोटीस उतरतो हें पाहूं.

## दोन लक्ष डिपॉझिटची अट

१९३८ चा विमा कायदा होण्यापूर्वी विमा कंपनी स्थापन करणें ही फारच सोपी गोष्ट होऊन बसली होती. त्यावेळच्या कायद्याप्रमाणें भराव्या लागणाऱ्या रु. २५,००० च्या डिपॉझिटची योजना ज्याला करतां येणें शक्य असेल त्यानें विमा कंपनीची स्थापना करावी. या बाबतींत सदर डिपॉझिटची रक्कम आतां रु. दोन लाखांवर गेल्यामुळें दरवर्षी नवीन स्थापन होणाऱ्या विमा कंपन्यांचें प्रमाण निश्चितच कमी झालें आहे. विमा कंपन्यांना स्थापन झालेनंतर अर्थातच नवीन विमेदारांकडून हप्त्याचे रूपानें रकम येत असते व त्या दृष्टीनें स्थापनेनंतर इतर धंद्याप्रमाणें चालू भांडवल लागत नाहीं. परंतु पूर्वी डिपॉझिटची रकम सहज जमा करतां येण्यासारखी असून फारशी जबाबदारीहि नसे व त्यामुळें प्रथम वर्षाचे जमा होणारे हप्ते सर्व खर्च होऊन शिवाय दुसरे वर्षांतील हप्त्यांतील रकमेवर बोजा रहात असे व याला तारण म्हणून असलेलें डिपॉझिट अगदींच अपुरे पडे. या दृष्टीनें नवीन विमाकायद्यांतील रु. दोन लाख डिपॉझिटची अट अर्थातच विमा कंपन्यांचे वाढीचे दृष्टीनें फलदायकच होणार आहे.

## विमेदारांना प्रतिनिधित्व

नवीन विमाकायद्यानें विमेदारांना प्रतिनिधित्व देण्यांत आलें आहे. कंपनीकायद्याखाली स्थापन झालेल्या विमाकंपनीच्या एकूण संचालक मंडळापैकीं १/३ संचालक विमेदारांचे प्रतिनिधी म्हणून राहिले पाहिजेत. सुरवातीचें भांडवल देण्यापलीकडे भागीदारांची तशी विशेष अशी जबाबदारी नंतर नसतेच. विमा कंपनीला असंख्य विमेदारांचेंच नंतर सहाय्य लागते व त्या दृष्टीनें विमेदारांना संचालक मंडळावर प्रतिनिधित्व असणें अत्यंत जरूर होतें. अर्थात्, प्रतिनिधीत्वाच्या बाबतींत विमेदारांचें काय किंवा भागीदारांचें काय उदासीनत्वच कायम दिसलेमुळें प्रतिनिधित्व कायद्यानें देण्याचा हेतु सफल होत नाहीं. मतदानाच्या हक्काबद्दल नागरिक जितके जागरूक असतात त्या मानानेंच इतर बाबतींतील मताबद्दलची उत्सुकता दिसून येणार. नगरपालिकेंत निवडून येणारे नगरपिते, इतर संस्थांतील निवडून येणारे संचालक यांना पडलेली मतें, त्यांची त्या जागेवर येण्याची पात्रता याचा विचार केल्यास, विमेदारांना मिळालेल्या या प्रतिनिधित्वाच्या कायद्याचा अर्थात् त्या मानानेंच उपयोग होणार.

## विमेदारांची उदासीनता

१९३९ डिसेंबर अखेर सर्व विमाकंपन्यांचें वर्ष पुरें करण्यांत आलें असून यापुढें सर्व विमाकंपन्यांचें वर्ष १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असेंच रहाणार आहे. नवीन विमाकायद्याप्रमाणें या वर्षीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकी झाल्या त्यांचे अहवालांकडे दृष्टि टाकल्यास विमेदारांचें या नवीन हक्काच्या बाबतींत असलेलें उदासीनत्व अधिकच लक्षांत येतें. बऱ्याचशा कंपन्यांना जरूरीपेक्षा कमी उमेदवारांचे अर्ज आलेमुळें निवडणुकीच्या सभा रद्द कराव्या लागल्या. याचा स्पष्ट अर्थ असा होतो कीं विमेदार आपली ठेव ज्या ठिकाणीं ठेवतात त्या संस्थेच्या बाबतींत त्यांना विचार करण्याकरतां वर्षांतून एकदांहि फावत नाहीं. या बाबतींत विमेदारांनीं संघ स्थापून त्यामार्फत प्रतिनिधींची निवड करून आपला हक्क गाजवला-राखला-पाहिजे. संचालक मंडळावर निवडून येणारे संचालकहि मानाची व थोडेबहुत पैसे मिळण्याची जागा याच दृष्टीनें संचालकत्व पत्करतात. त्यांचेमध्यें जबाबदारीची कल्पना, कार्याचें महत्त्व ओळखणें, कर्तव्याची जाणीव हीं फारच थोड्या प्रमाणांत दिसून येतात. वास्तविक संचालक जबाबदार रहातील तर सार्वजनिक भांडवलावर चालणाऱ्या असंख्य कंपन्या उर्जितावस्थेस येण्यास उशीर लागणार नाहीं.

## खर्चावर नियंत्रण

नवीन विमाकायद्यावर जे अनेक आक्षेप घेतले जातात त्यांमध्यें नवीन विमाकायद्यान्वयें विमाकंपन्यांच्या खर्चाचे प्रमाणावर बंधन घातलें नाहीं हा एक होय! या बाबतींत कलम २८ प्रमाणें दर सहा महिन्यांस पाठवावे लागणारे जिंदगीचे तक्ते पाहिले असतां खर्चाचे प्रमाणावरील निर्बंध तावडतोब लक्षांत येतो. पहिल्या वर्षाचे हप्त्यांपैकी ९० टक्केपेक्षां अधिक व दुसरे वर्षापासूनचे नंतरचे हप्त्यांपैकी विमागणितीनें खर्चासाठी तरतूद केलेल्यापेक्षा अधिक टक्के खर्च दाखवितां येत नाहीं. याचा स्पष्ट व सरळ अर्थ असा होतो कीं पहिल्या वर्षांपैकी ९० टक्के व दुसऱ्या वर्षानंतरचे हप्त्यांपैकीं विमागणितीनें तरतूद केल्यापेक्षा अधिक खर्च करतां येणार नाहीं. विमाएजंटाचें कमिशन सकृद्दर्शनी कमी केलेलें दिसतें, परंतु या बाबतींत ओव्हररायडिंग कमिशनवर कांहींच निर्बंध न घातल्यामुळें पूर्वीपेक्षां कमिशनवरचा खर्च कोणत्याहि दृष्टीनें कमी होणें शक्य नाहीं. कमिशनचे दरावर निर्बंध घालावा अशी मागणी झाली असतां एजंटांकडून त्या बाबतींत बराच कांगावा केला गेला व निर्बंधाची सूचना या आरडाओरडींत अर्थातच विलीन झाली. एजंटांना मिळणारें कमिशन कितपत योग्य व त्यांचे श्रमाचे प्रमाणांत आहे किंवा नाहीं याबाबत सविस्तर विचार येथें करणें शक्य नाहीं; तथापि सर्वसाधारणपणें हल्लीं मिळणारें हें कमिशन निर्विवाद पुरेसें आहे यांत शंका नाहीं.

## मूल्यमापन

आजपर्यंत विमागणितीला निरनिराळ्या कंपन्यांना निरनिराळें-फायदेशीर असेल तेंच-कोष्टक लावून त्या त्या कंपन्यांच्या चालकांना पाहिजे असलेला बोनस जाहीर करतां येण्यासारखें मूल्यमापन करतां येत असे व त्यामुळें खर्चाचें प्रमाण मर्यादेपेक्षा अधिक असूनहि कित्येक कंपन्या बोनस जाहीर करूं शकल्या. यापुढें मूल्यमापन करतांना विमागणितीनें मूल्यमापनाचे वर्षापर्यंत पडलेलें खर्चाचें प्रमाण, मिळालेला व्याजाचा दर या गोष्टी डोळ्यापुढें ठेवून करून या प्रकारें बोनस जाहीर करण्याच्या शर्यतींत धावून वर नेवर पटकावण्याच्या कृतीस सहाजिकच आळा बसेल व विम्याविषयीं संपूर्ण ज्ञान नसलेल्या विमेदारास थोड्या प्रमाणांत कां होईना पण विमाकंपन्यांचें खरें स्वरूप कळून येऊन थोड्या खर्चात काटकसरीचा कारभार करून स्थाईक होणाऱ्या विमा कंपन्यांकडेच ते निश्चितपणें धांव घेतील व आपो-

आपच कमी खर्च करण्याकडे कंपन्यांचें लक्ष जाऊन त्या दृष्टीनें अंतीं विमेदारांचें हितच होईल. व्याजाच्या दरांचा हिशेब करतांना त्यावर द्यावा लागणारा इन्कमटॅक्स वजा करून नंतर दर काढावयाचा असें एक कलम आहे. अर्थात या बाबतींत हिंदी विमा कंपन्यांची निष्कारणच गळचेपी झालेली आहे, कारण अशा प्रकारें व्याजाचा दर अर्थातच कमी घेऊन त्या दृष्टीनें वाजवीपेक्षा अधिक कठीण अशी कसोटी ठेवण्यांत हिंदी विमा कंपन्यांचा पाय ओढण्यांत आला आहे असें नाइलाजानें म्हणावें लागतें.

### रक्कम गुंतविण्यावर निर्बंध

याशिवाय वर्षअखेरीस विमेदारांचे त्यावेळचे जोखमीकरितां म्हणून जरूर असलेल्या रकमेच्या ५५% रक्कम सरकारी व तत्सम हमी घेतलेले रोखे यांमध्यें, गुंतविण्याच्या निर्बंधामुळें व्याजाचा दर अधिकच कमी पडणार आहे. हिंदुस्थानासारख्या शेतकीप्रधान देशाला—कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना—विमा कंपन्यांसारख्या लांब मुदतीची गुंतवणी करणाऱ्या संस्थांकडून मदत होणें शक्य नसेल तर होणार तरी कोणाला? जे शेतकरी मारवाड्यांचे व सावकारांचे कमींत कमी १२ ते १८ टक्के व्याज देऊं शकतात — सावकार त्यांचेकडून वसूल करून घेतात — त्यांचें–सावकारांचें–मुद्दलहि बुडत नाहीं, त्यांना विमा कंपन्यांचे लांब मुदतीचें व सर्वसाधारण दराचें व्याज निश्चित परवडलें असतें. आज जी शेतकऱ्यांची परिस्थिति पिढ्यान् पिढ्या कर्जांत खितपत पडल्यासारखी आहे तिला उजळा मिळाला असता, यावरून नवीन विमाकायदा करतांना हिंदी शेतीची व शेतकऱ्यांची सुधारणा, हिंदी कंपन्यांचें हित, हिंदुस्थानची शक्यतों कंपन्यांच्या साहाय्यानें उन्नति व्हावी, यापैकीं कोणताही उद्देश कायद्याचे सल्लागार व कायदा पास करणारे असेंब्लीचे सभासद यांचे पुढें नव्हता हें सिद्ध होतें. असंख्य हिंदी विमेदारांच्या स्वकष्टार्जित रकमेपैकी कांहीं भाग शक्य झाल्यास शेतकरी अगर इतर धंदेवाले यांना देऊन त्यांना मदत करण्याचा मार्गहि मुद्दामच बंद करण्यांत आला आहे असें नाइलाजानें म्हणावें लागतें.

### मॅनेजिंग एजन्ट्स

नवीन विमा कायदा अमलांत आला त्या तारखेपासून म्हणजे ता. १ जून १९३९ पासून पुढें विमाकंपन्यांना कंपनीचें कामकाजाकरितां मॅनेजिंग एजंटांची नेमणूक करतां येणार नाहीं व झालेल्या नेमणुका तीन वर्षांचे अवधीनंतर आपोआपच रद्द होतील. या बाबतींत कंपनीज ॲक्ट अगर विमाकंपन्यांचीं आर्टिकल्स ऑफ असोसिएशन अगर मॅनेजिंग एजन्टांचे झालेले करारहि रद्द समजण्यांत येतील. या तीन वर्षांचे अवधींत कोणत्याहि मॅनेजिंग एजन्टाला पगार, कमिशन व इतर कोणताहि मोबदला धरून दरमहा रु. दोन हजार रुपयांचेवर रक्कम देतां येणार नाहीं व करार बाद करण्याबद्दल म्हणून मोबदलाही देतां येणार नाहीं. मॅनेजिंग एजन्टांची नेमणूक रद्द करून विमा संस्था स्थापन करून सुरवातीसच करार—कांहीं बाबतींत वंशपरंपरा करार आहेत—करून घेऊन पगार, भत्ता, पहिल्या व दुसऱ्या वर्षाचे कामावर कमिशन वगैरे उत्पन्नाच्या भरपूर बाबी निर्माण करून आयुष्यभर जहागिरीसारखा उपभोग घेणाऱ्या मॅनेजिंग एजंटांचा आपोआपच प्रश्न मिटला आहे. लोकांच्या भांडवलावर स्थापन झालेल्या संस्था आपले ताब्यांत ठेवून, संचालक मंडळावर आपले गटांतील प्रतिनिधी निवडून आणून, असंख्य विमेदारांनी पैपैसा मिळवून पुढील तरतूदीसाठी भरलेल्या हप्त्यांचा विनियोग वैयक्तिक बाबींत खर्च करण्यावर यामुळें चांगलाच निर्बंध बसेल.

वरील विवेचनावरून नवीन विमाकायदा सर्वसाधारण दृष्टीनें पहातां हिंदी विम्याच्या धंद्यास पोषक असाच थोड्या प्रमाणांत कां होईना होईल हें दिसून येतें व अशीच विमातज्ज्ञांची अपेक्षा आहे.


# धि पूना मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(स्थापना सन १९२४)

१ या बँकेंत चालू ठेव, सेव्हिंग्ज ठेव व एक ते पांच वर्षांच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

२ 'रिकरिंग डिपॉझिट' नांवाचें एक नवीन खातें बँकेनें सुरू केलें आहे. त्यासंबंधाची माहिती बँकेंत विचारावी.

३ या बँकेवरील चेक मुंबईस बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेतर्फे कमिशन न घेतां वटवले जातात.

वा. वा. पोतदार
चेअरमन.

**L. S. G. D.** Training classes for officers of Local Self Government Service under the auspices of the Government of Bombay and the Local Self Government Institute, will begin from ***1st November, 1940 at Bombay, Ahmedabad and Poona.***

**Fees Rs. 75**

***Apply for Prospectus to:***

THE HONORARY SECRETARY,
**410 Shanwar, Poona 2**
or
THE DIRECTOR,
**11, Elphinstone Circle, Fort, BOMBAY**

# ग्रंथालयांची उपयुक्तता

## प्राचीनकाळ व सांप्रतकाळ

प्रदर्शनांतल्या वस्तूंचें निरीक्षण ज्याप्रमाणें आपण बाह्यतः करतों, तद्वत् ग्रंथालयांतील ग्रंथांचें निरीक्षण करण्यानें ग्रंथांची ध्येय-सिद्धि होत नाहीं. प्राचीन काळीं ग्रंथ-निर्मिति अत्यल्प प्रमाणांत होत-असल्यामुळें ग्रंथांचा नुसता संग्रह करण्यापुरतेंच ग्रंथांचें महत्त्व राखण्याचा प्रयत्न केला जात असे. त्यांची उपयुक्तता वाढविण्याचे दृष्टीनें सांप्रतकाळीं जसे प्रयत्न केले जात आहेत तसे प्रयत्न प्राचीन काळीं करितां येणें शक्य नव्हतें.

सध्या, पाश्चिमात्य राष्ट्रांतून ग्रंथालयांच्या उपयुक्ततेविषयीं विशेष प्रयत्न केले जात आहेत. ग्रंथालयांच्या अंगोपांगांचा बारीक रीतीनें विचार करून ते आकर्षक करण्याकरितां व वाचकांच्या सर्वतोपरीनें सोयी वाढवून अधिकाधिक वाचकवर्गानें ग्रंथालयाचा लाभ घ्यावा ह्याकरितां चालकांचे आटोकाट प्रयत्न चालू असतात.

ग्रंथ-सूचींचें परिशीलन व ग्रंथांचा उपयोग करून घेण्याच्या शास्त्रीय पद्धती यांना विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमांत निश्चित स्थान असावयास पाहिजे. आपला शिक्षण-क्रम पुरा करून जगांत वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या आयुष्यांत आपल्या आवडत्या विषयाचा अभ्यास वाढविण्यास मदत व्हावी ह्या हेतूनें पुस्तकांची बौद्धिक दृष्ट्या व व्यावहारिक दृष्ट्या माहिती करून घेण्याचें ज्ञान असणें किती आवश्यक आहे हें व्यासंगी मनुष्यास सहज पटूं शकेल.

बहुतेक उपयुक्त पुस्तकांतील सडानसडा माहिती करून घेणें कोणासच शक्य नसतें. परंतु अशा पुस्तकांच्या अस्तित्वाबद्दल व त्याचा स्वतःला कसा व किती उपयोग करून घेतां येईल ह्याबद्दलचें ज्ञान असण्याची प्रत्येक अभ्यासकास जरूरी आहे. सर्वसाधारण महत्त्वाचे संदर्भग्रंथ काय आहेत ह्याबद्दल त्यास माहिती असावयास पाहिजे. एखाद्या विषयाचें मार्मिक संशोधन सहजरीतीनें व उल्हसित वृत्तीनें करितां येईपर्यंत कोणासहि आपल्या विषयांत प्रवीणता मिळवितां येणार नाहीं.

सांप्रत, ज्ञानाच्या ओघाची वाढ कल्पनातीत होत असल्यामुळें व ग्रंथोत्पादनसुद्धा द्रुत-गतीनें होत असल्यामुळें महाविद्यालयांतून प्राध्यापकांचीं नुसतीं व्याख्यानें ऐकून प्रौढ छात्रगणांना आपला अभ्यासक्रम सुलभ रीतीनें पुरा करितां येणें अशक्य झालें आहे व म्हणून ओघानेंच त्यांना वारंवार ग्रंथालयांचा उपयोग करून घेणें अवश्य होऊन बसलें आहे.

## ग्रंथांची रचना व ग्रंथसूचि

वर निर्दिष्ट केलेल्या परिस्थितीमुळें ग्रंथालयांची उपयुक्तता ज्यांना पटली आहे असा वाचकवर्ग दिवसेंदिवस वाढत चालला असल्यामुळें ग्रंथालयांतील ग्रंथांची मांडणी व ग्रंथ-सूचि सहज सोईस्कर, सुलभ व सुगम करण्याकरितां पाश्चात्य राष्ट्रांत फार बारकाईनें लक्ष पुरविलें जात आहे. आपल्या देशांत अशा व्यवस्थेची नुसती जाणीव सध्या झालेली आहे. परंतु अशी व्यवस्था उत्तम प्रकारें ठेवण्याचें श्रेय अद्यापपर्यंत क्वचितच ग्रंथालयांना लाभूं शकलें असेल. हें काम समाधानकारक रीतीनें होण्यास ग्रंथालयशास्त्राचें शिक्षण घेतलेले विद्वान् ग्रंथपाल आमच्या ग्रंथालयांना लाभावयास पाहिजेत.

## उपयुक्तता वाढविण्याचे प्रकार व तंत्र

ग्रंथालयांत संग्रहित केलेल्या ग्रंथांचा खरा उपयोग होण्याकरितां त्यांचें अस्तित्व वाचकांचे नजरेसमोर आणण्याचे निरनिराळे प्रकार आहेत व अशा प्रत्येक प्रकाराचें विशेष तंत्र असतें. तें तंत्र जर ग्रंथपालास नीट ठाऊक असेल तरच ग्रंथालयांत येणाऱ्या वाचकांचें समाधान त्यास करितां येईल.

उपयुक्ततेच्या दृष्टीनें या तंत्राचे पुढीलप्रमाणें मुख्य विभाग पडतात.

(१) ग्रंथांची निवड—स्थान व कार्यकारणपरत्वें भिन्न-सर्वमान्य वाङ्मयाची आवश्यकता.

(२) ग्रंथांचें वर्गीकरण.

(३) ग्रंथ-सूचि.

(४) वाचकांच्या सोयीप्रमाणें ग्रंथांची मांडणी.

(५) विषय-दर्शक फलकें; ग्रंथालयांतील ग्रंथांच्या रचनेचा तक्ता.

ग्रंथांची निवड ग्रंथालयांत येणाऱ्या वाचकांच्या ज्ञानाप्रमाणें व त्यांच्या ठराविक गरजेप्रमाणें व्हावयास पाहिजे. व्यापारी पेठेंत सार्वजनिक ग्रंथालय असेल तर त्यांत व्यापार-विषयक ग्रंथांचा व नियतकालिकांचा भरणा जास्त असावयास पाहिजे.

ग्रंथांच्या वर्गीकरणाचें काम फार कठीण असतें. प्रत्येकजण आपण स्वतः वर्गीकरण पद्धति तयार करूं म्हणेल तर स्थानपरत्वें व कालपरत्वें वर्गीकरणांत फार भिन्नता उत्पन्न होईल; व वाचकांची मोठीच गैरसोय होईल. म्हणून जी वर्गीकरणपद्धति सर्वमान्य असेल अशाच पद्धतीनें ग्रंथांचें वर्गीकरण करावें. ग्रंथालयांत कोणतेंहि पुस्तक विनावर्गीकृत असूं नये. कारण त्यामुळें तें पुस्तक कितीहि उपयुक्त असलें तरी तें वाचकांच्या नजरेस सहजरीतीनें येणार नाहीं.

ग्रंथांची रचना जरी शास्त्र-शुद्ध केलेली असली तरी वाचकांचें त्यामुळें पूर्ण समाधान होऊं शकत नाहीं. कित्येक विषय निरनिराळ्या ग्रंथांतून निरनिराळ्या संदर्भानें आलेले असतात. त्यांचें ज्ञान वाचकांना सहज सुलभ करण्यास ग्रंथ-सूचीचा फार उपयोग असतो. ग्रंथ-सूचीचे मुख्य तीन प्रकार आहेत:—(१) वर्गीकृत सूचि; (२) ग्रंथकार सूचि, (३) नामवार सूचि. एखाद्या ग्रंथांत विविध विषयांवर निरनिराळ्या लेखकांचे लेख असल्यास त्या सर्वांचा निर्देश सूचींतून सहजरीतीनें करितां येतो; व त्यामुळें वाचकांना अशा संदर्भांचा फार चांगला उपयोग होतो. ही सूचीच्या बाबतींत फार महत्त्वाची गोष्ट आहे.

ग्रंथांची उपयुक्तता उत्तम प्रकारें वाढविण्याकरितां व ग्रंथालयांत येणाऱ्या वाचकांची संख्या वाढविण्याकरितां वाचकांना प्रत्यक्ष कपाटांतून पुस्तकांची निवड करूं देणें फार आवश्यक आहे. नुसती सूचि चाळून ग्रंथांची निवड बरोबर रीतीनें करितां येत नाहीं. वाचनाची गोडी वाढविण्यास व अभ्यासकाची उत्सुकता वाढविण्यास प्रत्यक्ष कपाटापुढें उभें राहून ग्रंथ चाळण्याची सवलत असावयास पाहिजे.

## सर्वमान्य सूचि व संदर्भ ग्रंथ

प्रत्येक ग्रंथालयांत सर्वच उपयुक्त ग्रंथ ठेवतां येणें शक्य नसतें. परंतु निरनिराळ्या विषयांवर कोणते उत्तम ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत याबद्दलचें ज्ञान वाचकांना करून देण्याची जबाबदारी

ग्रंथालयावर आहे. म्हणून प्रत्येक ग्रंथालयांत हें ज्ञान देणाऱ्या सर्वमान्य सूचि ठेवणें जरूर आहे. कित्येक उपयुक्त सूची इंग्रजींत प्रसिद्ध आहेत, तशा प्रकारच्या आपल्या मातृभाषांतील वाङ्मयांच्या सूचि प्रसिद्ध व्हावयास पाहिजेत. तसेंच संशोधकांना आपल्या विषयांवर निरनिराळ्या नियतकालिकांतून कोणकोणते लेख प्रसिद्ध झालेले आहेत हें समजण्याकरितां नियतकालिकांच्या विषयवार सूची उपलब्ध असावयास पाहिजेत. "ज्ञानकोश", "व्यायामकोश", "व्यावहारिक ज्ञानकोश," "शास्त्रीय कोश", "धर्मकोश", "चरित्रकोश" वगैरे सर्व प्रकारचे संदर्भ कोश आणि निरनिराळ्या भाषांचे व शास्त्रांचे शब्द-कोश प्रत्येक ग्रंथालयांत असावयास पाहिजेत. त्यांचें महत्त्व पटवून देणें व त्यांचें परिशीलन करण्याची रीत वाचकांना समजावून देणें हें कार्य ग्रंथपालास करावें लागतें.

### ग्रंथपाल व वाचकवर्ग

ग्रंथालयाची उपयुक्तता वाढविण्याची बरीचशी जबाबदारी ग्रंथपालावर असल्यामुळें त्या बाबतींचें आवश्यक ज्ञान त्यास असावयास पाहिजे; व त्यानें त्या ज्ञानाचा उपयोग करून केला तरच ग्रंथालयाचा उपयोग उत्तरोत्तर वाढूं शकेल व ग्रंथालयाची भरभराट होऊं शकेल. आमच्या ग्रंथालयांची अशी प्रगति शक्य तितक्या लवकर होणें फार आवश्यक आहे व त्याकडे सूज्ञ वाचकांनीं व ग्रंथपालांनीं आपलें लक्ष पुरविलें तरच हें महत्त्वाचें कार्य साध्य होऊं शकेल.

# हिंदी रेल्वेज

## रेल्वे कंपन्यांवर सरकारचें नियंत्रण

हिंदुस्थानांतील प्रमुख रेल्वेजपैकीं नॉर्थ वेस्टर्न, ईस्टर्न बेंगॉल, ईस्ट इंडियन व ग्रेट इंडियन पेनिनसुला ह्या चार रेल्वेज हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या असून त्यांची व्यवस्थाहि सरकार पहातें. बी. बी. अँड सी. आय., मद्रास अँड सदर्न मराठा, आसाम बेंगॉल, बेंगॉल नागपूर आणि साउथ इंडियन ह्या पांच रेल्वेजवर सरकारची मालकी असली तरी त्यांची व्यवस्था कंपन्यांकडे आहे. बेंगॉल अँड नॉर्थ वेस्टर्न व रोहिलखंड अँड कमाउन ह्या दोन व इतर कांहीं लहान रेल्वेज कंपन्यांच्या मालकीच्या असून त्यांची व्यवस्था त्यांचेकडेच अगर सरकारकडे आहे. सर्व रेल्वेजवर हिंदुस्थान सरकारचें १८९० च्या इंडियन रेल्वेज ॲक्टाप्रमाणें नियंत्रण आहे.

### गॅरंटीच्या कंपन्या

रेल्वेजच्या कामासाठीं कंपन्या स्थापाव्या व त्या कंपन्यांचे भांडवलावर कांहीं किमान व्याज सुटण्याची सरकारनें हमी घ्यावी, अशी योजना १८४४ सालीं प्रथम मि. स्टीफनसन ह्यांनीं ईस्ट इंडिया कंपनीसमोर मांडली. तीस अनुसरून कलकत्ता ते मिर्झापूर (१०० मैल) व मुंबई ते कल्याण ह्या रेल्वेरस्त्यांचीं कंत्राटें अनुक्रमें ईस्ट इंडिया व जी. आय. पी. रेल्वे कंपन्यांस देण्यांत आलीं. गॅरंटीड कंपन्यांना रेल्वे रस्त्यांचें कंत्राट देण्याचें धोरण पुढें लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दीत निश्चित झालें व त्यास अनुसरून १८५४ ते १८६० वरींच कंत्राटें देण्यांत आलीं. त्यासंबंधांतील करारांनीं हिंदुस्थान सरकारास सर्व बाबतींत महत्त्वाचे अधिकार दिले व करारांचीं ९९ वर्षें पुरीं होण्यापूर्वी योग्य अटींवर कंपन्या विकत घेण्याचा अधिकार सरकारास दिला. व्याजाची हमी सरकारनें न घेतां रेल्वे रस्त्यांच्या बांधणी कामास पैसे मिळविण्याचा सरकारनें यत्न केला, परंतु तो अयशस्वी झाला. हिंदुस्थानांत रेल्वेजच्या कामास प्रारंभ झाल्यापासून २५ वर्षांचे अवधींत कंपन्यांनीं एकूण ६,१२८ मैल लांब रेल्वेरस्ता तयार केला, तर त्याच मुदतींत सरकारनें २,१७५ मैल लांबीचे लोहमार्ग तयार केले.

### दुष्काळ व वहातुकीच्या सोई

दुष्काळ कमिशननीं पुढें, १८८० मध्यें, हिंदुस्थानांत आणखी रेल्वेवहातुकीच्या सोई असण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. निदान ५,००० मैलांचे नवीन रेल्वेरस्ते झाल्याखेरीज दुष्काळापासून जनतेचें संरक्षण होणार नाहीं, म्हणून सरकारनें नवीन लोहमार्गांच्या बांधणीस उत्तेजन द्यावें, असें त्यांनीं सुचविलें. १८८० नंतर कंपन्यांस दिलेल्या गॅरंटीच्या अटी १८६० पूर्वींच्या अटींपेक्षा पुष्कळच सरकारास अनुकूल अशा आहेत. गॅरंटीच्या कंपन्यांशीं झालेले करार संधि मिळतांच पुरे करून, रेल्वेज सरकारच्या ताब्यांत घेण्याचें हिंदुस्थान सरकारचें धोरण आहे. निदान पूर्वींच्या अटींचे जागीं सरकारास अधिक अनुकूल अटी तरी नवीन करारांत समाविष्ट करून घेतां येतात.

### कराराच्या अटी

गॅरंटीड कंपन्या व सरकार ह्यांचेमधील कराराच्या अटींत खालील बाबी असतात:—

(१) रेल्वेरस्त्यांवर सरकारची मालकी असते.

(२) भांडवलापैकीं मोठा अंश सरकारचा असतो.

(३) नव्या भांडवली खर्चासाठीं सरकारनें पैसे द्यावे अगर कंपनीस देण्यास सांगावें. नफ्याची वाटणी ठराविक प्रमाणांत होते; बहुधा कंपन्यांचे वाट्यास कमी नफा येतो.

(३) ठराविक तारखेस भारतमंत्र्याच्या इच्छेनुसार सर्व करार पुरे होतात आणि तात्काल कंपनीचें भांडवल सरकारनें परत केलें पाहिजे.

(४) कंपनीनें रेल्वेरस्ता दुरुस्त राखून योग्य तितका नोकरवर्ग ठेवला पाहिजे.

(५) व्यवस्थेंत वाटेल ती सुधारणा करण्यास सांगण्याचा भारतमंत्र्यास अधिकार आहे.

(६) आगगाड्यांची वहातुक भारतमंत्र्याच्या सांगण्याप्रमाणें झाली पाहिजे. मालवहातुकीच्या व उतारूंच्या दराचे आकारणीवर भारतमंत्र्याचें नियंत्रण आहे.

(७) भारतमंत्री सांगेल त्याप्रमाणें कंपनीनें हिशेब ठेवले पाहिजेत.

अशा रीतीनें गॅरंटीड कंपन्यांच्या भांडवलांत सरकारचा मोठा भाग आहे, व्यवस्थेवर त्याचें प्रभावी नियंत्रण आहे व ठराविक वेळीं कंपन्या विकत घेण्याचा सरकारास अधिकार आहे.

# कंपन्या आणि मॅनेजिंग एजंट्स

हिंदुस्थानांत कंपनी आणि मॅनेजिंग एजंट ही जोड-गोळीच समजण्यांत येते. कंपनींचें वित्त-शोषण करून स्वतःचें उखळ पांढरें करणारे मॅनेजिंग एजंट या दृष्टीनें कंपन्या व त्यांचे व्यवहार यांजकडे पहाण्याची प्रवृत्ति बरेच वेळां दिसते. कांहीं कंपन्यांचे इतिहास या दृष्टिकोनास कांहींशी पुष्टि देत असले तरी उद्योग-धंदे व व्यापार या क्षेत्रांत झालेल्या आजच्या प्रगतीचा बराच मोठा भाग मॅनेजिंग एजंटांच्या वांट्याला जातो ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं.

तथापि, मॅनेजिंग एजंटांनीं वेळोवेळ दाखविलेली दूरदृष्टि आणि धाडसी, प्रसंगीं साहसी, वृत्ति यामुळें झालेली त्यांच्या कंपन्यांची प्रगति या सर्वांकरितां मॅनेजिंग एजंटांना कंपनीनें द्याव-याची किंमत किती हा प्रश्न शिल्लक राहातोच. १९३६ मध्यें हिंदी कंपनी कायद्यांत महत्त्वाचे फेरफार करण्यांत आले. मॅनेजिंग एजंटाची व्याख्या या कायद्यानें प्रथमच ठरविण्यांत आली. तसेंच त्याचे अधिकार व त्याच्यावरील जबाबदाऱ्या निश्चित करण्यांत आल्या. कंपनीकायद्यानें कंपनीच्या व्यवहारासंबंधीं मॅनेजिंग एजंटावर कांहीं नियंत्रणें घातलीं आणि त्यांचें उल्लंघन केलें असतां त्यावर कायदेशीर इलाजहि ठरविले. दक्ष संचालक मंडळ आणि जागृत भागीदार असलेल्या कंपन्यांच्या मॅनेजिंग एजंटांना त्यांना दिलेल्या अधिकाराचा दुरुपयोग यापुढें करितां येणार नाहीं अशी व्यवस्था कंपनीकायद्यानें केलेली आहे.

कायद्यानें कंपन्यांचे दोन वर्ग ठरविले आहेत. खाजगी कंप-न्यांचा एक वर्ग व दुसरा पब्लिक कंपन्यांचा. दोहोंतील मुख्य फरक असा कीं, पहिल्या वर्गांतील कंपनींत ५० पेक्षा अधिक भागीदार असत नाहींत; उलट, पब्लिक कंपनीच्या भागीदारांची संख्या कितीहि असली तरी चालते.

### मॅनेजिंग एजन्सीची मुदत

१९३६ च्या कंपनीकायद्यानें पब्लिक कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीची जास्तींत जास्त मुदत २० वर्षे असावी असें ठरवून टाकलें. ह्या मुदतीच्या अखेरीस मॅनेजिंग एजंटांना पुन्हां नेम-ण्याची सोय आहे. तथापि, एकाच वेळीं २० वर्षांहून अधिक मुदतीचा करार असूं नये असा कायद्याचा कटाक्ष आहे. ज्या कंपनीच्या मॅनेजिंग एजंटांची नेमणूक १९३६ चा कायदा अमलांत येण्यापूर्वी झालेली आहे त्यांची २० वर्षांची मुदत १५ जानेवारी, १९३७ पासून मोजण्यांत यावयाची आहे. २० वर्षांचे अखेरीस किंवा तत्पूर्वी त्यांची नेमणूक पुन्हां करण्याची सोय कायद्यानें ठेवलेली आहे. परंतु मुदत जर वाढविली गेली नाहीं तर मॅनेजिंग एजंटांनीं कंपनीकरितां केलेले सर्व योग्य व वाजवी खर्च दिले जावेत, तसेंच त्यांनीं कंपनीला दिलेलीं कर्जें किंवा त्यांना मिळणारा मेहेनताना या रकमांची फेड व्हावी; त्याखेरीज त्यांच्या मॅनेजिंग एजन्सीचा अधिकार नाहींसा होणार नाहीं अशी व्यवस्था कंपनीकायद्यानें करून ठेवली आहे.

### वेतन

पब्लिक कंपनीनें प्रसिद्ध करावयाच्या प्रॉस्पेक्टसमध्यें मॅनेजिंग एजंटांच्या नेमणुकीबाबत खुलासा करून त्यांना दिल्या जाणाऱ्या ऑफिस अलावन्सची रक्कम व निव्वळ नफ्यांतील त्यांच्या वाट-णीस जाणाऱ्या रकमेचें प्रमाण हीं स्पष्ट करावयाचीं असतात.

नवीन कायद्यानें मॅनेजिंग एजंटांना कंपनीकडून मिळावयाच्या पैशांचे मार्ग अशा रीतीनें मर्यादित व निश्चित केले आहेत. ऑफिस अलावन्स आणि नफ्यांतील कांहीं प्रमाणांत रकम याशिवाय इतर मेहनताना त्यांस द्यावयाचा असल्यास कंपनीनें तशा अर्थाचा विशेष ठराव करावयास पाहिजे. कंपनीला नफा झाला नाहीं किंवा घेताचा झाला व त्यामुळें मॅनेजिंग एजंटांना कांहीं रकम मिळणार नाहीं अशी स्थिति असेल तेव्हां त्यांना ऑफिस अलावन्सच्या बरोबरच दुसरी एक किमान रकम मिळावी अशी व्यवस्था करतां येते. हेतु असा कीं, मॅनेजिंग एजंटांना पुरेशी रकम मिळून कंपनीचा कारभार व्यवस्थित चालावा. वरील मुदतीच्या व मेहनतान्याच्या अटी खाजगी कंपनीच्या मॅनेजिंग एजंटांना कायद्यानें लागू केलेल्या नाहींत. पब्लिक कंपनीनें प्रॉस्पेक्टस काढला पाहिजे व त्यांत मॅनेजिंग एजन्सीच्या करारांतील मुख्यतः मेहनतान्याबद्दलचीं कलमें दिलीं पाहिजेत अशी व्यवस्था कायद्यानें केली आहे हें वर सांगितलेंच. परंतु मॅनेजिंग एजंटांची नेमणूक प्रॉस्पेक्टस प्रसिद्ध होईपर्यंत झालेलीच नसेल व ती नंतर होणार असेल, तसेंच त्यांना काढून टाक-ण्याचें झाल्यास, किंवा त्यांच्या व कंपनीच्या मधील करारांतील अटींमध्यें बदल करावयाचा असल्यास त्याला कंपनीच्या विशेष साधारण सभेचा तशा अर्थाचा ठराव असला पाहिजे.

मॅनेजिंग एजंट नादार ठरल्यास त्याची जागा रिकामी होते. कंपनीच्या कारभारासंबंधीं मॅनेजिंग एजंटावर जर जामीन न देतां येण्यासारखा फौजदारी गुन्हा शाबीत झाला तर कंपनी साधारण सभेच्या ठरावानें त्याला काढून टाकूं शकते.

कांहीं कारणांनीं कंपनीचे सारे व्यवहार जर कायमचे थांब-विण्यांत आले तर मॅनेजिंग एजंटाला कंपनीकडून त्याला मिळा-वयाचे पैसे वसूल करून घेतां येतात; तथापि, कंपनी बंद होण्यास जर मॅनेजिंग एजंटाचाच निष्काळजीपणा कारणीभूत असेल तर मात्र त्याला कांहींहि मिळणार नाहीं. अशा रीतीनें कायद्यानें मॅनेजिंग एजंटांवर जबाबदारी टाकून, त्यांनीं केलेल्या प्रामाणिक मेहनतीबद्दल आस्थाहि दाखविली आहे.

खाजगी व पब्लिक कंपन्यांच्या बोर्डावर मॅनेजिंग एजंटांतर्फे डायरेक्टर नेमण्याच्या अधिकारांत एक महत्त्वाचा फरक आहे. पब्लिक कंपनीच्या मॅनेजिंग एजंटांना एकंदर डायरेक्टरांच्या संख्येच्या ⅓ पेक्षा अधिक डायरेक्टर नेमतां येत नाहींत. खाजगी कंपन्यांच्या मॅनेजिंग एजंटांनीं नेमावयाच्या डायरेक्टरांच्या संख्ये-वर वरील बंधन नाहीं.

### कर्जें

पब्लिक कंपनी तिच्या मॅनेजिंग एजंटांना कोठल्याहि प्रकारचें कर्ज देऊं शकत नाहीं. तथापि कंपनीचे व्यवहार पहाण्याकरितां संचालक मंडळाच्या अनुमतीनें एका विशिष्ट मर्यादेपर्यंत कांहीं रकम मॅनेजिंग एजंटाच्या खात्यास जमा असेल तर ती रकम मॅनेजिंग एजंटांना दिलेलें कर्ज या सदरांत येत नाहीं.

अनेक कंपन्यांचे मॅनेजिंग एजंट बरेच वेळां एकच असतात. अशा वेळीं एका कंपनीचा पैसा दुसऱ्या कंपनीच्या व्यवहारा-करितां उपयोगांत आणला जाऊं नये म्हणून कायद्यानें एकच मॅनेजिंग एजंट असलेल्या कंपन्यांनीं एकमेकांना कर्जें देऊं नयेत, असें ठरवून कर्जें दिलीं तर तीं देणारे डायरेक्टर आणि

अधिकारी मंडळी यांचेवर कायदेशीर इलाज ठरविले आहेत. परंतु एका कंपनीच्या व्यवस्थेसाठी दुसरी कंपनी असेल तर तिला कर्ज देण्यास किंवा तशा अर्थाची जबाबदारी घेण्यास कंपनी कायद्यानें मना केलेली नाहीं. तसेंच एकाच मॅनेजिंग एजंटांनीं चालविलेल्या एका कंपनीनें दुसऱ्या कंपनीचे भाग अथवा डिबेंचर्स घ्यावयाचे झाल्यास पहिल्या कंपनीच्या संचालक मंडळाचा एकमतानें पास झालेला ठराव असला पाहिजे. डिबेंचर्स काढणें आणि कंपनीचें भांडवल गुंतविणें याबाबत संचालक मंडळाच्या सल्ल्यानें मॅनेजिंग एजंटानें चालावें. संचालक मंडळास वरील प्रकारची जबाबदारी मॅनेजिंग एजंटावर सोपविता येत नाहीं. कोणत्याहि मॅनेजिंग एजंटांनीं ते ज्या कंपन्यांचे मॅनेजिंग एजंट आहेत त्या कंपन्यांच्या व्यवहाराव्यतिरिक्त तसल्याच स्वरूपाचे इतर व्यवहार करूं नयेत असें कायद्यानें स्पष्ट म्हटलें आहे. १५ जानेवारी, १९३७ पासून दोन वर्षांचे आंत बँकांच्या क्षेत्रांतून मॅनेजिंग एजंटांचें उच्चाटन झालें पाहिजे अशा अर्थाचें एक स्वतंत्र कलमच नवीन कंपनी कायद्यांत आहे.

कायद्यानें मॅनेजिंग एजंटावर कोणती जबाबदारी टाकली व त्यांना कोणते अधिकार दिले याचें वर थोडक्यांत विवेचन झालें. कायद्याचा हेतु स्पष्ट आहे. मॅनेजिंग एजंटांचे अधिकार मर्यादित व्हावेत; त्यांची जबाबदारी निश्चित व्हावी; कंपनीच्या घटनेंत भागीदारांस योग्य प्रतिनिधित्व असावें; मॅनेजिंग एजंटांनीं जबाबदारी ओळखून कार्य करावें इत्यादि मुद्दे त्यांत महत्त्वाचे आहे. त्यांच्या किमान मुशाहिऱ्याची व्यवस्था करण्याची सवलत कायद्यानें ठेवलेली आहे.

---

### हिंदुस्थानांत रेल्वे इंजिनांच्या उत्पादनास प्रारंभ

अजमीर येथें रेल्वे इंजिनें करण्याची योजना मूर्त स्वरूपांत आली असून नॉर्थ-वेस्टर्न रेल्वेकरितां २० इंजिनें तयार करण्याची सिद्धता झाली आहे. ईस्टर्न बंगाल रेल्वेच्या वर्कशॉपमध्यें रेल्वे इंजिनांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करावें अशी पहिली योजना होती. परंतु युद्ध-परिस्थितीमुळें कांचीपरा येथील वर्कशॉपचा उपयोग युद्धोपयोगी शस्त्रसामुग्री तयार करण्याकडे होत असून रेल्वेचें तेथील काम आतां खरगपूर व जमालपूर येथील वर्कशॉपमध्यें करण्यांत येऊं लागलें आहे. परदेशची आयात बंद असल्यामुळें इंजिनें तयार करण्यासाठीं लागणारीं यंत्रें व इतर सामुग्री मिळणेंहि सुतें शक्य नाहीं. तथापि युद्ध-समाप्तीनंतर कांचीपराच्या वर्कशॉपचें रूपान्तर रेल्वे इंजिनें तयार करणाऱ्या कारखान्यांत करणें फारसें अवघड जाणार नाहीं.

१९४१-४२ सालामध्यें इंजिनें तयार करण्यासाठी ३,९३,२४,००० रुपये खर्च करण्याचें रेल्वे बोर्डानें ठरविलें आहे. १९४१-४२ मध्यें ४१ रेल्वे इंजिनें, ११७ बॉयलर्स व ९६८ डबे करण्याचा कार्यक्रम आहे. तसेंच मोठ्या व लहान रेल्वेकरितां वाघिणी बांधावयाच्या असून पेट्रोल, घासलेट इत्यादींची ने-आण करण्यासाठी टाक्यांच्या १३१ वाघिणी व १८५ इतर तेल-टाक्यांच्या वाघिणी बांधण्याची योजना जाहीर झालेली आहे. युद्धाच्या धामधुमींत यांतील किती कार्यक्रम पार पडेल हें पहावयाचें आहे; तथापि हिंदुस्थानांत रेल्वेचीं इंजिनें व डबे यांचें उत्पादन केल्यासेरीज भागणार नाहीं हेंहि निश्चित आहे. कारण असें कीं, वर दिलेल्या उत्पादनांतील बहुतेक भाग जुन्याच्या जागीं नव्याची योजना करण्याकरितांच आहे.

---


* उत्कृष्ट *

देशी कोको

मिळूं लागला. आतां देशीच कोको घेण्याचा निश्चय करून एका नवीन उत्पादक धंद्यास चालना देण्याचें श्रेय घ्या.

नांव लक्षांत ठेवा

गोल्डन कोको



बनविणार

साठे बंधु पुणें

# दीपावलीच्या मंगल प्रसंगीं

संसारांत

## खऱ्या सुखशांतीची पेरणी करा!

वेस्टर्न इंडियांत विमा उतरण्यानें किंवा या कंपनीची एजन्सी घेतल्यानें ही गोष्ट सहज साध्य होईल. या कंपनीच्या पुढील गोष्टी विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

- सवलतीचे हप्ते आणि अधिकांत अधिक बोनस.
- खर्चाचें आणि विमा रद्द होण्याचें कमींत कमी प्रमाण.
- अपघात झाला असतां मिळणारे फायदे.
- विमेदारांकरितां सेव्हिंग्ज बँकेची सोय.
- जॉइंट लाइफ, चिल्ड्रेन्स डिफर्ड एंडोमेंट आणि इतर आधुनिक विमायोजना.
- वार्षिक हप्त्यावर अडीच टक्के सूट व याशिवाय १० हजारांच्या किंवा अधिक विम्याच्या हप्त्यावर शेकडा १ टक्का विशेष सूट.

विम्याकरितां आणि एजन्सीच्या शर्तींकरितां भेटा अथवा लिहा :

पुणें शाखा :
१७९, बुधवार, :: लक्ष्मी रोड,
:: :: पुणें शहर :: ::

मॅनेजर,
वेस्टर्न इंडिया-आयुर्विमा कंपनी लि.
सातारा.



आग, मोटर, अपघात, वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन वगैरेच्या विम्याकरितां

# दि व्हल्कन इन्शुअरन्स

## कंपनी लिमिटेड, मुंबई

हीच देशी कंपनी सर्व लोक पसंत करतात.

एजन्सी व विम्याच्या कामाकरितां चौकशीचा पत्ता :

पुणें ब्रँच ऑफिस :

१७९ कर्वे बिल्डिंग, :: लक्ष्मी रोड :: पुणें २

ब्रँच सेक्रेटरी,
एम्. के. जोशी, बी. एस्सी.

# शंभर रुपयांच्या आंतील पगारांची जप्ती

## सिंध ज्यु. क. कोर्टाचा निवाडा

मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टाप्रमाणें कराची अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेनें सन १९३० सालीं प्रतिवादीविरुद्ध एक लवादनिवाडा मिळविला व त्यावरून प्रतिवादीविरुद्ध सन १९३९ सालीं दरखास्त देऊन त्याच्या पगारावर जप्ती मागितली. प्रतिवादी कराची पोर्टट्रस्टमध्यें नोकरीस असून त्याला अवघा ७० रुपये पगार होता. प्रतिवादीनें सदर दरखास्तींत 'आपला पगार शंभर रुपयांपेक्षा कमी असल्यानें सन १९३७ च्या ९ व्या कायद्यांतील योजनेप्रमाणें मी जप्तीस पात्र नाहीं' अशी तक्रार उपस्थित केली. सदर सन १९३७ च्या ९ व्या कायद्यानें, पगार जप्तीच्या कायद्याच्या दुरुस्तीमुळें, त्यापूर्वी झालेल्या लवादनिवाड्याचे बजावणीच्या कामीं शंभर रुपयांच्या आंतील पगार जप्त करतां येतो किंवा नाहीं? हा मुद्दा येथें निघतो. हा प्रश्न महत्त्वाचा असल्यानें 'न्यायबोध' मासिकांतील वरील दाव्याच्या हकीकतीचा सारांश येथें दिला आहे.

### नवीन कायदा

सिव्हिल प्रोसिजर कोड, कलम ६० च्या (इ) पोट-कलमांत कोणाहि पगार मिळणाऱ्या नोकराचा तीस रुपयांच्या आंतील पगार जप्त करतां येणार नाहीं, असा कायदा सन १९३७ च्या पूर्वी होता; परंतु सन १९३७ च्या ९ व्या कायद्यानें सदर कलमामध्यें दुरुस्ती करण्यांत येऊन शंभर रुपयांपर्यंत पगार जप्त करतां येणार नाहीं, असा नवीन कायदा करण्यांत आला. मात्र याच कायद्यांत एक कलम घालून अशी योजना करण्यांत आली कीं, सदरप्रमाणें झालेली दुरुस्ती योजना "१ जून, १९३७ पूर्वी दाखल करण्यांत आलेल्या 'दाव्यांतून' निर्माण झालेल्या प्रकरणांत लागणार नाहीं". म्हणजे सन १९३७ पूर्वी एखादा दावा होऊन त्यावरील हुकूमनाम्यावरून दरखास्त देऊन एखाद्याचा पगार जरी शंभर रुपयांच्या आंत असेल तरी तो जप्त करतां येईल. वादीतर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, 'सदरचे (ॲवार्ड) लवादनिवाडा ता. १ जून, १९३७ च्या पूर्वीचा असल्यानें त्यावरून दिलेल्या दरखास्तींत प्रतिवादीच्या पगाराची जप्ती करतां येईल.' प्रतिवादीतर्फे या युक्तिवादास असें उत्तर देण्यांत येतें कीं, 'लवादनिवाडा हा दाव्यांतून निर्माण झालेलें प्रकरण नाहीं आणि म्हणून वादी म्हणतो तो सन १९३७ च्या ९ व्या कायद्यांतील अपवाद त्यास लागत नाहीं; तेव्हां जरी लवादनिवाडा ता. १ जून, १९३७ च्या पूर्वीचा असला तरी त्यावरून प्रतिवादीचा शंभर रुपयांच्या आंतील पगार जप्तच करतां येणार नाहीं.'

### निर्णयाचा मुद्दा

तेव्हां निर्णयाचा मुद्दा असा कीं, लवादनिवाडा (मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट खालील) हा दाव्यांतून निर्माण झालेल्या प्रकरणांत समाविष्ट होतो अगर नाहीं. सदर को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टामध्यें सोसायटी व मेंबर लोक यांच्या दरम्यानच्या देण्याबाबत लवादनिवाडे करण्याची योजना करण्यांत आली असून असे झालेले लवादनिवाडे दिवाणी कोर्टानें जणूं स्वतः केलेल्या हुकूमनाम्याप्रमाणें बजावावयाचे असतात. आतां 'दावा' या संज्ञेंत हे लवादनिवाडे पडत नाहींत असें बहुतेक हायकोर्टांचें मत आहे. कारण, ज्या ठिकाणीं कोर्टांत 'फिर्याद अर्जी' दाखल होऊन जें प्रकरण सुरू होतें त्यासच 'दावा' म्हणावें, असें प्रिव्हिकौन्सिल या न्यायालयानें सुद्धा ६० इंडियन अपील्स १३ या निवाड्यांत मत दिलें आहे. त्याप्रमाणेंच कलकत्ता, मद्रास, मुंबई, येथील हायकोर्टांनींहि असेंच मत व्यक्त केलें आहे. सिंध कोर्टानें ऑ. इं. रि. १९३८ सिंध १७६ या निवाड्यांत याविरुद्ध मत प्रदर्शित केलें आहे, परंतु या निवाड्यांतील जज् मि. लोबो यांना पूर्ण आदर दर्शवून तें बरोबर नसावें, असें एकंदर निवाडा वाचून वाटतें. तेव्हां मुंबई को ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टप्रमाणें होणारा निवाडा रीतसर 'फिर्याद अर्जी' कोर्टांत दाखल होऊन त्यामधून अस्तित्वांत येत नाहीं; म्हणून प्रस्तुत कज्जांतील लवादनिवाडा जरी १९३७ च्या ९ व्या कायद्याच्या पूर्वी झालेला असला तरी त्यावेवरून दिलेल्या दरखास्तीवरून प्रतिवादीचा पगार जप्त करतां येणार नाहीं. म्हणून दरखास्त निकाली काढून रद्द करण्यांत आली.

### सारांश

(१) सन १९३७ च्या ९ व्या कायद्यानें पगारजप्तीच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन ज्या नोकराचा पगार शंभर रुपयांच्या आंत असेल तो पगार दरखास्तींत जप्त करतां येत नाहीं.

(२) ज्या दाव्यांतील दरखास्तीमध्यें पगार जप्त करून मागून मागणी केली असेल तो दावा तारीख १ जून, १९३७ पूर्वी दाखल झाला असेल तर वरील नियम त्यास लागू नाहीं. म्हणजे शंभर रुपयांच्या पेक्षां जरी पगार कमी असला तरी तो तीस रुपये सोडून जास्त असला म्हणजे जप्तीस पात्र असतो.

(३) को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टप्रमाणें झालेल्या लवादनिवाड्यावरून दरखास्त दिली असतां जरी तो निवाडा सन १९३७ जून पूर्वीचा असला तरी शंभर रुपयांच्या आंतील पगार जप्तीस पात्र असत नाहीं; कारण लवादनिवाड्यावरून दिलेली दरखास्त हें 'दावा' दाखल होऊन निर्माण झालेलें प्रकरण नसतें व त्यामुळें कायद्याच्या अक्षरशः शब्दयोजनेच्या अर्थानें सदर लवादनिवाड्यावरील दरखास्तींत कोणाहि नोकराचा शंभराच्या आंतील पगार जप्तीस धरतां येत नाहीं.

### निवाड्याचें महत्त्व

सदरील निवाडा सिंध ज्युडिशिअल कमिशनर कोर्टाचा जरी असला तरी 'लवाद-निवाडा' हा 'दावा' व त्यावरून दिलेली दरखास्त 'दाव्यांतून निर्माण झालेलें प्रकरण' असत नाहीं, हा त्यामध्यें काढलेला सूक्ष्म श्लेष फार महत्त्वाचा आहे. त्यामुळें को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचें कांहींसें नुकसान होण्याचा संभव आहे. कारण समजा एखाद्या को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या एखाद्या सभासदाला नव्याण्णव रुपये पगार आहे व त्यानें ता. ३० जुलै १९३७ रोजीं एखाद्या को-ऑपरेटिव्ह सोसायटीस लवाद-निवाडा करून दिला आहे. अशा स्थितींत त्याला इतर कांहींच इस्टेट नसेल तर त्याचा पगार जप्त करून वसुली करतां येणार नाहीं. मात्र त्याच्याविरुद्ध इतर कोणा सावकारानें सदर तारखेपूर्वी दावा करून हुकूमनामा मिळविला असेल तर त्या सावकारास दरखास्त देऊन त्याच्या पगारावर जप्ती आणतां येईल. सकृद्दर्शनीं हें विसंगत दिसतें. परंतु कायद्याच्या काटेकोर अर्थानें ही विसंगति होणें अपरिहार्य आहे.

---:०:---

# रक्तवर्धक

पंडुरोग (ॲनिमिया) यावर उत्कृष्ट गुणकारी· अत्यंत शक्तिवर्धक· वापरा.

## अभिनंदनीय प्रगति

पहिल्याच वर्षी प्रेफरन्स शेअरवर ५% डिव्हिडंड देऊनही यंदा ऑर्डिनरी शेअरवर

ऑर्डिनरी शेअर रु. २५ — ९% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. — प्रेफरन्स शेअर रु. १००

पैसे गुंतविण्यास उत्तम ... संधि ...

पांच हजार रुपयांचेवर ४ टक्क्यांनीं ठेवी स्वीकारणें आहेत.

प्रॉस्पेक्टससाठी लिहा.

कंपनीच्या उत्तरोत्तर लोकप्रिय होत असलेल्या या औषधांचा खप झपाट्यानें होत आहे.

१ रक्तवर्धक
२ बालजीवन
३ कॅल्सिप्रॉल
४ व्हॅसोसिन
५ थायोस्टॅनिन
६ टॉनिक पिल्स
७ कॅल्सिप्रॉइट
८ कांतिवर्धक
९ सुवर्णकल्प
१०. कंठशोधक

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि., पुणें ४.

— शाखा —

मुंबई—नागपूर—अमरावती—हुबळी—सांगली—कोल्हापूर—वगैरे.

卐 आमच्या ग्राहकांस व हितचिंतकांस ही दिवाळी आनंदाची जावो. 卐

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. — पदमजी पेपर मिल, मुंबई.

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये ?

ह्या प्रश्नास, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें,

## अनेक प्रकारांचा व प्रतींचा

कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून

## तो कागद घ्या.

८१५–१६ भवानी पेठ, पुणें. :: :: अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

# हवाईहल्ल्यांपासून बचाव

## इंग्लंडमधील व्यवस्था

चालू युद्धाचें हें वैशिष्ट्य आहे कीं तें केवळ सशस्त्र शिपायांसच लढावें लागत नसून सर्व नागरिकांस, म्हणजे स्त्री-पुरुषांस व आबालवृद्धांस, त्यांत भाग घ्यावा लागत आहे. जेथें प्रत्यक्ष लढाया चालल्या आहेत तेथें ही वस्तुस्थिति रात्रंदिवस अनुभवास येत आहे, कारण प्रस्तुत युद्ध हवेंतलें युद्ध आहे. आजपर्यंतच्या लढाया प्रतिस्पर्ध्यांच्या सशस्त्र शिपायांमध्यें होत असत. चालू युद्धांत जर्मन विमानें इंग्लंडमध्यें बिनलढाऊ नागरिकांवर आणि घरांवर जळाऊ बॉम्बसचा वर्षाव करीत आहेत. ब्रिटिश विमानें जर्मन प्रदेशांमध्यें आणि जर्मनीनें जिंकलेल्या देशांत लढाऊ स्वरूपाच्यां व उपयोगाच्या ठिकाणांवर बॉंब टाकीत असून त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु जर्मनी लढाऊ व बिनलढाऊ लक्ष्यांमधल्या फरकाचा विधिनिषेध बाळगीत नाहीं, हें लंडन व इंग्लंडमधील इतर शहरें ह्यांवर जर्मन विमानांचे हल्ले अहर्निश होत आहेत ह्यावरून स्पष्ट झालें आहे. शहरें व गावें ह्यांवर बॉंब टाकून तीं उध्वस्त व बेचिराख करण्यास जर्मनीनें पोलंडमधील लढाईपासून प्रारंभ केला. ह्या अमानुष युद्धनीतीचा प्रयोग जर्मनीनें पुढें दुसऱ्या युरोपिअन देशांत केला. युरोपचा पश्चिम किनारा जर्मनीच्या हुकमतीखालीं येतांच तेथून ग्रेटब्रिटनवर स्वारी करण्याची त्यानें तयारी चालवली आहे. ह्या स्वारीची पूर्वतयारी म्हणून जर्मनीनें गेले चार महिने इंग्लंडवर लढाऊ विमानें पाठवून त्यांच्या करवीं चोहोंकडे बॉंब फेकण्याचा सपाटा चालवला आहे.

### देशाभिमान व कर्तव्यबुद्धि

असल्या हल्ल्यांपासून जनतेच्या आणि मालमत्तेच्या रक्षणाची व्यवस्था इंग्लंडमध्यें करण्यांत आली आहे, ती विलक्षण संघटित व कार्यक्षम आहे आणि तिच्यामध्यें लक्षावधि ब्रिटिश नागरिक भाग घेत आहेत. स्त्रिया, मुलेंबाळें व खाजगी घरें ह्यांच्यावर स्फोटकारक व जळके बॉंब टाकून ब्रिटिश जनतेस घाबरवून टाकण्याचा जर्मनीचा उद्देश निष्फळ ठरला आहे. ब्रिटिश जनता शत्रूच्या अमानुष हल्ल्यास शांतपणानें व निश्चयानें तोंड देत आहे. मुंबईसारख्या हिंदी शहरांत हवाईहल्ल्यांपासून बचाव करण्याच्या व्यवस्थेच्या तालमी करण्यांत येतात, त्यांवरून लंडनमधील संघटित व कार्यक्षम संरक्षणपद्धतीची अंधुकहि कल्पना येणें कठीण आहे. शत्रुविमानांची चाहूल किनाऱ्यावरील टेहळणी करणारांस लागल्यापासून तीं परत जाईपर्यंत किंवा त्यांचा नाश होईपर्यंत इशारत देणारे सूचक, लढाऊ विमानें, आगी विझवणारीं इंजनें, ॲम्ब्युलन्स गाड्या, इंजिनिअर्स, सहाय्यक, डॉक्टर व नर्सेस, इत्यादींनीं आपापलीं कामें घड्याळाप्रमाणें बिनचुक करावयाचीं असतात आणि तीं रात्रंदिवस पद्धतशीरपणानें केलीं जात आहेत. स्वत:चे जीव धोक्यांत घालून हीं कामें ठरलेले लोक करीत आहेत. हवाईहल्ल्याचेवेळीं जनतेनें सुरक्षित ठिकाणीं जाऊन बसावें म्हणून आश्रयस्थळें चोहोंकडे बनवण्यांत आलीं आहेत. लोकांनीं आपापल्या घरांस लागूनहि अशीं आश्रयस्थानें तयार करून ठेवलीं आहेत. हल्ल्याची सूचना भोंगा वाजून होतांच संरक्षणाच्या व्यवस्थेचें यंत्र चालू होतें आणि त्याचीं अनेक चक्रें ठरल्याप्रमाणें फिरूं लागतात, जिवास किंवा मालमत्तेस अपाय झाल्यास त्याविषयींची तजवीज तात्काल केली जाते आणि हीं कामें बिनबोभाट होतात. त्यांमध्यें गडबड किंवा गोंधळ होऊं दिला जात नाहीं. ह्या सर्व कार्यक्रमाचें शिक्षण कित्येक महिनेपर्यंत देण्यांत येत होतें आणि अशीं लक्षावधि शिकलेलीं माणसें तयार झालेलीं आहेत. त्या सर्वांची शिस्त, जूट, धैर्य व शांत वृत्ति हीं नमुनेदार आहेत. फौजी, आरमारी व वैमानिक सैनिकांच्या पराक्रमाइतकीच महत्त्वाची कामगिरी त्यांचे हातून होत आहे. निरनिराळ्या खाजगी व्यवहारांत गुंतलेले वयस्क पुरुष आणि स्त्रिया हीं कामें देशाभिमानानें व कर्तव्याच्या बुद्धीनें प्रेरित होऊन करीत आहेत.

### सरकारी नोकर व स्वयंसेवक ह्यांचें सहकार्य

लंडन व इतर शहरें ह्यांचेमध्यें बचावाच्या आश्रयस्थानांची संख्या व त्यांच्या सुखसोयी वाढवण्यांत येत आहेत. हवाईहल्ल्यांचा प्रतिकार व त्यांचेपासून बचाव ह्या दोन्ही गोष्टींस प्रारंभ ग्रेटब्रिटनच्या किनाऱ्यापासून होतो. तेथें शत्रु-विमानांचा नाश करणाऱ्या तोफा डागलेल्या आहेत आणि टेहळणी करणारीं माणसें व विमानें आहेत. त्यांच्या कडून सूचना येतांच ब्रिटिश लढाऊ विमानें शत्रूच्या विमानांस वाटेंत आडवतात, त्यांचा नाश करतात व त्यांस पिटाळून माघारी लावतात. हा घेरा चुकवून आंत निसटणाऱ्या शत्रु-विमानांची स्थानिक सूचना दिली जाते आणि त्यांचा समाचार घेण्यास लढाऊ विमानें हवेंत उड्डाण करून तयार असतातच. अशा स्थितींत घाईघाईनें आपले बॉंब खालीं टाकून परत फिरण्यावांचून व स्वत:चा जीव वाचवण्याचा यत्न करण्यावांचून शत्रु-विमानांस गत्यंतर नसतें. अनेक जर्मन विमानें दररोज खाली पाडण्यांत येतात, तीं ह्या हवेंतील झटापटींत होय. शत्रु-विमानांच्या आगमनाची सूचना कोणत्याहि टापूंत देण्यांत येतांच घड्याळांतील अनेक चक्रांप्रमाणें वर वर्णिलेली कार्यकर्तीं मंडळी हालूं लागतात आणि आपला कार्यभाग पुरा पाडतात. त्यांच्या हालचालींस गती मध्यवर्ती कचेरींमधून मिळते आणि तेथील अधिकारी निरनिराळ्या संरक्षक दलांस शत्रु-विमानांच्या हालचालीची सूचना देतात. शत्रूचीं विमानें केव्हां व कोठें येतील आणि त्यांचे बॉंब कोणत्या ठिकाणीं पडतील ह्याचा नियम नसल्यानें जनतेस व विशिष्ट संरक्षक कार्यें पत्करलेल्या नागरिकांस सदैव जागरूक असावें लागतें. सरकारी नोकर आणि स्वयंसेवक स्त्री-पुरुष नागरिक ह्यांच्या पूर्ण सहकार्यानें हवाईहल्ल्यांपासून जीव व मालमत्ता ह्यांच्या बचावाचें काम चालतें. आगी विझवणें, निराश्रित व अपघातांत सापडलेल्यांची सोय करणें, औषधपाणी देणें इत्यादि गोष्टी त्यांत येतात.


# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

**वक्तशीरपणा व फिटिंग याची गॅरंटी**

**Prop. M. V. Risbud, B. A.**

सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणें २.

कागद कागद

ऑफिस-स्टेशनरी, कंपन्यांचे रिपोर्ट, अकाउंट बुकें, पॅकिंग, इ०साठी लागणारा देशी–विलायती

# कागद

## एम्. आर्. जोशी, बी. ए., पेपर मर्चंट

राम-निवास, लक्ष्मी रोड, पुणें शहर

यांजकडे

चालू युद्धकालांतही भरपूर व स्वस्त असा तयार आहे.

कागद कागद

---

भगिनींनो !

## आपल्या स्वयंपाकघरांत-

आमचे येथील

ताजा, स्वादिष्ट, खमंग, रुचकर, घरगुती

मसाला ■ ■ पापड

मेतकूट ■ भाजणी

लोणचें ■ ■ मोरावळा

व इतर निवडक जिनस वापरून निवडण्याचा त्रास वांचवून वेळाची बचत करा.

के. कमलाकर आणि कंपनीची

■ निर्भेळ

■ बिन–किडकी

■ आरोग्यदायक

■ रुचकर

व भरपूर मसाल्याची

## ऑफिस सुपारी

वापरा.

आजच आमच्याकडे मागणी करा :

## म. गो. कुळकर्णी आणि मंडळी

फडतरे चौक :: :: ७८६ सदाशिव :: :: पुणें शहर.

# विमा-विषयक वाङ्मय

हिंदुस्थानांतील आयुष्याच्या विम्याचा धंदा वाढत्या प्रमाणावर आहे, हें आतां सिद्ध झालें आहे. वाढत्या व्यापाबरोबर या धंद्यांत कमी-अधिक प्रमाणांत स्पर्धाहि आहेच. त्या योगानें विम्याचें महत्त्व पटवून देऊन, विमेच्छू तयार करण्यांत यश मिळविणें हें काम बऱ्याच अंशीं उठावदार पद्धतीनें कोण करूं शकतो, ह्यावर अवलंबून आहे. प्रत्येक विमासंस्था व विमेदार यांमधील एक महत्त्वाचा दुवा, विमा-एजंट हा असतो व उपरोक्त कार्य यशस्वी करून दाखविण्याची जबाबदारी प्रायः त्याच्यावरच पडते. या जबाबदारीची जाणीव प्रत्येक एजंटास असतेच, कारण त्याचा त्यांत अंतिम फायदा असतो. तथापि नवीन विमेच्छू तयार करण्याचें कार्य करीत असतां, त्यास या कार्यांत संस्थेचा पाठिंबा असण्याची जरूरी असते; व त्याच करितां त्यास विमेच्छूपुढें ठेवण्यास आकर्षक अशा विमा-वाङ्मयाची जरूरी भासते. विमेच्छू चोखंदळ असतात व त्यांच्या हातांत पडणारें संस्थेचें वाङ्मय साधारणतः आकर्षक, नमुनेदार, सुटसुटीत व संग्राह्य असावें असें त्यांस साहजिकच वाटत असतें. मोठमोठालीं माहितीपत्रकें, त्यांतील लांबलचक हप्त्यांच्या दरांची कोष्टकें व विशिष्ट सवलती हीं माहितीवांचून पहाण्याचा अगर त्यावरून साधी नजर फिरविण्याचा देखील विमेच्छूस कंटाळा असतो. त्याचप्रमाणें असें मोघम व भलें जाडजूड वाङ्मय जवळ बाळगणें एजंटासहि थोड्याफार अंशीं त्रासदायकच वाटतें.

विमा-संस्थेकडून तयार करण्यांत येणारें विमा-विषयक वाङ्मय दोन प्रकारचें असूं शकतें.

(१) फक्त एजंट वर्गाकरितां व (२) विमेच्छूंना एजंटकडून देण्यांत येणारें. पहिल्या वर्गांत नवीन काम मिळविण्यासंबंधींच्या सूचना, जुनें काम पुरें करण्यासंबंधींचे तगादे, अधिक काम मिळविण्याकरितां प्रोत्साहनपर पत्रें व विमा-संस्था व एजंट यांच्या दरम्यान होणारा पत्रव्यवहार वाढूं नये यास्तव त्यांस देण्यांत येणाऱ्या सर्वसाधारण सूचना इत्यादिकांचा समावेश होतो. तथापि या वाङ्मयाशीं तूर्त आपणांस कर्तव्य नाहीं. दुसऱ्या वर्गांत मोडणारें वाङ्मय मात्र अत्यंत महत्त्वाचें आहे. कारण त्याच्या परिशीलनांतूनच नवीन विमेदार उत्पन्न होत असतात, संस्थेची प्रतिष्ठा वाढते व टिकाऊ असें नवीन काम संस्थेस मिळत राहातें. अशा प्रकारें विमेच्छूंस पुरविण्यांत येणाऱ्या वाङ्मयाचे पुन्हां दोन पोट-भाग पडतात. पहिला अगर प्रत्यक्ष भेटीपूर्वी विमेच्छूकडे पाठविण्यांत येणारें वाङ्मय व दुसरा विम्याची महति पटवून देऊन प्रत्यक्ष केस हातांत पडण्यास उपयुक्त ठरणारें वाङ्मय. पहिल्या प्रकारांत विम्याची सर्वसाधारण महति पटवून देण्यास पोषक अशा कल्पनांचा भरणा ज्यास्त असणार तर दुसऱ्या प्रकारांत विमेदारांची तात्कालिक गरज भागविण्यास उपयुक्त अशा विशिष्ट विमा-योजनांची माहिती दिली जाईल.

तसेंच, आयुष्यांतील विविध संकटें व प्रसंग यांस अंतिम आयुर्विमा हाच एक सुरक्षित तोडगा कसा आहे, ह्याचें उत्तम दिग्दर्शन पहिल्या प्रकारचे वाङ्मयांत सापडेल. पाश्चात्य देशांतील विमा-एजंट विमेच्छूंची तात्कालिक गरजेची माहिती भेटीपूर्वीच मिळवून, प्रत्यक्ष भेटींत त्या गरजेस उपयुक्त असा विमाप्रकार विमेच्छुपुढें मांडण्यांत तरबेज आहेत. आपल्याइकडील एजंटांसही ही गोष्ट शिकली पाहिजे व त्या दृष्टीनें उपयुक्त असें वाङ्मय निर्माण करून विमा-संस्थांनीं एजंटांचे हातांत दिलें पाहिजे.

अशी उपयुक्त वाङ्मयाची कल्पना यशस्वी होण्यास सचित्र पत्रकांचा भरपूर प्रमाणांत उपयोग करणें अतिशय जरूर आहे. आयुष्यांत असे अनेक प्रसंग आहेत कीं, त्यांचें चित्रीकरण केल्यास भावना उचंबळून येतील; व भावना उचंबळून आपल्यावरच विमाविक्रीचें यश अवलंबून आहे. आपणांस हें माहितच आहे कीं कोणत्याहि प्रसंगाचें वर्णन वाचून मनावर जितका परिणाम होत नाहीं, तितका त्याच्या सुबक छायाचित्रानें होतो. म्हणूनच विमा-विक्रेत्यास त्याच्या कार्यांत यश मिळविण्यास सचित्र वाङ्मयाची जरूरी आहे.

आपल्याकडे या दृष्टीनें निर्माण झालेलें वाङ्मय जवळ जवळ नाहींच असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. अशा वाङ्मयाची जरूरी वास्तविक वाढत चालली आहे. प्रतिवर्षी विमा-संस्थांचा जाहिरातीवर बराच खर्च होत असतो. त्यांतील कांहीं भाग याच प्रकारच्या वाङ्मयावर खर्च करण्याकरितां राखून ठेवावा. कारण सर्वसाधारण देण्यांत येणाऱ्या जाहीरातींमुळें संस्थेचें नांव फार तर जनतेच्या डोळ्यापुढें राहतें, पण परिणामकारक, सुबक व सचित्र वाङ्मयानें व्यक्तिगत संबंध निर्माण होतो व याला विमा-विक्रींत अतिशय महत्त्व आहे.

महिलांचें भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

( कंपनीचा प्रॉस्पेक्टस् कायद्याप्रमाणें रजिस्ट्रारकडे नोंदण्यांत आला आहे. हा प्रॉस्पेक्टस् नाहीं; त्यांतील फक्त त्रोटक माहिती खाली दिली आहे. )

# दि विजय टेक्स्टाइल्स, लिमिटेड

## मुख्यतः पातळें व इतर कापड तयार करून विकण्यासाठी स्थापण्यांत आलेली लिमिटेड कंपनी

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. जी. व्ही. साळवेकर, बी. ए., सरदारगृह, मुंबई, चेअरमन
श्री. व्ही. व्ही. पंडित, बी. ए., एलएल. बी., रिटायर्ड जज्ज ऑफ स्मॉल कॉजेस कोर्ट, पुणें.
श्री. एम्. आर. जोशी, बी.ए., कागदाचे व्यापारी, पुणें.
श्री. एन्. के. वावडेकर, बी.एस्सी., लँडलॉर्ड, भोर स्टेट.
श्री. पी. सी. बेंद्रे, बी.ए., एलएल.बी., वकील, पुणें.
श्री. एस्. एम्. पाटकर, अध्यक्ष, तरुण ॲशुअरन्स कं. लि., लँडलॉर्ड व मर्चंट, मुंबई.
श्री. एम्. पी. सोमण, एम्. ए., मॅनेजिंग डायरेक्टर, वर्ल्ड वाइड ॲशुअरन्स लि., पुणें.
श्री. के. व्ही. जोशी, बी.एस्सी., एस्टेट ब्रोकर व मॅनेजर, पुणें.
श्री. एम्. एन्. परांजपे, बी. एस्सी., केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स, पुणें, एक्स–ऑफिशिओ
श्री. जी. डी. कवडीकर, पुणें, एक्स–ऑफिशिओ

**मॅनेजिंग एजंटस्**

महा–कवडीकर आणि कंपनी.

**बँकर्स**

१ दि बँक ऑफ इंडिया, लिमिटेड. | २ दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड.

**ऑडिटर्स**

श्री. जी. डी. आपटे, बी.ए., जी.डी.ए., आर. ए.

**कायद्याचे सल्लागार**

श्री. व्ही. व्ही. पंडित, बी.ए., एलएल.बी., रिटायर्ड जज्ज ऑफ स्मॉल कॉजेस कोर्ट, पुणें.
श्री. पी. सी. बेंद्रे, बी.ए., एलएल. बी., वकील, पुणें.

**रजिस्टर्ड ऑफिस**

५१३, शनवार, मेहुणपुरा, पुणें २

★

● पातळांचा व लुगड्यांचा कारखाना मोठ्या प्रमाणावर पुणें येथें चालविण्यांत अनेक फायदे आहेत. श्रीमंत जी. व्ही. साळवेकरांच्या सारखे उद्योग-धंद्यांतील नामवंत अध्यक्ष कंपनीस लाभले असून प्रो. वा. मो. काळे ह्यांच्या नेतृत्वाखाली चाललेली महाराष्ट्र इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट्स् लि० ही कंपनी मॅनेजिंग एजन्सीची भागीदार आहे. त्यामुळें कंपनीचा कारभार दक्षतेनें चालेल अशी भागीदारांनीं खात्री बाळगण्यास हरकत नाहीं. श्री. जी. डी. कवडीकर ह्यांस पातळांचें उत्पादन व त्यांची विक्री ह्यांचा दीर्घ अनुभव आहे.

● एक्स्–ऑफिशिओखेरीज बाकी प्रत्येक डायरेक्टरानें दोन हजार रुपयांचे भाग घेतले पाहिजेत व २०,००० रुपयांच्या किंमतीचे भाग खपल्याखेरीज शेअर ॲलॉट केले जाणार नाहींत अशी तरतूद केलेली आहे.

★

## अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल १,००,००० रुपये

**( प्रत्येकीं २५ रुपयांचे २,००० ऑर्डिनरी व प्रत्येकीं ५० रुपयांचे ६ टक्के नॉन् क्युमिलेटिव्ह प्रेफरन्सचे १,००० शेअर्स )**

★

**कंपनीचे परभायर पत्र टाकून प्रॉस्पेक्टस मागवा.**

## ★ बँकेंतून चेक वटविण्याबाबत कांहीं विचार ★

चेकचा उपयोग पैसे देण्याघेण्याकरितां पुष्कळ होत असतो. प्रत्यक्ष पैसा मोजण्याऐवजीं चेकनें तो देणें अगर घेणें धोका व खर्च या दृष्टीनें सोयीचें पडतें. कांहीं वेळां देण्याघेण्याच्या व्यवहारांत प्रॉमिसरी नोटसारखा त्याचा उपयोग केल्याचें आढळतें. पण चेकचा कर्ज घेतल्याच्या पुराव्यासाठीं उपयोग होऊं शकणार नाहीं. चेक ही पैसे देण्याबद्दलची बँकेस लिहिलेली चिठ्ठी आहे. अशा प्रकारचे व्यवहार बँकेकडे मोठ्या प्रमाणांत होत असल्यामुळें सुरक्षितता व वापर या दृष्टीनें दोघांनाहि सोयीचें व्हावें म्हणून बँक चेक छापून ते वापरण्यासाठीं आपल्या गिऱ्हाइकांना देत असते. चेकवर बँकेची सही कोठेंच नसल्यामुळें त्याचेबद्दलची बँकेवर जबाबदारी कांहींच असूं शकत नाहीं व बँक चेक वटविणाराला कोणत्याच प्रकारें बांधलेली नाहीं. उलट पैशाच्या व्यवहारांत करन्सी नोटा अगर रोकड रुपयांप्रमाणें चेक स्वीकारलाच पाहिजे असा निर्बंधही नाहीं. बँकेची जबाबदारी आपल्या गिऱ्हाइकापुरती असते. चेक नियमाप्रमाणें असेल व तो स्वीकारण्यास लागणारा पैसा खात्यांत असेल तर बँकेनें चेक स्वीकारलाच पाहिजे. बँकेकडे हजर केलेल्या चेकचे पैसे तरी बँकेकडून मिळतील किंवा चेक न स्वीकारण्याच्या कारणांसह चेक तरी परत मिळेल.

चेक वटविण्याच्या पूर्वीच्या तारखेचा असला तरी चालतो. पण साधारणतः सहा महिन्यांच्या मागच्या तारखेचे चेक बँका स्वीकारीत नाहींत. रविवार अगर इतर सुटीच्या तारखेचे चेक असले तरी चालतात. चेक हातीं येतांच शक्य तों लवकर तो वटवून घ्यावा. चेकवरील सहीच्या आधारें, चेक काढणारा चेकच्या मालकाला (होल्डर) नेहमीच जबाबदार राहातो; पण कांहीं कारणामुळें बँकच अस्तित्वांतून गेली व चेक वेळेवर न वटविल्यामुळें चेक काढणाराचें नुकसान झालें तर चेक काढणारा धारण करणारास जबाबदार असूं शकणार नाहीं. शिवाय चेक काढणारा मयत अगर वेडा झाला किंवा त्याचें दिवाळें निघालें तर चेकचे पैसे बँकेकडून मिळूं शकणार नाहींत. बँकेला कायद्यानेंच ते देतां येणार नाहींत.

बँकेकडून रोख रकम पाहिजे असेल तर चेक 'क्रॉस्ड' (चेकवर आडव्या दोन समांतर रेघा मारतात त्या) असतां कामा नयेत. 'बेअरर' चेकचे पैसे कोणासहि मिळूं शकतात. ऑर्डर चेक शहाजोग हुंडीसारखा असतो, म्हणजे ओळखीच्या माणसालाच त्याचे पैसे मिळतात. चेकचे पैसे वटविण्याच्या बाबतींत लबाडी होऊं नये म्हणून मुद्दामच तसे ते काढलेले असतात. ऑर्डर चेकमागें करावयाच्या सहीबाबत पुष्कळांचा घोटाळा होतो. ऑर्डर चेकच्या मागें सही करावयाची ती अक्षरशः चेकवर लिहिलेल्या नांवाप्रमाणें करावी लागते. म्हणून नांवापूर्वी लिहिलेले 'मिस्टर,' 'श्रीयुत', 'डॉक्टर' वगैरे शब्दहि सहीबरोबर लिहिले जातात. पण तें चूक आहे. सन्मानवाचक शब्द सहीबरोबर कधींच येत नाहींत व म्हणून तशी केलेली सही बरोबर समजली जात नाहीं. सही करतांना ते शब्द अजीबात गाळावे. मात्र चेकवर लिहिलेल्या आपल्या नांवांतील अक्षराप्रमाणेंच सही करावी मग ती चुकीची असली तरी हरकत नाहीं. पाहिजे तर त्या सहीखालीं पुन्हां आपली नेहमींची सही करावी. बँकेनें ऑर्डर चेकचे पैसे देतेवेळीं ज्याच्या नांवानें चेक काढलेला असतो त्यानें त्यावर सही केली आहे याची खात्री करून घ्यावयाची असते. प्रत्येकाची सही बँकेंत माहीत असणें शक्य नसतें. म्हणून ती सकृत्दर्शनी तरी त्याच माणसानें केलेली आहे याची खात्री अशा तऱ्हेनें करून घेतली जाते. सही वरील प्रमाणें केलेली असली तरी पैसे नेणाऱ्या मनुष्याला बँकेची ओळख पटवून द्यावी लागतेच. चेक क्रॉस्ड असेल तर तो कोणत्या तरी खात्यामधूनच वटवून घ्यावा लागतो. तो क्रॉस्ड ऑर्डर असेल तर वरीलप्रमाणें सहीबाबत काळजी घ्यावीच लागते. बेअरर चेकचा ऑर्डर किंवा क्रॉस्ड ऑर्डर चेक कोणालाहि करतां येतो; पण उलट क्रॉस्ड चेकचा नुसता ऑर्डर किंवा ऑर्डर चेकचा बेअरर फक्त चेक काढणाराच करूं शकतो.

### वेग वाढविण्यास वाळूचें सहाय्य

रेल्वेच्या रुळावरून फिरणारें इंजिनाचें चाक एकेवेळीं आंगठ्याच्या नखाइतकाच भाग रुळावर व्यापतें. अशीं सहा, आठ, दहा चाकें रुळांस मागें ढकलीत मार्ग आक्रमण करीत असतात. रुळांनीं चाकांच्या गतीचा प्रतिकार केला नाहीं, तर तीं नुसतीच फिरत राहतील. असें होऊं नये म्हणून आगगाडी सुरू करतांना, थांबवतांना व तिचा वेग कमी करतांना, म्हणजे ज्यावेळीं रुळांनीं चाकांच्या गतीचा प्रतिकार करण्याची आवश्यकता सर्वांत अधिक असते, अशा वेळीं रुळांवर वाळूची धार टाकतां येण्याची ग्रेटब्रिटनमधील इंजनांत व्यवस्था असते. ह्या पद्धतीनें सुमारें ३० हजार टन वाळू एका वर्षांत तेथें उपयोगास येते.

**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें



आपल्याला नवीन वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.

● लक्ष्मीपूजन व वहीपूजनाच्या लौकिक आचाराबरोबर या पूजेंतील हेतू लक्ष्यांत घ्याल, तर याच मुहूर्तावर आपला विमा उतरण्याचें औचित्य तुम्हांस निश्चित पटेल.


● रोज दोन आणे वांचवून हजार रुपयांचा विमा उतरतां येईल! अशी शिल्लक नियमित टाकतां यावी म्हणून आमचे विमेदारांना लोखंडी सेफ अगर घड्याळ मोफत दिलें जातें.

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया अॅशुअरन्स

## कंपनी लिमिटेड, पुणें २


त्रैवार्षिक

**बोनस : हजारी ३० व ३६**




उपशाखा :

मुंबई, नागपूर, इंदूर, ग्वाल्हेर, बेळगांव
सोलापूर, सातारा, कोल्हापूर,
नाशिक, नगर इ०




# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

[ स्थापना १९१८ ]

● **मुदतीच्या ठेवी:**—रु. १०० अगर अधिक रकमांच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. बारा महिने मुदतीच्या ठेवींवर सभासदांना दर साल दर शेंकडा ३॥ व इतरांना ३। प्रमाणें व्याज दिलें जातें.

● **सेव्हिंग्ज डिपॉझिट:**—ह्या खात्यांत रु. ५ पासून रु. ५००० पर्यंत ठेवी स्वीकारल्या जातात. सभासदांना दर साल दर शेंकडा २½ प्रमाणें व इतरांना १½ प्रमाणें व्याज दिलें जातें.

● **रिकरिंग डिपॉझिट:**—दरमहा रु. १ प्रमाणें सतत २४ महिने पैसे भरल्यास दोन वर्षांचे अखेर रु. २५ दिले जातात, व वरीलप्रमाणें ४८ महिने भरल्यास अखेरीस ५० रु. दिले जातात; म्हणजे व्याज सुमारें ४॥ टक्के पडतें.

● **करंट अकाउन्ट:**—दररोजच्या बाकीवर रु. ५० पासून रु. २५००० पर्यंत सभासदांना १ व इतरांना ॥ टक्का व्याज दिलें जातें. या खात्याबाबत अधिक माहिती ऑफिसांत मिळेल.

● **परगांवच्या हुंड्या:**—मुंबई इलाख्यांतील सर्व मुख्य शहरांतील हुंड्या, रेल्वे रसीट वगैरे वसुलीचें काम माफक कमिशन घेऊन केलें जातें. त्याप्रमाणेंच कोणत्याही मुख्य शहरीं पैसे ड्राफ्टनीं पाठविण्याची व्यवस्था केली जाते.

● **खरेदी-विक्री खातें:**—शेअर व सरकारी रोखे खरेदी विक्रीचें काम कमिशन घेऊन केलें जातें.

● **कामाच्या वेळा:**—लोकांच्या सोयीसाठीं सकाळीं व संध्याकाळीं ठेवण्यांत आल्या आहेत.

विशेष माहिती बँकेच्या ऑफिसांत मिळेल.

| मुख्य कचेरी | दादर सब ऑफिस |
|---|---|
| सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, | भिरिमला बिल्डिंग, रानडे रोड, |
| मुंबई ४ | बी. बी. सी. आय. रेल्वेच्या दादर स्टेशनसमोर |

श्री. गुरुनाथराव ओगले



प्रभाकर कंदिलाचे उत्पादक.

दि ग्रेट सोशल लाइफ
ॲशुअरन्स लिमिटेड, जळगांव



श्री. श्रीपादराव ओगले



रा. सा. पी. आय. पाटील

## समाजांत शिक्षकाचें स्थान

आज शिक्षकांची आवश्यकता—बहुजनसमाजाला शिक्षकांची जरूरी—जास्त वाढलेली आहे पण शिक्षकाला समाजांत पूर्वीचें मानाचें स्थान मात्र राहिलेलें नाहीं. आजचा मनु बदललेला आहे. आजचें युग हें व्यापारी युग मानलें जात आहे आणि त्यामुळें शिक्षकाच्या व्यवसायाला आज धंद्याचें स्वरूप आलें आहे. शिक्षण हीसुद्धां एक बाजारी वस्तु बनल्यासारखी झालेली आहे. जुजबी, कामचलाऊ, थोडें व्यवहारापुरतें लिहितां वाचतां आलें म्हणजे पुरें असेंच शिकणारांपैकी प्राथमिक शाळांतलि विद्यार्थ्यांना पुष्कळांना वाटत असतें.

याचा परिणाम असा झाला आहे कीं, शिक्षकाला समाजांत असलेलें मानाचें स्थान कमी कमी होत चाललें आहे. आपला मुलगा चांगला शिकला पाहिजे, असें मनापासून म्हणणारा किंवा समजणारा पालकहि शिक्षक चांगला हुशार किंवा चांगलें अध्ययन झालेला असलाच पाहिजे असें समजत नाहीं आणि शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न निर्माण होईल तेव्हां त्यांच्या बाजूनें बोलायला तयार होत नाहीं. आजच्या व्यापारी किंवा व्यवहारी जगांत, ज्याला पोटापुरतेंही वेतन मिळणार नाहीं तो काम कसें करील हें उघडच दिसत आहे. कामगार किंवा मजूरही संघटना करून दाद लावून घेत आहेत, अशा आजच्या काळांत शिक्षकाला मजुरासारखाही दर्जा राहिलेला नसेल तर ज्ञानदानासारखें पवित्र काम त्याच्या हातून कसें होईल हें काय सांगावयास हवें ?

शिक्षकाचें शिक्षण आणि पगार कमी कमी करण्याचाच प्रयत्न दिवसेंदिवस सरकार आणि जनता करीत आहे. आतां व्हॉलंटरी स्कूल्स म्हणून शिक्षणप्रसाराच्या खेडोपाडीं ज्या शाळा निघालेल्या आहेत, तेथील शिक्षकांना दरमहा सात आठ रुपये सुद्धा मिळण्याची मारामार पडूं लागली आहे. दरमहा सात आठ रुपये मिळणाऱ्या माणसाला समाजांत कुठेंसें स्थान मिळेल हें सांगण्याची काय आवश्यकता आहे ?

समाजाच्या मनाला किंवा बुद्धीस चांगलें वळण लावण्याचें अत्यंत महत्त्वाचें व जरूरीचें काम करणारीं माणसें अशा प्रकारें हालअपेष्टेंत दिवस काढणारीं बनलीं तर त्यांच्या हातून होणारें काम चांगलें होत आहे अशी समजूत करून घेणें याच्या इतका खुळेपणा दुसरा कोणता असेल ? लोकांना शहाणे करण्याच्या गोष्टी बोलणारे पुढारी किंवा सरकार ह्या गोष्टी जाणून बुजून करीत असेल असें मी म्हणत नाहीं, पण आजची स्थिति हीं अशी झालेली आहे खरी. पोटालाही पुरतें न मिळणारीं आणि त्यामुळें समाजांत मानाचें स्थान नसलेलीं माणसें समाजाचा उद्धार करण्याची महत्त्वाची कामगिरी आज बजावीत आहेत. अशा ह्या समाजाचें आतां काय होणार आहे कोण जाणें.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल लॅक टूथपावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी

कामगार ब्राम्ही तेल
सिरोमणि तेल
आवळ्याचे तेल

डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.

धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. )



*For Collegians*—

Wooden & Iron Furniture

FOR SALE & HIRE

*Your Popular Old Shop*

**SHEVAK BROS.**

*Work-shop Address:*

153, KASBA POONA 2

*Branch No. 1*

SHEVAK QUARTERS

*Near Fergusson College. POONA 4*

**बँका आणि त्यांचे व्यवहार**

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

किं. १ रु. ८ आणे

१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे


बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें

अत्यंत उपयुक्त पुस्तक

" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

STEVENS CO. CRONWELL CONN U.S.A.

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून त्याचा सखत आवाज होतो. त्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. त्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रु ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर १५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

**श्री ग्रेट सोशल लाईफ ॲन्ड जनरल ॲश्युअरन्स लि., जळगांव**

सदरहु विमा संस्था १९३३ सालीं सावदा ( पूर्व खानदेश ) येथील सुप्रसिद्ध धनाढ्य व्यापारी रावसाहेब पी. आय. पाटील यांनीं पुढाकार घेऊन काढली. "घड्याळाच्या सहाय्यानें" विमा उतरणारी पहिली महाराष्ट्रीय संस्था म्हणून "ग्रेट सोशलनें" विमाक्षेत्रांत पदार्पण केलें. १९३७ सालीं रावसाहेब पी. आय. पाटील हे विमाशास्त्राचा प्रत्यक्ष अभ्यास करणेसाठी व विमाविक्रयकलेचा प्रत्यक्ष अनुभव घेणेसाठीं परदेशांत जाऊन तेथील मेट्रोपॉलिटन कॉलिजमधील डिप्लोमा घेऊन व लंडन येथील प्रुडेन्शीयलमध्यें काम करून जवळ जवळ १ वर्षानें परत आले.

कंपनीनें क्लेम्स व हक्कपूर्तीचे पोटी आतांपावेतों ४०,००० रुपयांच्यावर रक्कम विमेदार व त्यांचे वारस यांना दिलेली आहे. सरकारी सिक्युरिटीजमध्यें गुंतवलेली रक्कम १,३१,००० रु. चे वर असून कंपनीचा लाईफ फंड १,४०,००० चे वर आहे. कंपनीची मालमत्ता २,५८,००० चे वर आहे. कंपनीस १९३८ अखेरचे पंचवार्षिक मूल्यमापनांत १२,००० चे वर नफा राहिलेला असून, तिनें दर हजारीं हयातीनंतरचे विम्यास ६० रु. व हयातींतील विम्यास ५० रु. बोनस वाटला असून भागीदारांना ५ टक्के डिव्हिडंड दिलें आहे. कंपनीनें मुंबईस फेरोजशहा मेथा रोडवर स्वतःचे मालकीची इमारत बांधावयास सुरवात केली असून ती लवकरच पूर्ण होईल. चालू सालापासून श्री. के. एच. सुराणा "विमा केसरी" यांची जनरल मॅनेजर म्हणून नेमणूक केलेली असून श्री. के. जी. चौधरी हे लाइफ मॅनेजर आहेत. कंपनीचें येथील ऑफीस लक्ष्मीरोडवरील हुजूरपागेच्या "सरस्वती विलास" या नव्या बिल्डिंगमध्यें असून श्री. डी. के. पाठक हे त्याचे मॅनेजर आहेत.

---

**दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.**

मुंबई शहरांतील वरील बँकेची स्थापना व तिचा विस्तार हें तिचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए., एफ. सी. आर. ए. (ग्लासगो) ह्यांच्या कळकळीचें आणि मेहनतीचें फळ आहे. बँकेनें व्यवहारास १-४-३८ रोजीं प्रारंभ केला तेव्हां तिचें भरणा झालेलें भागभांडवल ८३ हजार रुपये होतें. तें ३१-१२-३८ अखेर २ लक्ष, ६२ हजार रुपये झालें. मे, १९३९ अखेर तिला शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला व आतां तिचें भांडवल जवळ जवळ ५ लक्ष, ७ हजार रुपये झालें आहे. बँकेकडील ठेवीहि आतां १२ लक्ष, १५ हजारांपर्यंत गेल्या आहेत. बँकेनें बाँबे क्लिअरिंग हाउसमार्फत चेकसच्या रकमांची देवघेव करण्याची व्यवस्था केलेली आहे. एकूण देण्याशीं भागभांडवलाचें प्रमाण मोठें पडतें; म्हणजे देण्यामध्यें बँकेच्या स्वतःच्या भांडवलाचा मोठा अंश आहे. बँकेनें खुद्द मुंबईत गिरगांवामध्यें व जव्हेरी बाजारांत आणि नाशिक, सोलापूर, कोल्हापूर या ठिकाणीं शाखा; त्याचप्रमाणें सांगली येथें उपशाखा व अकलूज येथें पे. ऑफिस, अशीं काढून आपल्या कार्याचा विस्तार केला आहे. श्री. जमनादास मेहता हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. ल. ब. भोपटकर हे तिचे उपाध्यक्ष व ठेवीदारांतर्फे डायरेक्टर आहेत. श्री. देशपांडे ह्यांच्या परिश्रमाचें पूर्ण चीज होवो, असें आम्हीं इच्छितों.

---

**दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेनें ३०,००० रुपये खर्च करून गिरगांवांत स्वतःची इमारत बांधून प्रगति-पथावरील एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. संस्थेची स्थापना १९१८ च्या सप्टेंबर महिन्यांत झाली. दोन वर्षांचे शेवटीं खेळत्या भांडवलाची रक्कम ७,५९७ रुपये होती. १९२९ मध्यें खेळतें भांडवल ५०,००० रुपयांवर जाऊन तिचें रूपान्तर अर्बन बँकेंत करण्यांत आलें. १९३३ मध्यें बँकेचें पूर्वीचें 'सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकिंग सोसायटी लि.' हें नांव बदलून 'सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.' असें नवीन नांव ठेवण्यांत आलें. १९३६ च्या जूनमध्यें ठाकुरद्वारला बँकेची पहिली शाखा उघडण्यांत आली; दादरच्या शाखेच्या कार्यास १९३७ च्या फेब्रुवारीपासून सुरवात करण्यांत आली. नवीन इमारत बांधल्यामुळें ठाकुरद्वार शाखा यापुढें स्वतंत्र न रहातां हेड ऑफिसमध्यें समाविष्ट करण्यांत आली आहे. ३० जून, १९४० रोजीं संपणाऱ्या वर्षअखेर बँकेच्या पटावर १,५२७ सभासद असून वसूल भांडवल ९७,१२३ रुपये आहे. बँकेचे रिझर्व्ह फंड व इतर फंड एकूण ५५,७५० रुपयांचे आहेत. बँकेकडे ११,५७,७४० रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें कर्जें, कॅश क्रेडिट इ. रूपानें ३,१७,४७१ रुपये गुंतविले असून सरकारी कर्जरोखे, भाग व रोख शिल्लक यांत ९,४३,६७२ रुपये आहेत.

गेल्या २२ वर्षांत बँकेची भरभराट होऊन तिला एकूण ७४,००० रुपयांचा नफा झाला, त्यांपकी भागीदारांना डिव्हिडंड रूपानें २७,४०० रुपये वांटण्यांत आले. बँकेनें एकूण ९,७६,००० रुपयांची कर्जें देऊन भागीदारांना उद्योगधंद्यांत व अडीअडचणींत मदत केली. बँकेचे अध्यक्ष श्री. वा. पुं. वर्दे यांच्या नेतृत्वाखालीं बँकेची अशीच भरभराट होवो असें आम्ही इच्छितों.

---

**दि विजय टेक्स्टाइल्स लि., पुणें**

वरील कंपनी पुणें येथें श्रीमंत बाबूराव साळवेकर ह्यांचे नेतृत्वाखालीं नुकतीच स्थापन झाली आहे. यांत्रिक शक्तीनें मोठ्या प्रमाणावर लुगडीं व पातळें यांचें उत्पादन करणारे अनेक खाजगी प्रयत्न यशस्वी झाले आहेत, परंतु ते करणारी लिमिटेड कंपनी विजय टेक्स्टाइल्स ही पहिलीच दिसते. पुणें अशा उपक्रमास विशेष सोईचें आहे. महाराष्ट्राचें तें केंद्र असून स्थानिक खप मोठा आहे. मुंबईचा नजीकपणा हीहि एक सोईची गोष्ट आहे. विजय टेक्स्टाइल्सला उत्कृष्ट बोर्ड लाभला असून मॅनेजिंग एजन्सींत प्रो० वा० गो० काळे ह्यांच्या अध्यक्षत्वाखालची महाराष्ट्र इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट्स लि. असल्यामुळें विजय टेक्स्टाइल्स लि. चा कारभार सुव्यवस्थित चालण्यास सहाय होईल, हें उघड आहे. कारखाना अपेक्षेप्रमाणें चालला, तर भांडवलावर किमान ७½ टक्के तरी सुटतील, असा उत्पादकांस विश्वास वाटत आहे. कंपनीचे ३० हजार रुपयांचे भाग तात्काळ खपून जाण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. विजय टेक्स्टाइल्सनें अल्प प्रमाणावर प्रारंभ केला तरीं त्या कंपनीस लवकरच यश प्राप्त होऊन तिचें मोठ्या गिरणींत रूपांतर होवो असें आम्ही इच्छितों.

---

**जमखंडी स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

ह्या बँकेचा उद्घाटनसमारंभ उद्यां, दिवाळीच्या पाडव्याचे सुमुहूर्तावर, श्रीमंत राजासाहेब सरकार जमखंडी ह्यांचे हस्तें होणार आहे. संस्थानचा शेतकरी वर्ग, व्यापारी, कारागीर व इतर प्रजाजन ह्यांच्या आर्थिक उन्नतीस ह्या संस्थेचें चांगलें सहाय होणार आहे. ह्या उपक्रमाबद्दल श्रीमंत राजेसाहेब आणि त्यांची प्रजा ह्यांचें आम्ही अभिनंदन करतों आणि नवीन स्टेट बँकेस यश चिंतितों.

---

शुभ्र व चकचकीत प्रकाशाकरितां

स्वदेशी

हेलियम बॅटरीज

वापरा

बनविणार : दि हेलियम प्रॉडक्टस् (इंडिया) लि., पुणें.



शक्तीसाठीं मुलांना सुप्रसिद्ध

डोंगरे यांचें बालामृत

दिलें पाहिजे. मुलांचे वाढीस उपयुक्त अशी मूल्यवान औषधें या बालामृतांत आहेत. गोड असलेमुळें मुलें हौसेनें पितात.

## युद्धाच्या धोक्याचा विमा

### सरकारी योजना

माळास युद्धामुळें धोका उत्पन्न होण्याचा संभव असल्यानें त्याचा विमा उतरण्याची योजना हिंदुस्थान सरकारनें केली आहे आणि ती गेल्या ऑगस्टमध्यें प्रसिद्ध झालेल्या वटहुकुमानें अंमलांत आली आहे. ह्या योजनेचे खालीं दिलेले विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेतः—

(१) योजना केवळ मालास लागू आहे. स्थावर मालमत्तेशीं तिचा कांहीं संबंध नाहीं. ती बहुतेक सर्व प्रकारच्या मालास लागू आहे, पण शेतीचीं पिकें, दगडी कोळसा, जवाहीर, राकेल तेल, सिमेंट इत्यादि ४६ प्रकारच्या जिनसा वगळण्यांत आल्या आहेत.

(२) विमा उतरावयाच्या जिनसांचा विमा त्या विक्रीसाठीं किंवा पक्क्या मालाच्या बनावटीसाठीं धारण करणारांनीं उतरावयाचा आहे.

(३) वर नमूद केलेल्या विम्यास पात्र असलेल्या २० हजार रुपये किंवा अधिक किंमतीच्या कोणत्याहि एका जिल्ह्यांत किंवा प्रेसिडेन्सी शहरांत जिनसा धारण करणारानें नोव्हेंबरच्या १ तारखेपासून त्यांच्या पूर्ण किंमतीइतका विमा उतरलाच पाहिजे. वीस हजार रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या मालाचा विमा उतरण्याची सक्ती नाहीं.

(४) ह्या योजनेच्या अंमलबजावणीप्रीत्यर्थ सरकारनें १०८ विमा कंपन्यांस मान्यता दिली आहे.

(५) प्रत्येक पॉलिसी काढल्यापासून तीन महिनेपर्यंत ती अमलांत राहील.

(६) प्रीमियमचा दर दरमहा दरशेकडा अर्धा आणा पडेल. त्याची किमान रकम भरलीच पाहिजे. महिन्याचा भाग संबंध महिना गणला जाईल.

(७) हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतील आपल्या मालाचा विमा मालकास एका पॉलिसीनें उतरतां येईल. निरनिराळ्या जिल्ह्यांच्या करितां स्वतंत्र पॉलिसीजहि घेतां येतील. कोणत्याहि एका वेळीं सर्व मालाची किंमत होईल तितक्या रकमेइतका विमा उतरला पाहिजे.

(८) प्रीमिअमचा दर इतका अल्प आहे कीं, 'डिक्लेरेटरी' पॉलिसी घेतां यावयाची नाहीं किंवा उतरलेल्या विम्याच्या रकमेपेक्षा मालाची प्रत्यक्ष किंमत कमी ठरल्यास रिफंड दिला जाणार नाहीं.

---

### रोजीं दोन आणे दंड

पेणकर कॉटन मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचे लिक्विडेटर श्री. मनोहर सॉलिसिटर ह्यांनीं कंपनी कायद्याप्रमाणें कंपनीच्या हिशेबाचे तक्ते दाखल न केल्याबद्दल त्यांस मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं १६३ रुपये दंड केला. ज्या मुदतींत गुन्हा चालू राहिला, त्यांतील प्रत्येक दिवसाचे दोन आणे, ह्या दरानें दंडाचा आकार करण्यांत आला.

### जपान्यांचें स्वदेशीं प्रयाण

शुक्रवार, ता. २५ रोजीं "किशामा मारू" ह्या जपानी आगबोटीनें सुमारें ६० जपानी लोक स्वदेशीं परत जाण्यास निघाले. मुंबईमधील बहुतेक सर्व जपानी स्त्रिया व मुलें त्यांत आहेत.


## दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतील.

पत्ता:—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर–Amritsar.

---

## पुण्यांत आल्यावर

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

# OUR HOME

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

## उतरण्यास या.


मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी


याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

**अवर होम,**

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.





जड होई कन्या पित्याला
म्हणुनि पारडें झुके तळाला
वरपित्याची वरची बाजू
खचित निराळा लग्न-तराजू
म्हणे वरपिता, "करूं बोलणें
मधील अंतर आधिं तोडणें
टाका रुपये पारड्यांत या
एकपातळी वरती यावया
अजून नाणें कमीच पडतें
सात शेंकडें वाढवाच ते"

—इति चिमणराव

लग्नाच्या बाजारांतील हुंड्यांच्या वजनाखालीं दबून गेलेल्या, आपली भगिनी सौ. कां. चि. चिमी हिच्या लग्नाच्या मोहिमेवर निघालेल्या चिमणरावास आलेले विचित्र अनुभव




प्रो. चिं. वि. जोशी, एम्. ए.
यांनीं निर्मिलेल्या चिमणराव या प्रसिद्ध भूमिकेवर आधारलेलें कथानक—

दिग्दर्शक :—विनायक
संवाद व पटकथाः—वि. स. खांडेकर
छायालेखकः—पांडुरंग नाईक

नवयुग चित्र

: भूमिका :
दामुअण्णा मालवणकर

या नवयुगच्या मराठी विनोदी बोलपटांत पहात असतांना तुम्ही पोट धरधरून हंसाल.

आणि त्यानंतर

: दिग्दर्शक : विनायक — अमृत — : कथा : वि. स. खांडेकर

प्रकाशकः पिअरलेस पिक्चर्स, ११६, चर्नी रोड, मुंबई ४



# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि०

| शाखा | मुख्य कचेरी | शाखा |
|---|---|---|
| फोर्ट, मुंबई | पुणें शहर | डेक्कन जिमखाना, पुणें |

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० | खपलेलें भांडवल | रु. ३,३७,२५० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० | वसूल झालेलें भांडवल | रु. १,६८,५४५ |

ठेवी रु. २५,००,०००.

डायरेक्टर्स

प्रो. वा. गो. काळे (अध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे (उपाध्यक्ष)
श्री. न. ग. पवार
श्री. त्र्यं. वि. रानडे
श्री. बा. पुं. वर्दे
श्री. मा. रा. जोशी
श्री. श्री. गो. मराठे
श्री. र. चिं. सोहनी
श्री. फ. वो. पद्मजी
श्री. भा. म. गुते

मॅनेजर
श्री. म. वि. गोखले

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. बँकेची शेअर विक्री चालू आहे. विशेष माहितीकरितां तसेंच शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

## ओगले काच-कारखाना

श्री. श्रीपाद प्रभाकर ओगले यांनीं ओगलेवाडी येथें सुरू केलेल्या ओगले ग्लासवर्क्सची माहिती सर्वांस आहेच. सध्याच्या महायुद्धामुळें बाहेरील आयात बंद झाल्यानें, हिंदुस्थानांतील बाजाराला पुरवठा करणें व हिंदुस्थान सरकारला लढाईचे कामीं माल पुरविणें हीं दोन्हीं कामें आपणांकडील कारखानदाराला करावीं लागतात. या संधीचा फायदा घेऊन या कारखान्यानें तेलाच्या बाटल्यां, शाईच्या बाटल्या वगैरेची पैदास फार मोठ्या प्रमाणावर चालू केली असून कंदीलांचा कारखानाहि मोठ्या प्रमाणावर चालू केला आहे. त्यांनीं आपल्या एनॅमलच्या कारखान्यांतहि पुष्कळच वाढ करून हरतऱ्हेचे एनॅमल वेअर (भांडीं) तसेंच बाहेरील आयात अगदीं कमी झाल्यामुळें व हिंदुस्थानांत इतर कोठूनहि न मिळणारी अशी रेल्वेस लागणारी एनॅमल्ड कमोड्स, एनॅमल्ड वॉश बेसिन्स, एनॅमल्ड इलेक्ट्रिक शेड्स हा माल अगदीं परदेशीच्या तोडीचा काढून हिंदुस्थानांतील सर्व रेल्वेवर हा माल चालूं करणेचें काम सुरू केलें आहे ही अतिशय अभिमानाची व अभिनंदनाची गोष्ट होय. लढाईमुळें कारखानदारालाहि अडचणी आहेतच. लढाईची परिस्थिति पुढें करून हिंदुस्थानांतील रेल्वे कंपन्यांनीं कांहीं कारणांकरितां दिलेले कन्सेशन रेट रद्द करण्याचें काम चालू केलें असून भाड्यातोड्यांतहि सरचार्ज वगैरेची भरती घालून बरीच वाढ करण्यांत आली आहे. वास्तविक पाहतां सरचार्ज हा टनेजवर पाहिजे म्हणजे तो सर्व व्यापाऱ्यांना सारखाच पडतो. परंतु हिंदुस्थानांत लांब अंतरावरचे लोकांना कोळशासारखे वस्तूवर जेथें अधिक भाडें घ्यावें लागतें तेथें ह्या भाड्याचें प्रमाणावर सरचार्ज ठेवलेमुळें दूर अंतरावरचे लहानसान लोकांना अधिक सरचार्ज भरावा लागून त्यांच्या मार्गांतील अडचणी दुणावतात. कलकत्याजवळील कंपन्यांना याची झळ फारच थोडी पोंचते; तरी उद्योगधंद्याचे वाढीसंबंधीं विचार चालू असतांना व सर्व तऱ्हेच्या कारखानदारांची जरूरी सरकारला असतांना ह्या प्रश्नाचा विचार नीट होणें आवश्यक नाहीं काय?

लढाईमुळें सर्व तऱ्हेच्या मालाची आयात कमी झाली असल्यानें आजपर्यंत येत असलेल्या मालांत नवीन येणाऱ्या मालाची भर कमी पडत असल्यानें कारखान्यास लागणाऱ्या मालाला जबर भाव द्यावे लागत आहेत. श्री. ओगले यांनीं दूरवर लक्ष ठेवून आपले कामाकरितां लागणारा मालमसाल्याचा पुरवठा चांगला राहील असें धोरण ठेवून आपल्या सर्व कारखान्याचें काम जोरांत ठेवलें आहे हें भूषणावह आहे. ओगले ग्लास वर्क्स लि. यांचे चालकत्वाखाली म्हैसूर ग्लास व इनॅमल वर्क्स नांवाचा बंगलोरला एक कारखाना उघडल्याचें वाचकांस माहितच आहे. तिकडेहि ग्लास व इनॅमलचें काम हळुहळू जास्त प्रमाणावर निघूं लागलें आहे. सिलोन सरकारनें नुकतीच ओगले ग्लास वर्क्स यांना काचेच्या धंद्याच्या उपक्रमाच्या दृष्टीनें एकवार सिलोनची पाहणी करून मिळावी अशी विनंति केल्यावरून श्री. गुरुनाथ प्रभाकर ओगले हे कोलंबोस जाऊन आले. आपला रिपोर्ट सिलोन सरकारकडे ते सादर करतीलच. परंतु एका परक्या देशाला धंद्याच्या दृष्टीनें मार्ग दाखविण्याचें श्रेय महाराष्ट्रीय कारखानदाराकडे यावें यांतच महाराष्ट्रीय कारखानदाराची थोरवी आहे. श्री. ओगले यांचें आम्हीं अभिनंदन करतों.

---

यंदाची दिवाळी 'सार्थ' साजरी करा!

**दि वर्ल्ड-वाइड विमा कंपनी लि., पुणें**

या भरभक्कम आर्थिक पायावर उभी असलेल्या महाराष्ट्रीय विमा कंपनींतच आपल्या आयुष्याचे विमे उतरून आपली 'आर्थिक' परिस्थिति निश्चित करा.

आमचे विशेष

- विमेदारांना हमखास बोनस मिळण्याची योजना!
- मागीदारांना त्यांच्या विमा हप्त्यावर १०% जादा सूट!!
- स्त्री-विमेदारांना हप्त्यावर जादा आकार पडत नाहीं!!!

जास्त माहितीसाठीं लिहाः—

मा. पं. सोमण, एम्. ए., मॅनेजिंग डायरेक्टर.

दि वर्ल्ड-वाइड विमा कंपनी, लिमिटेड,

सरस्वती-विलास :: लक्ष्मी रोड :: पुणें २.

नवीन विमा कायद्याप्रमाणें रिझर्व बँकेकडे भरलेली

डिपॉझिट रक्कम रु. १,००,००० हून अधिक

हप्त्याचें वार्षिक उत्पन्न ४०,००० हून अधिक

- विम्यांच्या सर्व प्रकारच्या योजना.
- विमेदारांना भरपूर सवलती.
- एजंटांना दरमहा कमिशन मिळण्याची सोय.
- सुप्रसिद्ध विमातज्ञ श्री. चिरमुले व ॲक्चुअरी श्री. मराठे यांचे उत्तम अभिप्राय.

आयुर्निधि ५५,०००

भरपूर कमिशनवर एजंट्स व ऑर्गनायझर्स नेमणें आहे.

विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.

हेड ऑफिस

दि गुडवुइल ॲशुअरन्स कंपनी, लि.

कुपवाड, जि. सातारा

## जाहिरातींची अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| दि न्यू सिटिझन बँक लि. ... ... | ५१७ |
| मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि. ... | ५१८ |
| किर्लोस्कर बंधु लि. ... ... | ५१९ |
| ओगले ग्लास वर्क्स लि. ... ... | ५१९ |
| पुणें सेंट्रल को. बँक लि. ... ... | ५२० |
| मिरज स्टेट बँक लि. ... ... | ५२० |
| श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ... | ५२१ |
| सिल्व्हर ज्युबली मोटर्स लि. ... ... | ५२६ |
| प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि. ... | ५२९ |
| दामोदरदास भगवानदास ... ... | ५३० |
| सदर्न निटिंग वर्क्स लि. ... ... | ५३२ |
| आपटे सराफी दुकान ... ... | ५३४ |
| रम्य वाचनालय ... ... | ५३४ |
| कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कं. लि. ... | ५३६ |
| एल्. एस्. जी. डी. ट्रेनिंग क्लासेस ... | ५३९ |
| पूना मर्चंटस् को. बँक लि. ... ... | ५३९ |
| साठे बंधू ... ... ... | ५४३ |
| वेस्टर्न इंडिया आयुर्विमा कं. लि. ... | ५४४ |
| व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि. ... ... | ५४४ |
| आयुर्वेद रसशाळा पुणें लि. ... ... | ५४६ |
| दि डेक्कन पेपर मिल्स कं. लि. ... | ५४६ |
| एस्. आर. जोशी ... ... | ५४८ |
| म. गो. कुलकर्णी आणि मंडळी ... | ५४८ |
| एम्ब्रॉइडरी मार्ट ... ... | ५४९ |
| विजय टेक्स्टाइल्स लि. ... ... | ५५० |
| महिंद्रकर ब्रदर्स ... ... | ५५१ |
| सारस्वत को. बँक लि. ... ... | ५५२ |
| ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं. लि. ... | ५५२ |
| पराडकर टेलर्स ॲकॅडेमी ... ... | ५५३ |
| पोरवाल ॲन्ड कं. ... ... | ५५४ |
| बॉबे कलकत्ता ट्रेडिंग कं. ... ... | ५५४ |
| शेवक ब्रदर्स ... ... ... | ५५४ |
| अमेरिकन पिस्तुल कं. ... ... | ५५४ |
| हेलियम प्रॉडक्टस् इंडिया लि. ... ... | ५५६ |
| के. टी. डोंगरे आणि कं. ... ... | ५५६ |
| लंडन कमर्शिअल कं. ... ... | ५५७ |
| अवर होम ... ... ... | ५५७ |
| बॉबे कलकत्ता ट्रेडिंग कं. ... ... | ५५७ |
| नवयुग चित्रपट लि. ... ... | ५५८ |
| बँक ऑफ महाराष्ट्र लि. ... ... | ५५८ |
| वर्ल्ड–वाइड विमा कं. लि. ... ... | ५५९ |
| गुडविल ॲशुअरन्स कं. लि. ... ... | ५५९ |
| कराड अर्बन को. बँक लि. ... ... | ५६० |
| सांगली बँक लि. ... ... | ५६० |
| मानवाश्रम ... ... ... | ५६१ |
| करल प्रॉडक्टस कं. लि. ... ... | ५६१ |
| व्ही. पी. बेडेकर ॲन्ड सन्स ... ... | ५६१ |
| ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स लि. | ५६२ |
| जी. के. साठू ब्रदर्स ... ... | ५६३ |
| भारत इंशुअरन्स कं. लि. ... ... | ५६४ |



# धी सांगली बँक लि. सांगली

[ स्थापना : ५ ऑक्टोबर, १९१६ ]

हेड ऑफिस : सांगली

शाखा :

(१) शहापूर (२) रबकवी (३) शिरहट्टी
(४) तेरदळ (५) कवठे (६) मंगळवेढें
(७) विलिंग्डन कॉलेज (जि. सातारा)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,००,००० |
| रिझर्वस् | रु. १,५०,००० |

दक्षिणी संस्थानांतील ही सर्वांत जुनी बँक असून सर्व प्रकारचें बँकिंगचें काम करण्यांत येतें.

पी. एस्. मोकाशी,
मॅनेजर

# दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

बँक गेलीं सात वर्षें 'अ' वर्गांत दाखल आहे.

तारीख ३०–६–४० असेर बँकेचें वसूल झालेलें
शेअर भांडवल रु. ३८,०००

रिझर्व व इतर फंड्स रु. ३४,००० ठेवी रु. ३,८२,०००

खालील दरानें ठेवी स्वीकारल्या जातात :—

१ चालू ठेव १% २ सेव्हिंग ठेव २%

| मुदत | मेंबर | नॉन-मेंबर |
|---|---|---|
| १ वर्ष | २½% | २% |
| २ वर्षे | २¾% | २½% |
| ५ वर्षे | ३½% | ३% |

हुंडी, चेक यांची खरेदी-विक्री व रेल्वे रिसीट्स, वसुली वगैरे बँकिंगचा सर्व व्यवहार केला जातो.

विशेष माहिती पत्रद्वारें अगर समक्ष ऑफिसकडून मिळेल.

व्ही. पी. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# माधवाश्रम

ध

वा

श्र

म

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून, रेल्वे स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

जागा मध्यवस्तींत, हवाशीर. लागणारे फर्नीचरनें श्रृंगारित व व्यवस्थित खोल्या असून, सरदार, श्रीमंत, विद्यार्थी, व्यापारी वगैरे उच्च हिंदु लोकांस राहण्यास व भोजनाचे स्वच्छतेमुळें तसेंच इलेक्ट्रिक लाईट, पंखे (फर्स्ट-क्लासमध्यें) वगैरे सोईमुळें जागा अत्यंत शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहणेची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

**माधवाश्रम बिल्डिंग,**
गिरगांव, मुंबई.




# मधु-रोधक

अथवा

**मधुमेहावरील निश्चित गुणकारी**

## वनस्पतिमिश्रण

तीन आठवड्यांचे औषधास

किं. रु. ७

घेण्याचें प्रमाणः—

दोनहि वेळां जेवणापूर्वीं सुमारें अर्धा तास प्रत्येक वेळीं १ औंस.

**रूरल प्रॉडक्टस् कंपनी लि., पुणें.**

| रजिस्टर्ड ऑफिस : | व्यापारस्थान : |
|---|---|
| ७५४ शुक्रवार, पुणें २. | ९१३ प, सदाशिव, पुणें २. |

**स्वादिष्ट**

**मसाला करणारे**

आद्य

★ कारखानदार ★

**V.**  **P.**


**BEDEKAR & Sons**

पुणें येथील एजंट :

**दत्तात्रय नारायण हेजीब**

अवघ्या सात वर्षांच्या अल्प काळांत मुंबई येथें इमारत बांधणारी

# पहिली महाराष्ट्रीय विमासंस्था

# दि ग्रेट सोशल लाईफ

## ॲन्ड जनरल ॲशुअरन्स लि.

मुख्य ऑफिसः—जळगांव (पूर्व खानदेश)



दर हजारी

**पंचवार्षिक बोनस**

होललाईफ पॉलिसीवर रु. ६० — एन्डौमेंट पॉलिसीवर रु. ५०

विम्याचें आलेलें काम रु. १ कोट.

विम्याचे हप्त्याचें उत्पन्न साडेपांच लाखांवर.

पॉलिसी अगर एजन्सी घेण्यास

# आदर्श विमासंस्था

— मुंबई शाखा —

**केरमाणी बिल्डिंग**

सर फेरोजशाहा मेथा रोड, फोर्ट-मुंबई.

— पुणे शाखा —

**"सरस्वतीविलास"**

लक्ष्मीरोड, पुणे २.

# स्वर्गीय औषधांची अमूल्य देणगी




दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर आर्यौषधि कारखाना मुंबई.

तान्ह्या मुलांना दिलं असतां त्यांना कसलाहि रोग होत नाहीं व तीं धष्टपुष्ट होतात.

विवाळीच्या सुमुहूर्तावर हिंवाळ्याचे चार महिने रोज सांडूंचा

## " च्यवनप्राश "

घ्या.

व वर कपभर दूध घ्या. शरीर पुष्ट, कांति सतेज व चेहरा तेजस्वी होईल.




दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर ) आर्यौषधी कारखाना ( मुंबई.

सांडू ब्रदर्स कंपनीचीं
हीं सहा अमूल्य औषधें सतत संग्रहीं ठेवा.




दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
चेंबूर आर्यौषधि कारखाना मुंबई

गरोदरपणीं घेतलें असतां कसलाहि त्रास होत नाहीं. प्रसूती सुलभ होते. जिच्या मुलांना आंकडीची संवय आहे त्यांना तर हें अमृतच होय.

हृदयांत दुखणें, सुया टोंचल्यासारख्या वेदना होणें, घाबरल्यासारखें होणें व इतर सर्व हृद्रोगावर उत्कृष्ट

## हार्टिना
(रजि.)




दत्तात्रेय
कृष्ण सांडू
ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर आर्यौषधि कारखाना मुंबई



दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर. आर्यौषधि कारखाना. मुंबई.

पुणें सोल एजंटः—ठाकूर-देसाई आणि कं., बुधवार पेठ, पुणें. — एजन्सी नसतील तेथें देणेच्या आहेत.

# BHARAT

## Insurance Co. Ltd.

**SINCE 1896 COMPLETES IN 1939**

**SOLID, SOUND, FRESH BUSINESS**
**OF**

## OVER Rupees
## 2 CRORES, 8 LAKHS

**UNIVERSALLY RECOGNISED AS**

**A Leader among Indian**

**Life Offices**

★

**Every working Day BHARAT Pays claims**
**OVER Rs. 6,000**

***Previous rates of Bonus maintained as a result of the valuation for the quinquennium ended 31st Dec. 1938***

**Rs. 22-8** *for* **Whole-Life Policies**

**Rs. 17-8** *for* **Endowment Policies**

*Chairman:*
**SETH RAM KRISHNA DALMIA**

*Director-in-Charge*
**RAJENDRA KUMAR JAIN**

**Head Office: LAHORE**

*Poona Branch Secretary*

**D. K. JOGLEKAR, B. A.**


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत ना. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापलें व ना. [illegible] वामन काळे, बी. ए., यांनी 'गुणाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. [illegible], पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.